५९२८
म. ग्रं. सं. ठाणें
विषय इतिहास
वा. नं. २०९

REFBK-0003427

REFBK-0003427

# अंदमानच्या अंधेरींतून.

अर्थात्

दे॰ भ॰ विनायकराव सावरकर.

यांचीं

अंदमानांतील पत्रें.

3820

---

भाषांतर कर्ते :—

श्रीयुत वि. वि. केळकर, वकील, नागपूर.

---

किंमत १२ आणे.

REFBK-0003427
REFBK-0003427

ना. रा. … ए. बी.

लोकसेवा प्रेस, नागपूर.

१९२७.

स्वातंत्र्यवीर

दे. भ. बॅ. विनायक दामोदर सावरकर



# प्रस्तावना.

दे. भ. बॅ. विनायकराव सावरकरांच्या विषयीं अल्पस्वल्प जी कांहीं माहिती मिळेल ती ऐकण्यास व त्यांच्या लेखणीतून उतरलेलें एखादें वाक्यही असलें तरी तें वाचण्यास महाराष्ट्रांत अनेक वाचक उत्सुक झालेले आहेत हें अनुभवानें आह्मांस माहित असल्यानें त्यांची तृषा भागविण्यासाठीं आह्मीं त्यांच्याविषयीं लहान सहान लेख मिळाले तरी प्रसिद्ध करणार होतों. विनायकरावांची प्रकृती सध्यां ठीक नसल्यानें ते स्वत:संबंधीं कांहीं नवे लिहूं शकत नाहींत हें उघड आहे. तथापि इतर दिशेनें पहावें म्हणून आम्ही प्रयत्न करीत राहिलों तों एक घबाड अवचित हातीं आलें. विनायकरावांचे बंधु डॉ. सावरकर यांनां विनायकरावांनीं अन्दमानाच्या "अंधेरीं" तून धाडलेलीं कांहीं पत्रें डॉ. सावरकरांनीं आमचे हातीं देण्याचे अनेक वेळां आम्हीं निकडच लावल्यानें अंतीं मान्य केलें. या मूळ पत्रांचें महत्व अनेक दृष्टीनें मोठें आहे. तीं एकाच दिवशीं व एकाच मन:स्थितींत लिहिलेलीं नाहींत. ती प्रथमच फांशीं होणार कीं काय असा संभव दिसणाऱ्या भयंकर परिस्थितींत आरंभ होऊन १४ वर्षांच्या अनेक यातनांची, दु:खांची, व उद्वेगांची मनश्चित्रें उमटवित अखेर "मरणोन्मुखशय्येवर" पहुडतांना दिसतात! त्यांतूनही त्या सर्व पत्रांवर सरकारी तुरुंगांतील कठोर परीक्षणाच्या सोळा संस्कारांचे शिक्कामोर्तब होऊन तीं बाहेर पडलेलीं आहेत. तेव्हां त्यांतील वर्णिलेलीं सर्व दु:खें, तुरुंगांत होत असलेले हाल

व अधिकाऱ्यांचें वर्तन हीं अतिरंजित होणें असंभवनीय असुन त्याविषयीं अत्योक्तीच झालेली असली पाहिजे. नाहींतर सरकारी सूक्ष्मदर्शांतून सुटून तीं पत्रें त्यांच्याच अनुज्ञेनें येऊंच शकलीं नसतीं. त्यांच्या पत्रांतील कांहीं पत्रें गहाळ झालेलीं आहेत. कांहीं सरकारी परीक्षकांस न रुचून अंशतः फाडलेलीं व काळया शाईनें फासलेलीं आहेत. तरी देखील जीं व जितकीं हातीं लागून वाचतां येण्याच्या स्थितींत आढळलीं तीं सर्व कुठेंही प्रसिद्ध न झालेलीं पत्रें कालानुक्रमें दिलीं आहेत. त्या त्या वर्षीं काळ्या पाण्याच्या त्या काळयाकुट्ट तुरुंगाचे कोठडींत या प्रख्यात बंदीचे मनांत काय काय विचार घोळत होते हें अंशतः तरी आपणांस ह्या पत्रांनीं कळेल. त्यांत दिलेलीं मतें हीं त्यांचीं त्या त्या वेळचीं मतें होत हें सांगणें नकोच पहिलीं तीन चार पत्रें शिक्षा लागण्याचे आधींचीं असल्यानें तीं प्रथम देऊन मग पुढें अंदमानचीं पत्रें कालानुक्रमानें देणार आहोंत.

मिती आषाढ शु. १ गुरुवार<br>शके १८४६ ता. ३<br>जुलै १९२४.

विश्वनाथ विनायक केळकर,<br>बी. ए एल् एल्. बी.<br>वकील, नागपूर.

नं. ........
ना. ........

## प्रकाशकाचे दोन शब्द.

स्वातंत्र्यवीर विनायकरावजी सावरकर ह्यांच्या तेजस्वी लेखणी-तून आतां नानाविध ग्रंथ बाहेर पडत आहेत आणि ते वाचण्यासाठीं सर्व हिंदु जनतेच्या आणि त्यांतल्या त्यांत तरुणांच्या उड्या पडतात. पण अंदमानच्या अंधेरींत असतांना त्यांनीं आपल्या कनिष्ठ बंधूंना पाठविलेल्या पत्रांचें महत्व कांहीं विशेषच आहे. पत्रांचें प्रसिद्ध झालेलें पुस्तक Echo from Andamans इंग्रजींत असल्यामुळें निव्वळ मराठी वाचकांची फार निराशा होत असे आणि शेंकडो जणांनीं त्याचें मराठी भाषांतर वाचावयास मिळावे अशी आमच्याजवळ उत्कंठा दाखविली म्हणून आम्ही हें भाषांतर प्रसिद्ध करीत आहों. तें प्रसिद्ध करण्याचीं दे. भ. विनायकरावजींनीं आम्हाला अनुज्ञा दिली या साठीं आम्ही त्यांचे अत्यंत आभारी आहों.

तसेंच आमचे मित्र रा. विश्वनाथराव केळकर यांनीं पुस्तकाचें भाषांतर करून आमचा संकल्प तडीस नेण्याला आम्हाला सहाय्य केलें म्हणून त्यांचेही आम्ही फार आभारी आहों.

शेवटीं एका उत्कट देशभक्ताचे अत्यंत हाल अपेष्टा सोशीत असतांना काय विचार होते हें पाहून देशसेवेकडे वाचकांचे अधिक लक्ष वेधल्यास आमच्या प्रयत्नाचें सार्थक झालें असें आम्ही समजूं.

गणेश चतुर्थी } ना. रा. पंढरपूरकर
शके १८४९ } मुद्रक व प्रकाशक.

६. २०४
३
ना. २०।९।२५

॥ श्री ॥

# दे. भ. बॅ. विनायकराव सावरकर यांचीं पत्रें.

( १९०९ सालच्या जून महिन्यांत श्री. गणेशपंत सावरकरांना जन्मठेप काळे पाण्याची कठोर व अप्रतीक्षित शिक्षा एकाएकीं लागली. लवकरच पुढें त्यांचे धाकटे बंधु "बाळ" (डॉ. सावरकर) यांसही वयाचे १९ वे वर्षींच लॉर्ड मिंटोवर फेंकलेल्या बॉंब प्रकरणांत अटक झाली ! या दोन्हीही बातम्या गणेशपंतांच्या पत्नी कै. यशोदाबाई यांनीं आपले दीर विनायकराव यांना विलायतेस कळविल्या. त्या वेळेस विलायतेमध्येंही क्रांतिकारकांची धामधूम चालू असून विनायकरावांवर इंग्रजी प्रमुख पत्रें टाईम्स सुद्धां तुटून पडून त्यांनांहि धरण्याच्या धमक्या देत होतीं. त्यांतच वडील बंधूस यावज्जीवन काळे पाणी झाल्याचें "वहिनींचें" पत्र हातीं पडलें तेव्हां त्या निराधार व संत्रस्त झालेल्या आपल्या दुःखी भावजयीस त्यांनीं घाईघाईनें हें उत्तर लिहून टाकिलें. त्या वेळेस लेखकाचें वय २५ वर्षांचें होतें. )

## पत्र १ लें.

## सांत्वन.

जयासी तुवां प्रतिपाळिलें । मातेचें स्मरण होऊं न दिलें ॥
श्रीमती वहिनी वत्सले । बंधु तुझा तो तुज नमी ॥ १ ॥
आशीर्वादपत्र पावलें । जें लिहिलें तें ध्यानीं आलें ॥
मानस प्रमुदित झालें । धन्यता वाटली उदंड ॥ २ ॥
धन्य धन्य आपुला वंश । सुनिश्चयें ईश्वरी अंश ॥
का[illegible]सेवा पुण्यलेश । आपुल्या भाग्यीं लाधला ॥ ३ ॥

२

अनेक फुलें फुलतीं । फुलोनिया सुकोन जातीं ॥
कोणी त्यांची महती गणती । ठेविली असे ॥ ४ ॥
परी जें गजेंद्रशुंडेनें उपटिलें । श्री हरीसाठीं मेलें ॥
कमल फूल तें अमर ठेलें । मोक्षदायी पावन ॥ ५ ॥
त्या पुण्य गजेंद्रासमची । मुमुक्षु स्थिती भारतीची ॥
करुणारवें ती याची । इंदीवरश्यामा श्रीरामा ॥ ६ ॥
स्वोद्यानीं तिनें यावें । आपुल्या फुलास भुलावें ॥
खुडोनिया अर्पण करावें । श्री रामचरणां ॥ ७ ॥
धन्य धन्य आपुला वंश । सुनिश्चयें ईश्वरी अंश ॥
श्री-राम-सेवा-पुण्य-लेश । आपुल्या भाग्यीं लाधला ॥ ८ ॥

३

अशींच सर्व फुलें खुडावीं ॥ श्री रामचरणीं अर्पण व्हावीं ॥
कांहीं सार्थकता घडावीं । या नश्वर देहाची ॥ ९ ॥
अमर होय ती वंशलता । निर्वंश जीचा देवांकरितां ॥
दिगंतीं पसरे सुगंधता । लोकहितपरिमलाची ॥ १० ॥
सुकुमार आमुच्या अनंत फुलां । गुंफोनि करा हो सुमन माला ॥
नवरात्रीच्या नवकाला । मातृभूमी वत्सले ॥ ११ ॥
एकदां नवरात्र संपली । नवमाला पूर्ण झाली ॥
कुलदेवी प्रकटेल काली । विजया लक्ष्मी पावन ॥ १२ ॥

४

तूं धैर्याची असती मूर्ति । माझे वहिनी, माझे स्फूर्ति ॥
रामसेवाव्रताची पूर्ति । ब्रीद तुझें आधींच ॥ १३ ॥
महत्कार्याचें कंकण धरिलें । आतां महत्तमत्व पाहिजे बाणलें ॥
ऐसें वर्तन पाहिजे केलें । कीं जें पसंत पडलें संतांनां ॥ १४ ॥
अनेक पूर्वज ऋषीश्वर । अजात वंशजांचे संभार ॥
साधु साधु गर्जतील । ऐसें वर्तणें या काला ॥ १५ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे ३ ३४२५

## पत्र २ रें.

( यद्यपि त्यांचे पति श्रीयुत गणेशपंत जन्माचे अंतरून काळे पाण्यास गेलेले व पोटच्या पोराप्रमाणें वाढविलेला त्यांचा लहानगा दीर “ बाळ ” त्याच भीषण आरोपांवरून अटकेंत पडून जन्मठेप काळ्यापाण्याचीच मार्गप्रतीक्षा करीत बसलेला होता, तथापि हा एक कौटुंबिक आशेचा किरण अजून दुरून लकाकत “ वहिनींच्या ” निराशा रात्रीस थोडेसें प्रकाशद्योत होता कीं बॅरिस्टर झालेला आपला मधला दीर लवकरच आपणांस येऊन भेटेल ! पण इतक्यांतच १९१० च्या मार्चमध्यें, वयाच्या २६ व्या वर्षीं विनायकराव हिंदुस्थानचे स्वातंत्र्यार्थ सशस्त्र चळवळ करण्याच्या देहान्त दण्डनीय आरोपावरून विलायतेंत पकडले गेले. तेव्हां या जन्मांत जिची पुन्हां भेट होणें जवळ जवळ असंभवनीय झालेलें होतें त्या आपल्या पूजनीय वहिनीवर आपल्या अटकेच्या वृत्त कथनाचा कुठाराघात करण्याचें कटु कर्तव्य करतांनाच त्यांतील उदात्त आकर्षक दिव्य मर्म व्यक्त करण्यास्तव विनायकरावांनीं लंडनमधील ब्रिक्स्टन जेलमधून आपल्या या जन्मांतला बहुधा शेवटचा होऊं पाहणारा हा निरोप–हें मृत्युपत्र–लिहून धाडिलें होतें. )

## माझें मृत्युपत्र.

वैशाखिचा कुमुदनाथ नभांत हांसे ॥
यच्चंद्रिका धवल सौधतलीं विलासे ॥
वाली स्वयें जल जिला प्रिय बाल लोभें ॥
जाई फुलें, परिमलें सुमनांत शोभे ॥ १ ॥

आले घरीं सकल आप्त सुहृद् जिवाचे ॥
आनंदमग्न कुल गोकुल काय साचें ॥
आदर्श दीप्ति–शुचिता–धृति–यौवनांचें ॥
पाहूनि जें तरुणमंडल, कीर्ति गाचें ॥ २ ॥

प्रेमें हृदें विकसलीं नव यौवनाच्या ॥
गंधें सुवासित उदात्त सुसंस्कृतीच्या ॥
दिव्या लता तरुंसि जें गृह बाग झाला ॥
ज्या पौर हर्षित वदे जन 'धर्म-शाला' ॥ ३ ॥

सैंपाक त्वां निजकरें कुशलें करावा ॥
प्रेमें तुझ्या अधिकची सुरसाल व्हावा ॥
संवाद सर्व मिळुनी करितां नितांत ॥
जेवावयासि बसलों जइं चांदण्यांत ॥ ४ ॥

श्री रामचंद्र-वनवास-कथा रसाला ॥
कीं केंवि देश इटली रिपुमुक्त झाला ॥
तानाजिचा समरधीर तसा पवाडा ॥
गावा चितोरगड वा शनवार वाडा ॥ ५ ॥

झाली कशी प्रियकरा अपुली अनाथा ॥
दुर्दास्यखिन्न शरभिन्न विपन्न माता ॥
शोकें विवंचुनि तिच्या जइं मोचनाचे ॥
केलें अनंत तरुणा उपदेश साचे ॥ ६ ॥

तो काल रम्य, मधुरा प्रिय संगती ती ॥
तें चांदणें, नवकथा-रमणीय रात्रीं ॥
तें ध्येय दिव्य निजमातृ-विमोचनाचें ॥
तो उग्र निश्चयहि, ते उपदेश साचे ॥ ७ ॥

झाल्या तदा प्रियकरांसह आणभाका ॥
त्या सर्व देवि वहिनी स्मरती तुह्मां कां? ॥
'बाजी प्रभू ठरुं' वदे युवसंघ सर्व ॥
'आह्मी चितोरयुवती' युवती सगर्व ॥ ८ ॥

कीं घेतलें व्रत न हें अह्मि अंधतेनें ॥
लब्धप्रकाश इतिहास-निसर्ग-मानें ॥

जें दिव्य, दाहक ह्मणूनि असावयाचें ॥
बुध्याचि वाण धरिलें करिं हें सतीचें ॥ ९ ॥

२

ज्या होति तैं प्रियजनांसह आणभाका ॥
त्यातें स्मरोनि मग सांप्रत हें विलोका ॥
नाहीं पुरी उलटलीं जरि आठ वर्षें ॥
तों कार्यसिद्धि इतुकी मन कां न हर्षें? ॥ १० ॥

आसेतु पर्वत उचंबळला स्वदेश ॥
वीराकृती धरित टाकुनि दीनवेष ॥
भक्तांचिया रघुपदीं झुलताति झुंडी ॥
जाज्वल्य होयहि हुताशन यज्ञकुंडीं ॥ ११ ॥

तो यज्ञ सिद्ध करण्यास्तव उग्र दीक्षा ॥
जे घेति येई तइं तत्कृतिची परीक्षा ॥
"विश्वाचिया अखिल मंगल धारणाला ॥
बोला असे कवण भक्ष्य हुताशनाला?" ॥ १२ ॥

आमंत्रण प्रभु रघूत्तम सोडितां हें ॥
"दिव्यार्थ, देव! अमुचें कुल सज्ज आहे" ॥
हें साध्वि, गर्जुनि असें पहिल्या हवीचा ॥
ह्या ईश्वरी मिळविला अह्मि मान साचा ॥ १३ ॥

'धर्मार्थ देह' वदलों, ठरलें नितांत ॥
ते बोल फोल नचि बालिश बायकांत ॥
ना भंगली भिउनिया धृति यातनानां ॥
निष्काम-कर्मरति योगहि खंडिला ना ॥ १४ ॥

ज्या होति तैं प्रियजनांसह आणभाका ॥
केल्याचि सत्य कृतिनें अजि ह्या विलोका ॥

दीप्तानलांत निजमातृ-विमोचनार्थ ॥
हा स्वार्थ जाळुनि अह्मी ठरलों कृतार्थ ॥ १५ ॥

३

हे मातृभूमि, तुजला मन वाहियेलें ॥
वक्तृत्व-वाग्विभवही तुज अर्पियेलें ॥
तूंतेंचि अर्पिलि नवी कविता रसाला ॥
लेखांप्रती विषय तूंचि अनन्य झाला ॥ १६ ॥

त्वत्स्थंडिलीं ढकलिलें प्रिय मित्रसंघा ॥
केलें स्वयें दहन यौवन-देह-भोगा ॥
त्वत्कार्य नैतिक, सुसंमत सर्व देवां ॥
त्वत्सेवनींच गमली रघुवीरसेवा ॥ १७ ॥

त्वत्स्थंडिलीं ढकलिली गृह-वित्त-सत्ता ॥
दावानलांत वहिनी, नवपुत्र, कांता ॥
त्वत्स्थंडिलीं अतुल-धैर्य वरिष्ठ बंधु ॥
केला हवी परम कारुण पुण्यसिंधु ॥ १८ ॥

त्वत्स्थंडिलावरि बळी प्रिय बाल झाला ॥
त्वत्स्थंडिलीं बघ अतां मम देह ठेला ॥
हें काय, बंधु असतों जरि सात आह्मीं ॥
त्वत्स्थंडिलींच असते दिधले बळी मी ॥ १९ ॥

संतान या भरतभूमिस तीस कोटी ॥
जे मातृभक्ति-रत सज्जन धन्य होती ॥
हें आपुलें कुलहि त्यामधिं ईश्वरांश ॥
निर्वंश होउनि ठरेल अखंडवंश ॥ २० ॥

४

कीं तें ठरोहि अथवा न ठरो परंतु ॥
हे मातृभू, आह्मि असों परिपूर्णहेतू ॥

दीप्तानलांत निजमातृ-विमोचनार्थ ॥
हा स्वार्थ जाळुनि अह्मी ठरलों कृतार्थ ॥ २१ ॥

ऐसें विवचुंनि अहो वहिनी व्रतातें ॥
पाळोनि वर्धन करा कुलदिव्यतेतें ॥
श्रीपार्वती तप करी हिमपर्वतीं ती ॥
कीं विस्तवांत हसल्या बहु राजपूती ॥ २२ ॥

तें भारतीय अबलाबलतेज कांहीं ॥
अद्यापि या भरतभूमिंत लुप्त नाहीं ॥
हें सिद्ध होइल असेंच उदार, उग्र ॥
वीरांगने तव सुवर्तन हो समग्र ॥ २३ ॥

माझा निरोप तुज येथुनि हाच देवि ॥
हा वत्स वत्सल तुझ्या पदिं शीर्ष ठेवी ॥
सप्रेम अर्पण असो प्रणती तुह्मांतें ॥
आलिंगन प्रियकरा मम अंगनेतें ॥ २४ ॥

कीं घेतलें व्रत न हें अम्हि अंधतेनें ॥
लब्धप्रकाश इतिहास-निसर्ग-मानें ॥
जें दिव्य दाहक म्हणूनि असावयाचें ॥
बुध्याचि वाण धरिलें करि हें सतीचें ॥ २५ ॥



# पत्र ३ रें.

# निरोप.

:०:

( हा निरोप श्री. विनायकराव सावरकर त्यांनीं पारीस मधील आपल्या स्नेह्यांना आणि सहकार्यकर्त्यांना लंडनहून प्रख्यात ब्रिक्स्टनच्या तुरुंगांतून एक विरुद्ध दोन मतानें त्यांना हिंदुस्थानांत चौकशीसाठीं पाठवावयाचें ठरलें त्या रात्रीं स. १९१० मध्यें पाठविला होता. )

( १ )

दिव्य मातृसेवाव्रताच्या ईश्वरी दीक्षेमध्यें सहभागी झाल्यामुळें मधुरतर झालेल्या मधुमय मैत्रीच्या रेशमी धाग्यांनीं ज्यांचीं हृदयें हृदयाशीं निगडित झालीं आहेत अशा मित्रांनों, हा तुम्हाला माझा अखेरचा प्रणाम ! कळ्यांतील सुवासाला हळूच जागें करणाऱ्या प्रातःकाळच्या दंवबिंदूंप्रमाणें टवटवीत पण तसाच नाजुक असा हा निरोपाचा प्रणाम स्वीकारा ! रामराम ! रामराम !!

( २ )

विधात्यानें नेमून दिलेलीं आपलीं कामें करण्यासाठीं आपण दूर होतों आहों. तीं कामें करीत असतांना केव्हां आपण पेटत्या खडकावर जखडलें आणि कोंडलें जाऊं तर केव्हां कीर्तीच्या उसळत्या लाटावर झोकें घेत असूं; क्षणांत दिसूं तर क्षणांत बेपत्ता होऊं; कधीं शिखरावर असूं तर कधीं तळाशीं दडपलें जाऊं ! त्या सेनानायकानें कोठेंहि स्थान आपल्याला नेमून दिलेलें असो पण तेथेंही सर्वोत्कृष्टच ठरूं; जणूं काय त्या जागीं तसें काम करणें हेंच केवळ आपलें जीवनकार्य आहे!

एकाद्या प्रतिभापूर्ण पौर्वात्य कवीच्या महानाटकांत भरतवाक्याच्या वेळेला मृत किंवा जिवंत सर्वच पात्रें एकत्र होतात त्याप्रमाणें हें आपण असंख्य नट इतिहासाच्या विस्तृत रंगभूमीवर संतुष्ट झालेला समग्र मनुष्य जातीचा प्रेक्षक

वा.ई.७९



वर्ग कृतज्ञ यशोगर्जनांनीं आणि तालिकांनीं दऱ्याखोरीं निनादित करीत असतांना पुनः एकदां सर्व एकत्र जमूं.

तोंपर्यंत माझ्या जिवाच्या सख्यांनो ! राम राम ! राम राम !!

( ३ )

माझ्या गरिबाच्या अस्थि कोठेंही पडोत—ज्याचा आक्रोश करणारा प्रवाह भोंवतालच्या भयाणतेला भेसूर वाचा फोडतो अशा अंदमान मधील एकाद्या उदास ओढ्यामध्यें तीं फेकलीं गेलेलीं असोत किंवा ज्याच्यामध्यें तारासुंदरी आपला मध्यरात्रीच्या नृत्याचा फेर धरतात अशा श्रीगंगेच्या स्फटिकासारख्या पावन प्रवाहानें त्यांना आपल्या हृदयांशिं जपून बाळगलेलें असो—जेव्हां विजयाच्या तुताऱ्यांचा विश्वंकष ध्वनि उच्चरवानें गर्जना करून उठेल कीं "श्री रामचंद्रानें त्याच्या आवडत्या लोकांच्या मस्तकावर कधीं न कोमेजणारा सोनेरी यशःकिरीट चढवला आहे ! आजपर्यंत बोकाळणाऱ्या समंधाला जेथून तो पहिल्यानें बाहेर पडला त्या समुद्रापर्यंत परत मागें पिटीत गाडून टाकलें आहे ! आणि पहा ती आपली आई हिंददेवी संपूर्ण मनुष्यजातीला मार्ग दाखवणाऱ्या दीपस्तंभाप्रमाणें ऐश्वर्यानें उभी आहे ! तेव्हां ह्या कार्यांत आत्महवन करणाऱ्या धारकऱ्यांनो आणि वारकऱ्यांनो, उठा ! ज्या युद्धांत तुह्मी लढला आणि कामाला आला तें युद्ध आतां जिंकलें गेलें आहे !" त्या वेळीं माझ्या त्या अस्थि पुनः चैतन्यानें पेटून प्रदीप्त होतील !

तोंपर्यंत माझ्या प्रीतीच्या पांखरांनो ! रामराम ! रामराम !

( ४ )

अगदीं डोळा लागूं न देतां आपल्या मातृभूमीच्या प्रगतीकडे दृष्टी ठेवा. आणि ही प्रगति, इतकें काम झालें किंवा इतका प्रयत्न झाला ह्याच्यावरून न ठरवतां आपल्या लोकांनीं किती आत्मयज्ञ केला, किती क्लेश सहन करण्याचें सामर्थ्य त्यांनीं दाखवलें ह्याच्यावरून ठरवावयाला शिका. कारण कार्य होणें हा योगायोग आहे; आत्मदान हा मात्र निश्चित नियम आहे—ज्याच्यावर नवीम व भव्य आणि हुतात्म्यांच्या रक्षेंत त्यांचीं मुळें रुजलीं गेलीं असल्यामुळेंच केवळ भव्य-अशा राज्यांचीं

प्रचंड गोपुरें उभारतां येतील असा भक्कम पाया आहे. अशा रीतीनें ईश्वरी चैतन्य पुनः परत येईपर्यंत, देवकार्य यशस्वी होईपर्यंत, हुतात्म्यांची रक्तमाला किंवा विजेत्याचा किरीट हस्तगत करीपर्यंत एकसारखें काम करीत रहा. रामराम ! रामराम !

---

## पत्र ४ थें.

( १९१० सालचा डिसेंबर ! उद्यां खटल्याचा निर्णय लागून फांशीची व काळे पाण्याची खिरापत आरोपितांत वाटली जाणार ! सर्व आरोपित देशभक्तांत विनायकरावांनां सर्वांत कठोरतम शिक्षा मिळून त्यांचे स्वतंत्र आयुष्याचा अंत होणार हेंहि निश्चित. केवळ प्रश्न इतकाच कीं, वधगृहांत कीं क्वचित् त्याहूनही कष्टप्रद असणाऱ्या यावज्जीवन बंदीगृहांत ? त्या दिवशीं विनायकरावनीं आपल्या आयुष्याचा अंत असा संन्निध पाहून आपल्या सहाभियुक्त ( co-accused ) देशभक्तांत जे शीघ्रच सुटण्याचा संभव होता त्यांचे हस्तें आपल्या मातृभूमीस व ज्ञातिबांधवांस त्यांच्या ऋणाच्या फेडींतला हा "पहिला हप्ता" असा भरपाई करून धाडला. ! )

## पहिला हप्ता.

मानुनि घे साची । अल्प स्वल्प तरि सेवा अपुल्या अर्भक
बालांची ॥ धृ० ॥
ऋण हें बहु झालें । तुझ्या स्तनींचें स्तन्य पाजुनी धन्य अह्मां
केलें ॥ जननि गे, धन्य अह्मां केलें ॥
ऋण तें फेडाया । हप्ता पहिला तप्त स्थंडिलीं देह अर्पितों हा ॥
जननि गे, देह० ॥
सर्वेंचि जन्मुनियां । त्वन्मोचन-हवनांत हवी करूं पुनः पुन्हां
देहा ॥ जननि गे, पुनः पुन्हां० ॥

बा.ई.२०९



चाल ॥ सारथी जिचा अभिमानी । कृष्णजी आणि । राम सेनानी ॥

आशि तीस कोटि तव सेना ॥
ती अह्मा विना थांबेना ॥
परि करूनि दुष्ट-दलदलना ॥

रोंविलची स्वकरीं । स्वातंत्र्याच्या हिमालयावरि झेंडा जरतारी ॥
जननि गे ॥

(तरिहि तूं) मानुनि घे साची । अल्प स्वल्प ही सेवा अपुल्या
अर्भक बालांची ॥ जननि गे ॥

---

# पत्र ५ वें.

( १९११ च्या जूनमध्यें जेव्हां श्री. सावरकरांना दोन जन्म ठेपांची शिक्षा झाली आणि त्यांचे ज्येष्ठ बंधु गणेशपंत ह्यांच्या बरोबर त्यांनां हद्दपार करून अंदमानच्या तुरुंगाच्या कोठडींत कोंडण्यांत आलें तेव्हां त्यांचे कनिष्ठ बंधु डॉ. नारायणराव सावरकर हे हिंदुस्थांनांतील तुरुंगांत ६ महिन्याच्या सक्त मजुरीची शिक्षा भोगीत होते. श्री. विनायकरावनां ज्याला पत्र पाठवितां येईल असें त्यावेळीं कोणीच तुरुंगाच्या बाहेर राहिलें नव्हतें. कारण त्यांच्याशीं पत्र व्यवहार असणें हें पोलीसच्या दृष्टीला येऊन त्यांच्या 'काळ्या बुकांत' नांव नोंदलें जावयाला पुरेसें होतें. तेव्हां आपल्या कनिष्ठ बंधूंची मुक्तता होऊन आणि ते कुठें तरी स्थिर होऊन त्यांच्याशीं नियमितपणें पत्रव्यवहार सुरू करतां येईपर्यंत, पत्र लिहून दुसऱ्या कोणाला आपत्तींत पाडण्याची श्री. विनायकरावांची साहाजिकच इच्छा नव्हती. पुढें दिलेलीं सर्व पत्रें अंदमानहून पाठविलीं आहेत आणि तेथील तुरुंगाच्या अधिकाऱ्यांच्या परीक्षणांतून निर्दोष ठरून तीं बाहेर पडलीं आहेत. श्री. सावरकरांना उभ्या वर्षांत सबंध एक पत्र लिहावयाची परवानगी होती ! )

१२

॥ ॐ ॥

तुरुंगाची कोठडी, पोर्टब्लेअर
ता. १५-१२-१९१२

प्रियतम बंधु,

अशा रीतीनें १८ महिन्यानंतर दौतीला आणि लेखणीला स्पर्श करावयाची संधि मिळते आहे. ह्या गतीनें लिहिण्याची कला कोणालाही लवकरच विसरतां येईल! झालेल्या ह्या उशीरामुळें तूं फार काळजी करीत असशील. पण प्रियतम बाबांनीं तुला जुलईमध्यें पत्र पाठविलें होतें! तेव्हां मी विचार केला कीं दोघां कडून एकदमच पत्रें येण्यापेक्षां कांहीं अंतरानें पत्रें आलीं तर तूं तितका निर्धास्त होशील. तूं मेडिकल कॉलेजांत गेलास आणि तेथें तुझें चांगलें चाललें आहे हें वाचून मला किती आनंद झाला! तुला तें शिक्षण कसें आवडतें? माझ्या मतानें तें फार उदात्त आहे. आपलें विशेष अभ्यासक्षेत्र म्हणून नुसतें वैद्यकच नाहीं तर समग्र प्राणिशास्त्रच तूं शिकविस असें मला वाटतें. केवळ धंद्यापुरतेंच नाहीं तर आयुष्यांतलें एक साध्य ह्या दृष्टीनें तूं त्याच्यामागें लाग. ह्या शास्त्राच्या योगानें जनसेवेचें आणि लोकोपकाराचें अमर्याद क्षेत्र आपल्याला मोकळें मिळतें. त्याला सर्व जगभर मान आहे; हॉटेंटॉट्सना जितकें तें आदरणीय आहे तितकेंच तें आर्यांना पूज्य आहे. शरीराच्या–आत्मा ज्या देवळांत राहतो त्या देवघराच्या-अभ्यासाची योग्यता आत्म्याच्याच केवळ अभ्यासाच्या खालोखाल आहे.

तुझी गेल्या वर्षाची पुस्तकांची निवड उत्कृष्ट होती. मोरोपंत, भारत, विवेकानंद-सर्व जगन्मान्य पुस्तकें. मी मागवलेल्या पुस्तकांपैकीं केवळ ज्ञेयमीमांसा आणि अज्ञेममीमांसा हीं आलीं नाहींत. असें कां? ह्या वर्षासाठींही मी तालिका पाठविली आहे; पण माझ्या पुस्तकांसाठीं १० रुपयांपेक्षां अधिक खर्च करूं नकोस. आकार वाढत असेल तर खालपासून क्रमानें एक एक वगळीत जा. सर्व पुस्तकें नवीनच घेतलीं पाहिजेत असें नाहीं. कांहीं जुनीं पाठवलीं तरी चालतील.

बरें तुला बंगाल कसा काय आवडतो? दुर्गापूजेची सुट्टी संपून तूं आतां कलकत्त्याला गेला असशील–आणि थेट बंगाली बाबू बनला असशील-नाहीं कां?

मराठी भाषा विसरलास का? दुसरें तरी कांहीं न विसरावयाची काळजी घे! कारण मला मोठी धास्ती वाटते कीं त्या हुषार बंगाल्यांपैकीं कोणी तुझें हृदय चोरलें आहे अशी वार्ता केव्हांही ऐकावयाची मी माझ्या मनाची सिद्धता केली पाहिजे! बाकी मला एकादी बंगाली भावजय मिळाली तर मला तरी फार आवडेल. आपल्या राष्ट्रीय जीवनाच्या सध्याच्या स्थितींत युरोपीअन मुलींशीं विवाहसंबंध जोडण्याच्या मी जितका पक्का विरुद्ध आहे तितकाच प्रांतांप्रांतांतील ह्या लग्नांचा मी पुरस्कर्ता आहे.

आतां बाळ, थोडेसें माझ्या संबंधीं लिहितों. माझी प्रकृति चांगली आहे. ह्या तुरुंगांत आल्यापासून मोठें असें दुखणें मला कधीं झालें नाहीं आणि मी येथें आलों त्यापेक्षां माझें वजनही मी घटूं दिलें नाहीं. शरीरानें-मनानें-दोन्ही बाजूंनीं माझें ठीक चाललें आहे. लाडक्या, मी अगदीं सत्य लिहितों आहें, कांहीं गोष्टींत तर प्रकृति इतकी चांगली आहे कीं पूर्वीं कधीं तशी नव्हती! कारण तुरुंगांतलें आयुष्य म्हणजे चांगलें व्हावयची म्हण किंवा वाईट व्हावयची म्हण अद्वितीय संधि आहे. मनुष्य जसा आंत येतो तसाच तुरुंगाच्या बाहेर कधीं पडत नाहीं. एक तर तो फार सुधारलेला असतो नाहीं तर तितकाच अधोगतीला गेलेला असतो. देवमार्गाला लागतो नाहीं तर राक्षस तरी बनतो. माझ्या सुदैवानें, माझ्या मनानें ह्या बदललेल्या परिस्थितीशीं लागलींच आपल्याला जुळवून घेतलें. इतक्या अस्वस्थ, इतक्या उद्योगी–जगभर वावरणाऱ्या–स्वभावाला बारा फूट लांबीच्या कोठडींत अगदीं घरच्या सारखें स्वस्थ वाटावें म्हणजे मौज आहे नाहीं? आयुष्याच्या नित्य बदलत्या परिस्थितीशीं आपल्याला जुळवून घेण्याचा, तद्रूप बनावयाचा, हा मानवी मनाचा धर्म ही परमेश्वरानें मनुष्य जातीला दिलेली अत्यंत दयामय देणगी आहे!

सकाळच्या पूर्वीं आणि संध्याकाळच्या नंतर जेव्हां मी थोडासा प्राणायाम करतों आणि तो करतां करतांच गोड आणि गाढ झोंप लागते–त्या वेळची ती विश्रांति किती स्वस्थ आणि शांत असते! इतकी शांत कीं सकाळीं जेव्हां मला जाग येतो तेव्हां किती तरी वेळ मी तुरुंगांत आहे आणि लांकडी फळ्यांवर पहुडलों आहें ह्याची जाणीव येत नाहीं! मनुष्याच्या आयुष्यांतील सामान्य उद्देश आणि विलोभनें दूर दडून बसल्यामुळें सदसद्विवेकबुद्धि, श्री रामचंद्रांच्या ध्वजेखालीं

आपण पाइकी केली आणि तीही कांहीं तरी कामगिरी बजावून केली ह्या जाणीवेनें आपल्याशीं पूर्ण संतुष्ट असते. आत्म्याच्या भोंवतीं शांत व मधुर समरसता पसरते आणि ती मनाला थोपटींत थोपटींत गाढ शांतीमध्यें विलीन करतो! ह्याला अपवाद नाहींत असें नाहीं, पण हा सामान्य नियम आहे. खरोखरच मला वाटतें आतां जर मुंबईंत किंवा लंडनमध्यें एकाएकीं मी जाऊन पडलों तर शांकुतलांतल्या ऋषिपुत्राप्रमाणें मीही एकदम ओरडून उठेन– "जनाकीर्णं मन्ये हुतवहपरीतं गृहमिव!"

आणि बाळ, लोकांच्या तोंडचे उद्गार ऐकून "तरी पण ते बाहेर असते तर त्यांचें जीवनचरित्र ह्यापेक्षां किती तरी उपयुक्त आणि तेजस्वी झालें असतें" अशा विचारांनीं तुझें मन कधीं उद्विग्न झालें तर हें लक्ष्यांत असूं दे कीं 'जें बाहेर काम करतात ते पुष्कळ कार्य करतात, पण जे तुरुंगांत खपतात ते त्यांच्यापेक्षां अधिक कार्य करतात!' आणि तसेंच म्हटलें तर बाळ, तुला असें नाहीं वाटत कीं आत्मदान हें कार्यच आहे–आणि तें अधिक सुक्ष्म असल्यामुळें अधिक उत्कट आहे!

सकाळीं ५ वाजतां घंटा होते तेव्हां मी उठतों. तिचा नाद ऐकल्या बरोबर उच्च प्रतीच्या अभ्यासक्रमासाठीं आतां आपण वरिष्ठ विद्यालयांत प्रवेश करतों आहों असा मला भास होतो. मग १० वाजेपर्यंत आम्ही आमचें सक्त मजुरीचें काम करतों. इकडे माझे हात आणि पाय यंत्राप्रमाणें नेमलेलें काम करीत असतांना तिकडे मन सर्वांचा डोळा चुकवून सकाळची सहल करावयाला बाहेर पडतें आणि सागर महासागर उल्लंघीत आणि दऱ्या खोऱ्यांतून भटकत फुला फुलांतून फिरणाऱ्या भ्रमराप्रमाणें फक्त मधुमय वस्तूंचा आस्वाद घेत तें भ्रमत असतें! त्यानंतर मी कांहीं नवीन कविता करतों. मग आमचें जेवण होऊन १२ वाजतां पुनः आम्ही कामाला लागतों. ४ वाजल्यानंतर मग विश्रांति, वाचन, इत्यादि. हा माझा येथला नेहमींचा दिनक्रम आहे.

तुझ्या पत्रांत आपल्या प्रिय मातृभूमीची काय हालचाल आहे ती लिहावयाला विसरूं नकोस. राष्ट्रीय सभेमध्यें एकी आहे कां? १९१० मध्यें प्रयागला केलेल्या ठरावाप्रमाणें दरवर्षी राजकीय कैद्यांच्या मुक्ततेचा ठराव राष्ट्रीय

सभेंत होतो कां ? टाटांचा लोखंडाचा कारखाना, स्टीम नॅव्हिगेशन कंपनी किंवा नवीन गिरण्या अशासारखा एकादा आणखी स्वदेशी प्रचंड उद्योग निघाला कां ? चीनचें प्रजासत्ताक राज्य कसें चाललें आहे ? कल्पनेतलें रामराज्य प्रत्यक्षांत आल्यासारखें हें वाटतें नाहीं ?—इतिहासाची ही कादंबरी आहे ! चीनचें हें कार्य एका दिवसाचें आहे असें समजूं नकोस. थेट १८५० सालापासून त्यांची ही अविश्रांत धडपड चालली आहे. पण सूर्य कोठें आहे ह्याचा—तो प्रत्यक्ष उगवे पर्यंत—जगाला पत्ता नसतो ! इराण, पोर्तुगल, मिसर ह्यांचें कसें चाललें आहे ? तसेंच दक्षिण अफ्रिकेंतल्या हिंदी बांधवांना त्यांच्या मागण्यांच्या बाबतींत कांहीं यश आलें का ? नवीन कायदेमंडळानें गोखल्यांच्या शिक्षण विषयक ठरावासारखा एकादा महत्वाचा कायदा केला असल्यास अवश्य कळव. त्या महनीय विभूतीची—लो. टिळकांची—मुक्तता केव्हां होणार ?

तूं माझें पत्र प्रिय यमुनेला दाखविलेंस का ? तिला त्याचें समग्र भाषांतर करून सांग. आणखी थोडीं वर्षें—फार तर पांच—म्हणजे पुनः सुप्रभात होईल ! तेव्हां प्रियतम, आतांपर्यंत धीरोदात्ततेनें जसे दिवस काढलेस तसे आणखी हे काढ. माझ्या प्रियतम वहिनींना माझे अत्यंत पूज्य प्रणाम. ह्या पूर्वीं आणि आतांही आपल्या आशीर्वादमय प्रेमानें ती एकदमच मला माता, भगिनी आणि सखी ह्यांच्या स्थानीं होती आणि आहे. आणखी इतर मंडळी-त्यांच्या स्मरणानें माझें हृदय भरून येतें आहे, पण त्यांचें नांव घेतां येत नाहीं !-त्यांना सांग त्यांच्यापैकी प्रत्येकाच्या-त्या सर्वांच्या-मला आठवणी येतात ! मी त्यांना विसरणें कसें शक्य आहे ? नाहीं, तुरुंगांत पडलेल्या व्यक्तीला विसरणें शक्य नाहीं ! नवीन विषय बंद झाल्यामुळें जुन्या विषयांचेंच मनास चर्वण करावें लागतें, आणि म्हणून तुरुंगांत जुन्या ओळखी विसरण्याच्या ऐवजी त्या अधिक दृढ होतात; इतकेंच नाहीं तर पूर्वी स्मृतिपटावरून नाहींशा झालेल्या व्यक्तींच्या बद्दलही प्रेम वाटूं लागतें ! माझ्या जिवलग मित्रांनो, तुरुंगांत आंसवावर आंसवें गाळलीं तरी कोणी येऊन ते अश्रु पुसील—एक प्रेमाचा, मायेचा शब्द बोलेल-ह्याची वाटच पहात बसावें लागतें ! तुरुंगात मी कोणालाही विसरणें कसें शक्य आहे ? माझे आवडते सखे, सहकारी, प्राणाहुन प्रिय, ते सर्व तुला ठाऊक आहेत, त्यांना मी अत्यंत प्रेमानें त्यांची आठवण केली म्हणून सांग. आणि ज्या वेळीं रक्ताचा संबंध सुद्धा नाकारावयाला कांहींना

लाज वाटली नाहीं त्यावेळींही जे तुझ्या पाठीशीं उभे राहिले आणि ज्यांना माझी आठवण येते त्यांना मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे म्हणून कळव. तुरुंगांतून आलेलें पत्र म्हणजे कमी अधिक प्रमाणांत ठराविक साच्यांतच आलें पाहिजे हें ते जाणतातच आहेत-तेव्हां नांवें घेत नाहीं. प्रिय माईला माझे आशीर्वाद आणि तिच्या लहानग्या वंसताला माझ्या शुभाशा दे. तसेंच प्रिय मामींना आणि चि. चंपूलाही नमस्कार आणि आशीर्वाद सांग.

तुझा प्रिय भाऊ
**तात्या,**

---

# पत्र ६ वें.

॥ ॐ ॥

॥ श्रीराम ॥

तुरुंगाची कोठडी-पोर्ट ब्लेअर
ता. १५-१२-२४

**माझ्या लाडक्या बाळा,**

आतां ये असा-एक वर्ष सरून गेलें आणि आनंदाचा दिवस पुनः उगवला आहे ! घरून पत्र यावयाचें-घरीं पत्र लिहावयाचें-म्हणजे त्यांत किती ब्रह्मानंद सांठवला असतो ह्याची पूर्ण कल्पना जे तुरुंगांत कधीं गेले नाहींत त्यांना केव्हांही व्हावयाची नाहीं !! गोड-समुद्राच्या वाळवंटावर, चांदण्याच्या प्रकाशांत, आपल्या प्रेमाच्या जिवाभावाच्या माणसाशीं, केलेल्या आलापांतल्या माधुर्या सारखें मधुमय, पण थांब-घंटा झाली मला जेवायला गेलें पाहिजे. हे दहा वाजले !—हं; तुरुंगवासीयांच्या सार्वजनिक भोजनालयांतून जेवण आटोपून मी आतां परत आलों आहें.—मी काय लिहित होतों ? हो, हा पत्रलेखनाचा प्रसंग अत्यंत गोड वाटतो. घरीं पत्र लिहावयाचा दिवस हाच मला खरा पाडवा, वर्ष प्रतिपदेचा दिवस, वाटतो ! मी माझ्या वर्ष गणनेचा प्रारंभ ह्या दिवसापासून करतों ! कारण आज माझ्या आवडीच्या आत्मीयांशी झालेल्या एकतानतेनें

येणाऱ्या उत्साहामुळें आणि सामर्थ्यामुळें मला पुढें एक वर्षभर श्वासोच्छ्वास करतां येतो, जगतां येतें, हासतां खेळतां येतें ! ह्याच्या आधीं पत्र लिहिलें नाहीं आणि त्यामुळें तुला तार करावी लागली ह्याबद्दल मला वाईट वाटतें. येथल्या अधिकाऱ्यांनीं मेहरबानीनें मला ही गोष्ट कळवली. पण बाळ, वर्ष झालें आणि पत्र पाठवावयाचा अधिकार प्राप्त झाला तरी आमची येथली कल्पापुर्वीची टपालखात्याची व्यवस्था अशी आहे कीं येथून ५।६ आठवडे आणखी गेल्याविना कलकत्त्याला पत्रच जात नाहीं असें मी ऐकतों. ह्यामुळें तसे १४ महिने होईपर्यंत पत्र धाडतां येत नाहीं ! पण तूं पाठविलेलें कोणचेंही पत्र ह्या विसाव्या शतकांतल्या पूर्ण त्वरेनें येथें येऊन पोचतें. तुझ्या पत्रावरून तुझी प्रकृती चांगली आहे आणि तूं उत्कृष्ट रीतीनें परीक्षेंत उत्तीर्ण झालास हें वाचून मला फार आनंद वाटला. परीक्षा साधो व न साधो प्रकृतीची अगदीं हेळसांड होतां कामा नये. अं हं ! तुला धडधाकट, आरोग्य-प्रफुल्लता-उत्साह आंतून उसळी मारतात आहेत असें, पहावें असें वाटतें ! तुझ्यांत नुकतेंच उसळू लागलेलें नव तारुण्य हें चैतन्याचा आणि उत्साहाचा मूळ झरा आहे. कोणच्याही एका अवयवाला इतरांपेक्षां जास्त शिणवून तो नासून टाकूं नकोस. शरीरानें आणि मेंदूनें, दोन्ही बाजूंनीं, सारखाच वाढत जा. तूं स्वतःच डॉक्टर आहेस तेव्हां आमच्यासारख्या अतज्ञ माणसांनीं तुझ्याशीं आरोग्याबद्दल बोलावयाचें ह्मणजे धार्ष्ट्य आहे ! पण, यौवन अंधळें असतें ! उत्साहशक्तीचा झरा आंतून वाहत असतो आणि हें शरीर वाढीला लागलेलें असतें तेव्हांच चैतन्य आणि उत्साह याचा भरपूर सांठा संग्रहीं टाकावा ह्मणजे आयुष्याच्या हिंवाळ्यांत खर्च करावयाला उपयोग होईल ही गोष्ट तें विसरतें ! तुझी दृष्टि अधु झालेली आढळली, लव्हाळ्या सारखी तुझी शरीरयष्टि लिवलिवीत दिसूं लागली तर मी एकदम ओरडेन 'वैद्य महाराज, आधीं स्वतःची तनदुरुस्ती करा ' ! ( गालांतल्या गालांत हासूं नकोस लबाडा– मी कांहीं वैद्य नाहीं. तेव्हां आह्मी आपली दृष्टि बिघडवूं शकतों! ) माझी लाडकीं कोंकरें बी. ए. आणि एम्. ए. ची परीक्षा पहिल्या वर्गांत उत्तीर्ण झालीं हें वाचून मला किती अभिमान वाटला ! हें कौतुकास्पद झालें. पण आतां त्यांच्यापुढें पसरलेल्या कर्तव्याच्या रणक्षेत्रांत असेंच लढून त्यांनीं असेंच जिंकलें आणि तेथेंही तेथलीं सुवर्ण पदकें प्रदान करावयाला योग्य ह्मणून

त्यांची निवड झाली तर तें अधिक उदात्त होईल ! कारण, मानव्याच्या विश्व-संस्थेच्या त्या सुवर्ण पदकांसमोर ही तुमच्या विश्वविद्यालयाचीं सुवर्ण पदकें म्हणजे तुकलुपी तुकडे आहेत. त्यांच्या हातचीं पत्रें वाचावयास मिळालीं तर मला फार आनंद वाटेल. कारण आज दिवसांपर्यंत त्यांच्यापैकीं कांहींचीं आठवण स्मरणांतून जातच नाहीं. आपण होऊन जे तुला तसें कळवतील त्यांच्याचविषयीं नांवानें आणि निर्देश करून मला लिही.

तूं पाठविलेलीं पुस्तकें अगदीं अप्रतिम आहेत. **महात्मा परिचय** भाषांतर किती सुंदर आहे ! आणि ती दोनच ओळींची प्रस्तावना; किती विनयशील आणि किती समर्पक—" फोडिलें भांडार, धन्याचा हा माल, मी तंव हमाल, भार वाही " !! मला तें फारच आवडलें. आणि **जाईचा मंडप**—दहा बारा पानापर्यंत मी गेलों नाहीं तोंच त्यांतल्या प्रत्येक शब्दाबरोबर माझ्या हृदयांतून संवादी सूर निघूं लागले आणि तें कोणी लिहिलें असावें ह्याची मला जाणीव झाली ! योजिलेली भाषा आंतील भावनांना साजेशी आहे, प्रदर्शित केलेल्या काव्यमय आणि उदात्त भावना संविधानकाला शोभतील अशाच आहेत आणि संविधानक दोहोंच्याही योग्यतेचें आहे. भारत-गौरवग्रंथमाले सारख्या लोकप्रिय मालांनीं लोकांच्या अभिरूचीप्रमाणें आपण न वाहवतां तिला चांगलें वळण देण्याची आपली जबबदारी ओळखून मधून मधून राजकीय इतिहास, विज्ञान, अर्थशास्त्र, मिलची प्रातिनिधिक राजसत्ता अशा प्रकारचीं पुस्तकें प्रसिद्ध करणें अवश्य आहे. वेदांत तत्वज्ञानावरच्या पुस्तकांसंबंधीं सांगावयाचें म्हणजे आपल्या लोकांनीं असल्या गोष्टींत लक्ष घालणें ह्या काळीं अनुचित आहे. अमेरिकेला वेदांत तत्वज्ञानाची अवश्यकता आहे; इग्लंडातही तशीच आहे. कारण त्यांनीं आपला जीवनक्रम परिणत, ऐश्वर्यसंपन्न आणि पौरुषपूर्ण केला आहे. त्यांचें क्षत्रीयत्व संपादित झालें आहे; आणि ते, ज्या अवस्थेंत गेलें तरच तें तत्वज्ञान समजावयाचें आणि अनुभवावयाचें सामर्थ्य येतें त्या, ब्राम्हण्याच्या सीमारेषेवर गेले आहेत. हिंदुस्थानचें तसें नाहीं. आपण सर्व आज शूद्रावस्थेंत आहोंत; आणि वेद किंवा वेदांत ह्यांना स्पर्श करावयाचा आपल्याला अधिकार नाहीं !

शूद्रांना वेदपठणाला अनधिकारी गणावयाच्या मुळाशीं ही कल्पना आहे. हा निषेध निष्ठुरपणानें किंवा संकुचित स्वार्थबुद्धिनें घातलेला नाहीं. तसें असतें तर त्याच ब्राम्हणांनीं ज्यांच्यांत त्याच तत्वज्ञानाचें अत्यंत सौकर्यानें विवरण केलेलें आहे ते पुराणग्रंथ त्यांच्यासाठीं लिहिले नसते? आपण राष्ट्र ह्या दृष्टीनें त्या उदात्त कल्पनांना अयोग्य आहोंत. दुसरे बाजीराव साहेब मोठे वेदांती होते हें प्रसिद्ध आहे; पण कदाचित् म्हणूनच त्यांना स्वतःचें राज्य आणि परक्याचें पेंशन ह्याच्यांतला फरक दिसला नाहीं! आपण इतिहास, राजकारण, विज्ञान, अर्थशास्त्र ह्यांचा अभ्यास केला पाहिजे; ह्या जगात मानानें जगावयास शिकलें पाहिजे; गृहस्थाचें सर्व कर्तव्य बजावून ग्रहस्थाश्रम सांग पार पाडला पाहिजे;-मग वानप्रस्थाश्रम आणि त्या आश्रमांतील वेदांताचा उषःकाल येईल. तोंपर्यंत ह्या गोष्टींचा कोणताही उपयोग असो त्या विधवांकडे, म्हाताऱ्याकोताऱ्यांकडे, कामावरून निघालेल्या पेन्शनरांकडे सोंपवल्या पाहिजेत! त्यांच्यासाठीं भूतकाळ आणि त्याची तीं जुनीं पुस्तकें, व पुरुष आत्मा आणि परमेश्वर यांचीं पुराण कोडीं आहेत! तरुणांनीं-अभिनवांनीं-भविष्य काळांत कां संचार करूं नये? म्हणे वेदांत! —वाराणशीनें एकही हुतात्मा जगाला दिला नाहीं, आणि आपल्या पितृदेशासाठीं एक पैही द्यावयाची तिची योग्यता नाहीं!

आतां आमच्या येथील स्थितीसंबंधानें थोडेंसें लिहितों--गेल्या वर्षांतही मला कोणचें दुखणें आलें नाहीं. माझी प्रकृति उत्कृष्ट आहे आणि माझें वजन अजून तितकेंच आहे. मोठी अचाट कर्तबगारी आहे नाहीं? ह्या माझ्या चिमुकल्या विवरात्मक आरोग्यभुवनांत मी लवकर उठतों, नियमित अन्न नियमित वेळीं खातों आणि लवकर झोपीं जातों-म्हणजे आम्हाला ह्या गोष्टी कराव्याच लागतात--आणि म्हणून लवकर निजून लवकर उठणाऱ्या मला—ज्ञानसंपत्तिविरहित कां असेना पण—आरोग्य भेटतें! तुम्हाला सांगावयाचेंच म्हणजे अहो भावी डॉक्टरसाहेब, आपल्या रोग्यासाठीं येथल्या पेक्षां अधिक चांगलें वेळापत्रक आपल्याला कांहीं सुचलें नसतें! आणि माझ्या शरिराची प्रकृति जशी उत्कृष्ट आहे तशी माझ्या मनाची प्रकृति त्याहूनही उत्कृष्ट आहे!

कोणच्याही कठिण किंवा हलक्या कामाकडे माझी योजना होवो मी तें 'स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धिं लभते नरः,' किंवा 'यतः प्रवृत्तिर्भूतानां येन सर्वमि-

दंततम् स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विंदन्ति मानवाः।' अथवा 'सर्वारंभाहि दोषेण धूर्मनाग्निरिवावृताः।' हें चरण स्वतःशीं गुणगुणत पार पाडीत असतो. आणि प्रति संध्याकाळीं–हो, आतांशा मला मिळालेल्या कोठडींतून आकाशाचा किंचित् भाग दिसतों–ती सूर्यास्ताची शोभा आणि प्रकाश व छायेचा तो थाटमाट मी निरीक्षण करूं लागलों कीं पहातां पहातां माझें मन गुलाबकलिका, कमलकंद आणि कल्हारकासार ह्यांच्याजवळ पटकन जातें ! कधीं हे विचार चालतात, कधीं ते विचार चालतात; कवीच्या बरोबर 'एकतस्तटतमालमालिनीम् पश्य धातु धातुरस निम्नगामिव '! किंवा, ' तेन मानिनि ममात्रगौरवम् ! ' असल्या विचारांत केव्हां मन रमतें, तर केव्हां वेदांत तत्वज्ञान्यांच्या बरोबर 'जें कांही दिसतें त्याला प्रत्यक्ष अस्तित्व नाहीं–निदान आपल्याला तरी ठाऊक नाहीं–ते आपल्याच कल्पनेचे विकार आहेत ' असल्या गूढ विचारांत भ्रमण करतें. आणि माझें मन पूर्ण सुखांत असतें:-स्नेहमयांच्या सहवासांत तेथें असतांना जितकें असें अगदीं तितकें–प्रेममयींच्या सहवासांत तेथें असतांना जितकें असें तितकें-सुखांत असतें ! मधून मधून कधीं हट्टी मुला प्रमाणें त्याचें डोकें बिघडलें आणि तें हट्टून रडूं लागलें की विवेकरूपी आजीबाई लागलीच अवतीर्ण होतात आणि हांसत समजुत करतात; ' काय होतें माझ्या बाळाला? दुसऱ्याला कळूं न देतां तूं किती वेदना सहन करतो आहेस ? वेडा कुठला ! महत्वाकांक्षेच्या शिखरावर आपण स्वतः आरूढ व्हावें, आत्मवैभवाच्या रथांत परिभ्रमण करावें असें कां तुला वाटत होतें ? तसें असेल तर असल्या स्वार्थी, अधोगामी महत्वाकांक्षेच्या मार्गांत व्यत्यय आला, तुला अपयश आलें हें योग्यच झालें ! पण परमेश्वराला आणि मलाही ठाऊक आहे कीं स्वतःला कोणचेंही बक्षीस मिळावें हा लोभ तुला शिवला नाहीं!--कीर्ति, नांव, भूमि, द्रव्य, निदान पक्षीं सुख,-कशाचीही तूं पर्वा केली नाहीस! ह्या दिव्यांत सर्वांच्या पेक्षां अधिक कष्ट सोसण्याचा मान आपला असला पाहिजे एवढाच तुझा हेतु! निदान माझ्या पाशीं तूं असें म्हणत होतास, 'दुसऱ्यासाठीं, मनुष्य जातिसाठीं, अधिकांत अधिक आत्मयज्ञ करावयाचा' –मग सांग बघूं, येथें निराशेचा काय संबंध येतो ? तूं ज्यांत सर्वस्वाची दक्षिणा दिलेली आहे असा सर्वस्वदक्षिण यज्ञ संपादन केलेला आहेस ! ज्याला अंत नाहीं, ज्याला कालमर्यादा नाहीं, असे क्लेश तूं सोसतो आहेस ! आत्मक्लेशानें आपला अभागी वंश पावन करावयाच्या महत्कृत्याला वाहिलेला नाहीं असा

२१ 3820

तुझा एकही क्षण जात नाहीं–असें तुझें एकही कृत्य असत नाहीं. तर मग आनंदी हो! ह्यापेक्षां तुला अधिक तें काय करतां आलें असतें ? आणि लागलींच मन आपला पिसारा उभारून भरारी मारतें आणि वर जाऊन पुनः एकदा गाऊं लागतें. कदाचित् एकादे वेळीं असें न होतां आपल्या अहंतेचाच बडिवार मन करूं लागलें तर त्या आजीबाई त्याला सहल करावयाला घेऊन जाऊन जगाचें विश्वरूप दाखवितात आणि ह्मणतात, तो पहा नगाधिराज हिमालय!-त्याचेंही मुळींच अस्तित्व नव्हतें असा एक काळ होता आणि असा एक काळ येईल कीं त्याचा मागमूसही राहणार नाहीं. आणि हा चंद्र पहा, ही विशाल सूर्यमाला अव॰ लोकन कर आणि हे अनंत नक्षत्र मंडळही दृष्टी खालीं घाल!–त्या चिमुकल्या मनाला ह्याहून अधिक सहन करणें अशक्य होतें, तें स्वतःला विसरतें आणि आपण मिरवलेल्या प्रतिष्ठेची आणि केलेल्या सोपस्काराची लाज वाटून ह्या विश्वांत विलीन होतें.

तेव्हां बाळ! येथें आह्मी दोघेही मनानें व शरीरानें पूर्णपणें स्वास्थ्यांत आहोंत आमच्याविषयीं यत्किंचित् काळजी करूं नकोस. आह्माला ह्या जगाशीं बद्ध करते आहे अशी वाटणारी एकच गोष्ट ह्मणजे तुझें आरोग्य आणि सुरक्षितता. ह्या दोहों-चा जर तूं निर्वाळा देत असशील-अर्थातच तूं आपल्याकडून शक्य तितका प्रयत्न केलास ह्मणजे झालें; फलाची काळजी आह्मी करीत नाहीं–तर आमच्या सारखे सुखी कोणी नाहीं. अजून कारावासानें आमच्यावर कोणाचाही वाईट परिणाम केलेला नाहीं, कीं कोणचीही हीन छाया पाडली नाहीं. आणि हा सर्व प्रकृतीचा निकोपपणा परिस्थितीचें सहाय्य मिळून नाहीं तर परिस्थितीशीं झगडून आह्मी राखला आहे. असो. अधिकाऱ्यांकडे अर्ज पाठवून भेटीचा वेळ इत्यादिविषयीं विचारणा केल्याचें तूं लिहिलेस. वास्तविक येथल्या वहिवाटीप्रमाणें मला कारागृ-हांतून मुक्त करून बेटावर रहावयाची केव्हांच अनुमति मिळावयाला पाहिजे होती. माझें 'वर्तन' त्यांच्याच लेखाप्रमाणें उत्कृष्ट आहे. तरी पण आमच्यापैकीं कोणालाहि बाहेर सोडलें नाहीं. ह्याचा पुनः विचार व्हावा ह्मणून मी सरकारकडे लिहिणारच आहें. आणि तुलाही जेव्हां कांहीं विचारणा करावयाची असेल तेव्हां तूंही येथील अधिकाऱ्यांस लिहीत जा. लवकरच ती. स्व. बाबांचीं पांच वर्षें पुरीं होतील, आणि मग तुला हक्कानें भेट मागतां येईल. इतर कैद्यांच्या संबं-

धांत येथल्या अधिकाऱ्यांना जरी सर्व अधिकार आहे तरी आमच्या संबंधांत आह्माला बाहेर सोडावयाचें किंवा घरच्या मंडळींना येथें आणावयाला अनुमति द्यावयाची ह्या पैकीं त्यांच्या हातून कांहीं होईल असें वाटत नाहीं. त्यांना त्याबद्दल फारसा दोषही देतां येत नाहीं. कारण आमच्या संबंधांत प्रत्यक्ष हिंदुस्थान सरकाराकडून आज्ञा सुटतात असें वाटतें. तेव्हां येथल्या अधिकाऱ्यांकडून कांहीं माहिती लागली नाहीं तर तूं परभारें हिंदुस्थान सरकारकडे पत्रव्यवहार करीत जा. मुख्य सांगावयाचें ह्मणजे, हें कसेंही असो आमच्या व्यवस्थेसंबंधीं तूं मनाला त्रास करून घेत जाऊं नकोस. न्यायतः जें करणें प्राप्त आहे तें बहुधा सरकार स्वतःच करील आणि आह्मी त्यांना नेहमीं टोंचणी लावावयाला आहोंच. आह्माला दुसरें कामच कोणचें आहे ? तूं स्वतःच्या प्रकृतीची आणि सुरक्षिततेची अत्यंत काळजी घे ह्मणजे झालें. मी हायकोर्टांत तुला काय सांगितले त्याची आठवण असूं दे.

माझ्या लाडक्या यमुनेला सांग कीं हीं ४ वर्षे पूर्ण व्हावयाच्या आधींच आनंदाच्या दिवसाची प्रभात दिसल्यावाचून राहणार नाहीं. तेव्हां तिनें आणि आपल्या परमप्रिय वहिनींनीं आणखी कांहीं दिवस—आजपर्यंत धरला त्या प्रमाणें आणखी कांहीं दिवस—धीर धरावा. त्यांनीं सर्व मराठी वाङ्मय वाचून काढावें—नुसतीं जुनीं पुराणेंच नाहींत तर पूर्व आणि पश्चिम ह्यांच्या जीवन प्रवाहाचा नवीन, वहाता, जिवंत झरा ज्यांत उमटला आहे असें सर्व वाङ्मय वाचून काढावें. माझा उदारचरित्र सहकारी आणि सखा सखाराम ह्याच्या उदात्त मरणाचा वृत्तांत ऐकून माझें मन उदास अभिमानानें भरून गेलें ! तुला माहितच आहे हायस्कूलमध्यें असतांना त्याची व माझी पहिल्यानें गांठ पडली. तो शूरासारखा जगला–शूरासारखा मेला ! आणखी अभिष्ट तें कोणाचेंहि काय असणार ! त्याची पत्नी जानकीबाई—मी तिला पाहिलेलें नाहीं—पण तुमच्या लेखणींतून उतरलेल्या तिच्या चित्रानें ती माझ्या डोळ्यासमोर दिसते. ती दीन नाहीं, ती दुर्दैवी नाहीं !–आयुष्यांतली अत्यंत महनीय भूमिका करावयाची कामगिरी तिला दिली गेली आहे. माझा तिला नमस्कार सांग. चिमुकला वसंत कसा काय आहे? हे छोटे सरदार आह्माला आपल्या हातचा एकादा शब्द लिहितील का ? तो आतां ७ वर्षांचा झाला असेल नाहीं ? आणि त्याची आई–तिची माझी शेवटची

भेट डोंगरीच्या तुरुंगांत झाली ! बहिण ही मनुष्याला मिळणारी अत्यंत थोर देणगी आहे. तिला माझे प्रेमाशीर्वाद दे आणि तिच्या छोट्या सरदारांचा-माझ्या वसंताचा-माझ्यासाठीं एक मुका घे. आपल्या सर्व आप्तांना माझे नमस्कार ह्मणून सांग–कोणाला न वगळतां अगदीं सगळ्यांना-आणि विशेषतः तिला मी विनोदानें आपल्या संस्थेची माता म्हणत होतों, आणि जिला अत्यंत कृतज्ञतेनें व अंतःकरणापासून मी आतां माझी आई म्हणतों: जी तुझ्या एकसारखी पाठीशीं आहे आणि माझी नेहमीं आठवण ठेवते तिला-तिचें आपलें नातें नसलें तरी, किंबहुना नाहीं एवढ्यासाठींच–तसेंच ज्यांचीं नांवें न उच्चारणें म्हणजे पाप करणें आहे असें वाटतें आणि तरीही जिथें नुसते पायच नाहींतर जीभही शृंखलाबद्ध असते अशा तुरुगांतून त्यांच्याचसाठीं ज्यांच्या नांवाचा उच्चार करतां येत नाहीं-त्या सर्वांना मी प्रेमानें विचारले आहे म्हणून सांग. तसेंच–त्यांना तुला ते सगळे माहिती आहेत; माझे जिवलग मित्र म्हणून माझ्या हृदयाच्या अत्यंत जवळ कोण होते त्यांचीं नांवें मी तुला सांगितलीं आहेत–त्यांना माझें प्रेम–अगदीं ताजे टवटवीत प्रेम-अर्पण कर. त्यांच्यापैकीं कोणी आपण होऊन पत्रांत स्वतःचा उल्लेख करावयाला तुला सांगितला तर मग मी माझे हृदय उघडें करीन आणि त्यांचा नामोच्चार करीन. मला आतां कोणचीं पुस्तकें पाठवावयाचीं त्यांची नामावलि पुढें देतों आहें. वेळ संपली, तेव्हां आतां माझ्या लाडक्या बाळा, अत्यंत अनिच्छेनें तुझ्यापासून दूर व्हावें लागतें आहे.

तुझा भाऊ
**तात्या.**

# पत्र ७ वें

श्रीराम

पोर्ट ब्लेअर–तुरुंगाची कोठडी
९।३।२५

प्रियतम बाळ—

पुनः एकदां कुंभकर्णाची निद्रा संपवून माझी लेखणी जागी झाली आहे. आणि ७।८ महिन्यांपूर्वी तूं पाठविलेलें पत्र मिळालें हें कळवण्याकरितां ती धांव घेते आहे. तुझें पत्र येणें म्हणजे तुझी भेट होणें आहे. कारण एक तर तुझीं पत्रें चलच्चित्रपटांतल्या प्रमाणें देखाव्यांनीं भरलेलीं असतात. आणि दुसरें, तुरुगांतील एकांतवास माणसाच्या श्रवणेंद्रियाला अशीं अद्‌भुत शक्ति देतों कीं तिच्या योगानें जन्मांधाप्रमाणें ऐकलेल्या गोष्टीं मनश्चक्षूसमोर उभ्या राहतात ! तुझें पत्र आलें कीं प्रत्यक्ष तूं आणि तुझ्या भोंवतीं आपल्या कलानिनादिनी गोदावरी तीरावरील चिमुकल्या सुखकर आवासांतील प्रेमाचीं दृश्यें आणि आवडीचीं मुखकमलें मला मूर्तिमंत नेत्रापुढें उभी करतां येतात. मला आणि ती. बाबांना तुझें चांगलें चाललें आहे हें ऐकून आनंद वाटला; आणि जोंपर्यंत तूं आपल्या प्रकृतीची काळजी घेत आहेस आणि उदात्त, स्वास्थ्याचें आणि आरोग्यपूर्ण असें आयुष्य घालविण्याचा शक्य तितका प्रयत्न करतो आहेस तोंपर्यंत आमच्या प्रकृतींची-मानसिक आणि शारीरिक दोन्हीही-तुला काळजी करावयाचें कांहीं कारण नाहीं. मागच्या वर्षाचीं तूं पाठविलेलीं पुस्तकें १६ होतीं आणि यंदा १३ होतीं (४ इंग्रजी बाकीचीं संस्कृत आणि मराठी) हें बरोबर आहे का तें उत्तरांत लिही. पुढच्या खेपेला तूं पार्सल पाठवशील त्यावेळीं तुझ्या हातची नामावली समवेत पाठवावयाला विसरूं नकोस, म्हणजे आम्हाला ताडून पहावयाला बरें पडलें. समाजरहस्य वाचून आनंद झाला. त्याच्या दोन प्रति कशाला पाठविल्यास ? फार चांगली कादंबरी आहे. एक सूचना करावीशी वाटते. आपल्या सामाजिक चालीरीतींत ही जातिभेदाची पद्धति म्हणजे हिंदुस्थानाला मिळालेला महाशाप आहे. तिच्यामुळें हिंदु-जीवनाचा प्रबळ प्रवाह वाळवंटांत आणि डबक्यांत मुरूं पाहतो आहे. ‘ पहिल्यानें आम्ही त्यांच्या चार जाती बनवूं’ इत्यादि उद्गारांत कांहीं अर्थ नाहीं.

तसें व्हावयाचें नाहीं आणि होऊंही नये. शेंड्या बुडख्या सकट त्यांचें उच्चाटण केलें पाहिजे. हें साधावयाचा उत्तम मार्ग ह्मणजे सर्व तऱ्हेच्या वाङ्मयांतून आणि मुख्यतः नाटकें व कादंबऱ्या ह्यांच्यांतून-त्यांच्यावर शस्त्र धरावयाचें; प्रत्येक खऱ्या देशभक्तानें दुटप्पी वागणें सोडून देऊन आपल्याला ह्या प्रश्नावर वाटतें तें स्पष्ट बोलून दाखवावें आणि त्याप्रमाणें आचरण करावें. ह्यांत मात्र एक काळजी घेतली पाहिजे. आपला इतर राष्ट्रांशीं आलेला संबंध हा आजचा मुख्य प्रश्न आहे. तो योग्य प्रकारानें वाटेला लागल्याशिवाय कोणचेही आंतले प्रश्न समाधानकारक किंवा खरोखर उपयोग होईल इतपत सोडवणें शक्य नाहीं. तेव्हां हें करीत असतांना मुख्य प्रश्नाकडे दुर्लक्ष्य होईल किंवा तो सोडविण्यांत अडथळे किंवा अडचणी येतील अशा रीतीनें अंतर्गत प्रश्नांत गढून जातां कामा नये किंवा ह्या आपसांतल्या संबंधाच्या उपप्रश्नांचें स्तोम माजवतां कामा नये. तेव्हां समाज रहस्यासारख्या ह्या अन्याय्य आणि दुर्बल करणाऱ्या सामाजिक दोषांवर हल्ला चढवणाऱ्या सुंदर कांदबऱ्या जितक्या जितक्या अधिक लिहिल्या जातील तितक्या मला पाहिजे आहेत. जातिभेदानें भूतकालांत पुष्कळ कार्य केलें असेल पण आतां त्यांत चैतन्य राहिलेलें नाहीं. तेव्हां त्याला आतां आपण मूठमाती देणें-- पाहिजे असेल तर बरोबर अश्रूंचें उदक सोडून-हेंच योग्य आहे ! आमच्या भेटीची तुला यंदा अनुमति मिळणार आहे हें वाचून आनंद वाटला. त्याबद्दल आभार मानणें योग्य आहे ! पण ती वहिनींनीं यंदा तरी ह्या प्रवासाचा त्रास घेऊं नये असें माझें निश्चित मत आहे. तूं एकटाच ये, आणि मार्गांतल्या सर्व सोयी किंवा अडचणी तूं प्रत्यक्ष पाहिल्यानंतर आणि त्यांना आणावयाचा सर्वांत चांगला मार्ग कोणचा हे समजल्यावर पुढच्या खेपेला तूं आह्मांला भेटावयाला येशील तेव्हां वहिनींना आणि माईला घेऊन ये. त्यांच्याच सोयीसाठीं यंदा त्या माझ्या आवडत्या माणसांच्या भेटीचें निरुपम सुख सोडावयाला तयार होणें हें मला माझें कर्तव्य वाटतें. तेव्हां यंदा एकटाच ये.

जगांतील सर्वश्रेष्ठ सैनिकसत्तेबरोबर युद्ध करण्यासाठीं हजारो हिंदी सैनिकांना यूरोपच्या रणभूमीवर जावयाची संधि मिळाली, तेथें त्यांनीं आपली कामगिरी उत्कृष्ट बजाविली, आणि लढवय्ये ह्मणून कीर्ति गाजवली, हें ऐकून मला आनंदाचें भरतें आलें. देवाची कृपा ! हिंदुस्थानांतून एकंदरींत अजून

पौरुष मृतप्राय झालें नाहीं तर ! किती मौज झाली ! परदेशांत आपल्या लोकांना प्रवास करावयाला प्रोत्साहन द्यावें लागें आणि एकाद्या वर्षी १२ माणसें परदेशांत पाठवावयाला मिळालीं तर स्वतःचें अभिनंदन करावयाची पाळी येईल ! आणि आतां आपल्याला जें करतां येत नव्हतें तें दैवानें घडवून आणलें ! शेंकडों हिंदु-रजपूत आणि गुरख्यांप्रमाणें पुराणमताभिमानी किंवा शिखाप्रमाणें सुधारलेल्या पंथाचे हजारो हिंदु-समुद्रपर्यटणाला गेले आणि तेंही सरकारी पुरस्काराखालीं. आतां आपल्या पंडितांना हिंदूंना समुद्रपर्यटण निषिद्ध आहे किंवा नाहीं ह्याच्या शास्त्रार्थाचीं अंडीं उबवीत सुखनैव बसूं द्या. संमत किंवा निषिद्ध कसेंही असलें तरी हिंदु आतां समुद्र ओलांडून गेले आणि समुद्राबरोबरच त्यांनीं पुराणें युगही ओलांडलें आहे. आशियांतील नरच्या प्रतीच्या संस्कृतीशीं संबंध आणून युरोपच्या विषयीं ख्रिस्त्यांच्या धर्मयुद्धांनीं जें कार्य केलें तेंच कार्य हिंदी सैनिकांनीं यूरोपिअनांशीं केलेल्या झगड्यांनीं हिंदुस्थानच्या आणि आशियाच्या विषयीं साधणार आहे.

राजकीय कैद्यांच्या मुक्ततेसाठीं पंजाबांतून जो अर्ज झाला आहे त्याबद्दल लिहावयाचें म्हणजे त्यांच्या ह्या उदार कृत्याबद्दल आह्मी त्यांचे कितीही आभार मानले तरी ते अपुरेच पडणार. आमच्या पैकीं कांहीं जणांनीं रणभूमीवर स्वयंसेवक म्हणून जाण्याची आपली सिद्धता कळवली आहे हें तुला कळलेंच असेल. त्याचें अजून कांहीं उत्तर आलें नाहीं, पण सरकारनें ह्या गोष्टीची विशेष नोंद केल्याचें समजतें.

पार्लमेंटांतील कोणी सभासदानें माझ्याविषयीं किंवा आपल्यापैकीं कांहीं जणाविषयीं युद्ध सुरू होण्यापूर्वी पार्लमेंटमध्यें कांहीं प्रश्न विचारले अशी गप्पा ऐकली होती, ती खरी आहे काय ? खरी असेल तर त्याबद्दल सविस्तर माहिती कळव. श्रीगुरुगोविंदजी आणि रविंद्रनाथ ह्यांच्या वरच्या कविता तुला मिळाल्या का ?

नामदार गोखल्यांना मृत्यूनें गांठलें हें वाचून फार वाईट वाटलें. एकंदरींत ते फार मोठे देशभक्त होते ह्यांत शंका नाहीं. प्रसंगीं भांबावल्यामुळें कधीं कधीं त्याच्या तोंडातून असे उद्गार निघून जात आणि हातून अशा गोष्टी होऊन

जात कीं कांहीं महिन्यांनंतर त्यांविषयीं त्यांची त्यांनाच लाज वाटे. पण त्याच वेळीं त्यांचें सर्व जीवन मातृभूमीच्या सेवेला समर्पिलेलें होतें आणि स्वार्थमूलक किंवा व्यक्तिविषयक असें त्यांच्या वागण्यांत फार थोडें असें हें आपण विसरतां कामा नये. त्यांच्या कल्पनेप्रमाणें त्यांनीं मातृभूमीच्या सेवेंत आणि तिचें कल्याण करण्यांत आयुष्य खर्च केलें. मृत्यूनें आमची कायमची ताटातूट करण्यापूर्वीं त्यांच्याशीं भेट व्हावी आणि लंडनमध्यें पूर्वीं त्यांनीं ह्मटल्याप्रमाणें अह्मी एकमेकांचे अनुभव ताडून पहावें अशी माझी फार इच्छा होती! कांहीं गोष्टींत आमचें एकमत होईना तेव्हां ते ह्मणाले, " बरें सावरकर, आपण पुनः सहा वर्षांनीं भेटूं आणि एकमेकांचे अनुभव ताडून पाहूं!" महाराष्ट्रानें त्यांच्या जागीं त्यांच्याहूनही अधिक योग्यतेच्या व्यक्तीला कौंसिलांत पाठविलें पाहिजे. त्यांनीं जितकें केलें तितकें जरी प्रत्येक हिंदपुत्राला करतां आलें तर किती कार्य होईल!

पुढच्या पाळीला तूं जेव्हां पुस्तकें पाठवशील तेव्हां भारत गौरव ग्रंथमालेचीं ' जन्मभूमि ' आणि ' गौतम ' हीं पुस्तकें अवश्य पाठव. तीं बाबांना तीं वाचावयाची फार इच्छा आहे. फ्रान्सवरच्या जर्मनीच्या स्वारीमुळें मॅडम कामांकडची कांहींही वार्ता कळणें अशक्य झालें असेल अशी मला धास्ती वाटत होती. मी येथें आल्यापासून त्या तुला दुसऱ्या आईच्या जागीं झाल्या आहेत आणि आयुष्यांतल्या अत्यंत कष्टमय प्रसंगीं त्यांनीं नितांत मोठेपणानें आणि संबंधांना स्मरून आपल्याला साह्य केलें आहे! ह्या जगद्व्यापी गोंधळांत सुद्धां त्यांना तुझें स्मरण होतें आणि त्या नियमितपणें तुला पत्र पाठवितात हें वाचून मला फार आनंद झाला. असल्या एका निष्ठावंत, उदारचरित निर्भर आणि प्रेमळ हाताच्या स्पर्शाबरोबर प्रियतमांच्या औदासिन्यानें, विश्वासस्थानांच्या विश्वासघातानें आणि आप्तांच्या अदर्शनानें उन्मळून टाकलेला मनुष्याच्या अंतःकरणांतील मनुष्य जातीविषयींचा विश्वास पुनः सुस्थिर होतो! त्या प्रेमाच्या जीवाला मला पत्र पाठवतां येत नाहीं आणि तिच्या उदात्त चारित्र्याबद्दल व दीन आणि आर्त ह्यांच्याविषयींच्या आस्थेबद्दल मला किती आदर वाटतो आणि पुनः एकदा तिचें दर्शन व्हावें ह्मणून मी किती उत्कंठित झालों आहें हें तिला सांगतां येत नाहीं ह्याबद्दल मला खेद होतो! पण त्याला निरुपाय आहे तेव्हां

तूंच आपल्या कोणाही आप्तांच्या आधीं तिला माझे सादर प्रणाम पोंचतें कर. कारण आप्त आपल्याविषयीं कांहीं तरी करतात ह्यांत विशेष काय ? ती किती करते आणि कसें करते ह्याचें आश्चर्य आहे !

तूं पाठविलेलीं पुस्तकें वाचीत असतांना दिसून आलें कीं सर्व देशभर प्रकट होण्यासाठीं धडपड करणाऱ्या नवचैतन्याच्या झोतामध्यें तेलगू प्रांतांतील आपले देशबांधवही पूर्ण सांपडले आहेत. आंध्रसभेची चळवळ प्रचंड आणि महत्वाची आहे. पण तो प्रांत तामिळांच्यापासून अलग करण्याची कल्पना कोती आहे. त्यांतल्या त्यांत ' आंध्रमाता की जय ' ह्या घोषानें राष्ट्रीय जयजयकार करण्यांत आला ही गोष्ट वाचून मला फार खेद झाला ! क्षुद्र प्रांताभिमानाच्या वृत्तीचा तो स्वाभाविक परिपाक आहे ! ह्या गवताच्या काडीवरून येणाऱ्या अशुभ वादळाच्या दिशेची कल्पना होते. स्वदेशीच्या भव्य चळवळीची ही एक रोगट प्रतिक्रिया आहे आणि वेळेवर त्यांत सुधारणा झाली पाहिजे. बंगालमधल्या फाळणीच्या लहान प्रश्नाभोंवती चिकटलेल्या स्वदेशी चळवळीनें ही प्रतिक्रिया उत्पन्न केली आहे ! प्रत्येक प्रांताला आपण स्वतंत्र व्हावें असें वाटतें. आणि आपल्या पुरत्याच जयघोषाच्या व चिरायुत्वाच्या गर्जना तो करीत सुटतो! पण राष्ट्रदेह जगल्याशिवाय हे प्रांतांचे अवयव कसें जगणार ! महाराष्ट्र, मद्रास, बंगाल हे सारे मोठे आहेत आणि चिरंजीवही होतील; पण ते तिच्या-संपूर्ण भारतमातेच्या-द्वारानें. तेव्हां आपण ' आंध्र माताकी जय ' असा जयघोष न करतां ' भारत माता की जय ' असा केला पाहिजे आणि ' बंग आमार ' असें राष्ट्रगीत न गातां ' हिंद आमार ' असें राष्ट्रगीत गाइलें पाहिजे ! सर्व प्रांतांनीं आणि तेथल्या लहान लहान भाषांनीं भिन्न भिन्न होण्याची खटपट करण्यापेक्षां एकत्रित झालें पाहिजे आणि अद्याप असलेले प्रतिबंध व भाषा भिन्नत्वाचा गोंधळ ह्यांना चिकटून न राहतां नाहींसे किंवा दूर केलें पाहिजे ! चिमुकलीं राष्ट्रें ! बेल्जमचें उदाहरण सावध व्हावयाला अजून पुरेसें नाहीं कां झालें ? इंग्रजांच्या राज्यामुळें त्यांच्या मनांत नसतांहि जर एकादी कल्याणाची गोष्ट केली असेल तर ती ही आहे कीं त्यानें मातृभूमींतील अलग करणारे पंथ-भेद मुशींत वितळवून त्यांना एकरूप केलें आणि घणाचे घाव घालून भिन्न प्रांतीयांना एक

जानपद घडविलें ! आतां ह्या महत्कार्याच्या सिद्धीच्या आड येणारी प्रत्येक गोष्ट दूर सारण्याच्या स्थलीं आपण एका हातानें हें अभिष्ट साधण्यासाठीं द्यावी लागलेली किंमत ह्मणून अडकवून घेतलेल्या शृंखला घट्ट धरून ठेवतों आहों आणि दुसऱ्या हातानें त्या अभिष्टाचें अनिष्टांत रूपांतर करण्याची खटपट करतों आहों !

तुझ्या पत्रासंबंधीं व तूं पाठविलेल्या पुस्तकासंबंधीं मला जे कांहीं वाटत होतें तें सर्व आतां लिहून झालें असें मला वाटतें. पुढच्या वेळीं पत्रांत पाठविलेल्या तालिकें प्रमाणें पुस्तकें पाठवावींत. सेप्तेंबर पहिलीच्या आधीं तुझें येणें होणार असलें तर पार्सल न पाठवतां तूंच पुस्तकें घेऊन ये. तोंपर्यंत येणें होत नसेल तर पार्सल पाठव. आपल्या इष्टमित्रांना इकडचा निरोप कळवावयाचा आणि परत पाठविण्यासाठीं त्यांचा कांहीं निरोप असला तर मागवावयाचा एवढ्यासाठीं अवश्य तो पत्रव्यवहार झाल्याबरोबर ह्या पत्राचें उत्तर पाठव. तूं पत्रांत लिहिलेल्या गृहस्थाच्या आणि तुझ्या भेटीचा योग आला हें वाचून मला फार आनंद झाला. तुह्मी एकमेकांस तेव्हांच आवडाल हें मला माहिती होतें. कारण ' हंसीं हंस बकीं बक मिसळे, जन ओढतो स्वजातिकडे. ' त्याला माझे अत्यंत प्रेमाचें वंदेमातरम् सांग. मला त्याची वारंवार आठवण होते. आपल्या प्रिय प्रोफेसर साहेबांचें कसें काय चाललें आहे ?--आतां आणखी एक पांखरूं जेथें तान्हेलेल्या हृदयाला तृषा शमवावयाला एक जलबिंदूही मिळत नाहीं आणि आशेच्या खुरटलेल्या पुष्पाला उमलविणारी दव कणिका आढळत नाहीं अशा जळत्या वाळवंटाच्या भयाण अरण्यांतलें उड्डान पार पाडून त्या लहानग्या प्रिय घरट्यांत पुनः परत आलें असेल ह्या कल्पने बरोबर माझें हृदय आनंदानें उचंबळतें आहे ! त्याच्या सुटकेंत आणि इतर मंडळींच्या सुटकेंत माझीच अंशतः सुटका झाली आहे असें मला वाटतें ! बिचारा प्रिय सखाराम आज तेथें परत आला असतां तर !—आपल्या कार्यासाठीं देह अर्पून ज्यानें स्वर्ग गांठला त्यानें जगायला पाहिजे होतें असें म्हणणें हें मूर्खपणाचें किंबहुना अपमानाचें आहे—तरी मन राहत नाहीं !

आतां आमच्या संबंधीं. आमच्याबद्दल तूं मुळीं सुद्धां काळजी करूं नकास हेंच मला पुनः तुला सांगावयाचें आहे. आमच्या बरोबरच्या सर्व नियत वर्षांच्या

बंद्यांना परत हिंदुस्थानांत पाठविण्यांत आलें आहे; येथें फक्त आह्मी जन्मठेप-वाले राहिलों आहों. युद्ध सुरू असें पर्यंत कांहीं ह्मणावयाचें नाहीं आणि येथल्या अधिकारी वर्गाला अडचणींत पाडावयाचें नाहीं असें तत्व मी मनाशीं ठरवलें आहे. सध्या आमची दोघांचीही प्रकृति चांगली आहे आणि कॅप्टन-हल्लीं मेजर-मरे हे तुरुंगाचा कारभार पाहतात. ते येथें आहेत तोंपर्यंत मनाला लागेल असें कांहीं केलें जाणार नाहीं किंवा ऐकावें लागणार नाहीं हें निश्चित. सरळ नियमांचे परिपालन होईल, आंतून त्रास द्यावयाचे क्षुद्र प्रयत्न होणार नाहींत. तूं पाठविलेलें प्रत्येक पत्र आणि पुस्तक आह्माला व्यवस्थित मिळेल. आमच्या दिनक्रमासंबंधानें सांगावयाचें म्हणजे तो मागच्या वर्षाप्रमाणेंच त्याच ठराविक मार्गानें चालला आहे. बंदीगृहांत पहिल्या दिवशीं जें घडतें तेंच नित्य--त्याच्यापेक्षां वाईट घडलें नाहीं तर-घडत असतें. सर्व नाविन्य, सर्व फेरपालट नाहींसे करायचें हेंच तुरुंगांतल्या नियमनाचें वास्तविक सार असावें असें दिसतें ! पदार्थसंग्रहालयांतील निरनिराळ्या प्रकारच्या आणि चमत्कारांच्या वस्तूंप्रमाणें आमच्यापैकीं प्रत्येकजण त्याच जागीं आणि त्याच स्थितींत कप्यांत ठेवलेला आणि वरती अंकाची पत्रिका लावलेला, फार तर कमी अधिक धुळीनें माखलेला असा, आढळावयाचा. तेव्हां गेल्या वर्षाच्या पत्रांत जें मी माहितीपत्रक दिलें होतें तेंच तुला मी येथें असेपर्यंत आमच्या स्थितीच्या वर्णनाच्या संबंधांत उपयोगी पडेल ! आह्मी लवकर उठतों-कसून काम करतों-नियमित जेवतों-अगदीं त्याच वेळीं, त्याच जागीं, आणि त्याच कारागृही कौशल्यानें आणि आरोग्यविषयक काळजीनें तयार केलेलें तितकेंच आणि तसलेंच अन्न जेवतों--काम आटोपून मिळालेल्या मोकळ्या वेळीं मी बरेंच वाचन करतों आणि कधीं कधीं संध्याकाळीं नाना पुष्पांना -आतां त्यांची केवळ नांवांनींच आठवण करावी लागते-आणि पुष्पसदृश प्रसंगांना निर्यमक कवितेंत गुंफून मग निजतों. येथें एक गोष्ट सांगितली पाहिजे. आपल्याला पाहिजे ते बोलण्याला किंवा करण्याला बंद्यांना कडक निषेध असला तरी कारागृहांतल्या अधिकाऱ्यांच्या पक्षानें हें मान्य करणें प्राप्त आहे कीं प्रत्येक बंद्याला मन मानेल त्याप्रमाणें स्वप्नांत रमण्याची मनसोक्त अनुमति आहे ! आणि ह्या संमतीचा मी शक्य तितका लाभ घेतों हें तुला सांगावयाला नकोच ! बहुधा प्रत्येक रात्रीं मी कारागाराचीं बंधनें तोडतों

आणि दऱ्यांतून व खोऱ्यांतून तसेंच नगरांवरून व शिखरावरून तुमच्यापैकीं कोणी तरी–जो केव्हां तरी आणि कोठेंतरी माझ्या हृदयाशीं निगडित झाला आहे असा कोणी तरी--भेटेपर्यंत भ्रमण करीत असतों ! मी प्रति रात्रीं हें करतों पण माझे बंदीगृहांतले कनवाळू अधिकारी तिकडे दुर्लक्ष करतात ! तुह्मीं जागें मात्र तुरुंगाच्या भिंतीच्या आंत झालें पाहिजे एवढेंच त्यांचें म्हणणें !

युद्ध संपल्याबरोबर आमच्या मुक्ततेसाठीं एक सार्वजनिक अर्ज पाठविण्याची व्यवस्था व्हावी. त्याचें कारण असें आहे. हिंदुस्थानांतच काय पण दुसऱ्या कोणच्याही स्वयंशासित आणि स्वतंत्र देशांत सुद्धां जनतेची तशी इच्छा पाठीशीं प्रेरणा करावयास असल्याशिवाय कोणच्याही सरकारला राजकीय बंद्यांची मुक्तता करतां येत नाहीं ! लोकांना आपले बंदी परत आपल्यांत यावे अशी इच्छा असल्याशिवाय राजाला किंवा अध्यक्षाला आपला क्षमेचा अधिकार उपयोगांत आणतां येत नाहीं ! जर हिंदी बांधवांची तशी इच्छा असेल आणि युद्धाच्या शेवटीं त्याप्रमाणें अर्ज जाईल तर आमची मुक्तता होईलही. आणि जर हिंदी बांधवांना आह्मीं परत यावयाला नको असेल तर सरकारलाही आह्माला सोडतां येणार नाही; आणि त्या सुटण्यांत अर्थही नाहीं. पोर्ट ब्लेअर आह्मांला ठेवावयाला तयार आहे आणि मी येथें आहेंही ! आम्ही ज्यांना नको आहों अशा लोकांवर स्वतःस लादावयाची आमची मुळींच इच्छा नाहीं. तसें असेल तर आह्मांला इतर बंद्यांप्रमाणें कारागृहाच्या बाहेर राहूं देण्याबद्दल विचारणा कर ह्मणजे झालें ! येथें आल्यावर ज्यांना नवीन अपराधाबद्दल पुनः शिक्षा झाली आहे अशांनाही बंदीगृहाच्या बाहेर बेटांत वस्ती करून राहण्याची आणि आपली माणसें आणण्याची मोकळीक आहे. थोडक्यांत येथल्या नियमाप्रमाणें बंद्यास अधिकारानें मिळाल्या पाहिजेत तेवढ्या सर्व मागण्या मागावयाच्या; आपण दयेची याचना करीत नाहीं. आणि तूं तेथून आणि आह्मी येथून नेहमीं अर्ज करीत राहिलें तर एवढें होण्याचा संभव आहे.

गेल्या वर्षाच्या ती० प्रियतम वहिनींच्या पत्रांत त्यांनीं त्यांच्या लहानग्या धाकटीबद्दल कांहीं लिहिलें नाहीं. तिचें लग्न झालें ना !–प्रियतम यमुनेला माझें

उत्कट प्रेम पोंचव-तिची प्रकृति कशी काय आहे ? तिचें वाचन चाललें आहेना? प्रिय बळवंतराव कोणच्या कॉलेजांत आणि कोणच्या वर्गांत आहेत, तसेंच दुसऱ्या मुलांची काय वार्ता आहे ? माझ्या परम प्रिय व पूज्य वडील भावजयीच्या चरणीं माझें पवित्र प्रेम आणि भक्ति अर्पण कर. तिचें चरित्र ह्मणजे आत्यंतिक स्वार्थत्याग, उदात्त सहनशक्ति आणि स्वतःच्या अपराधाकरतां नव्हे तर दुसऱ्यांच्या कल्याणाकरतां शांततेनें व उच्चार न करतां दुःख भोगण्याची सिद्धता, ह्यांची अंतिम सीमा आहे ! आणि धाकट्या वहिनींनाही माझें आशीर्वाद सांग; मागच्या वर्षी माईच्या पत्रांत त्यांनीं प्रेमानें काढलेली माझी आठवण मला पोंचली. त्यांची आणि इतर सर्व प्रेमळ स्नेह्यांची मला नित्य आठवण येते. माझें मन आपल्या निर्हेतुक भ्रमंतीवर निघाल्यानंतर प्रत्येक वळणावर त्यांच्या प्रेमळ मूर्तीचें दर्शन घडतेच आणि मग माझें मन लागलींच थांबतें आणि ज्यांच्या योगानें माझें जीवन असें फुललें त्यांच्यासाठीं आर्त अश्रुबिंदूचें नूतन आणि मनोहर मंदिर उभारतें, त्यांची त्यांत कांहीं वेळ प्रस्थापना करतें, त्यांची पूजा रचतें आणि त्यांनीं मला विसरूं नये ह्मणून त्यांची प्रार्थना करतें ! एक क्षणभर कां होईना ज्यांनीं माझ्यावर प्रेम केलें आणि मला प्रेम करण्याचा अधिकार दिला त्यांचें--माझ्या जिवाच्या जिवलगांचें- हृदयाच्या सुहृदांचे, साहसांतील सहकाऱ्यांचे आणि खेळगड्यांचें--त्याच मंदिरांत आणि त्याच प्रभावळींत मी पूजन करतों !!

माझ्या लाडक्या बाळा तुझा वैद्यशास्त्राचा अभ्यास लवकरच फलद्रूप होणार ह्याबद्दल मला आनंद वाटतो. अभ्यासाकरतां प्रकृती बिघडवून घेऊं नकोस तुझें वजन मला कळवित जा. आतां माझ्या लाडक्या बाळा, तुला, आपल्या माईला आणि चिरंजीव वसंताला माझें प्रेम आणि उत्तमोत्तम आशीर्वाद दिल्यानंतर ह्या मनोमय मिठींतून मला सोडवून घेऊन तुझा निरोप घेऊं देशील कां ?

तुझाच भाऊ,

तात्या.

# पत्र ८ वें.

श्रीराम

पोर्टब्लेअर — बंदीगृहांतील कोठडी
ता० ६-७-१६

**प्रिय बाळ,**

आणि **गोड शांते**-

आयुष्याच्या दुसऱ्या अवस्थेंत--वैवाहिक प्रेमाच्या जीवनांत--तुह्मी केलेल्या प्रवेशाप्रीत्यर्थ मी आणि ती. बाबा -आह्मी तुमचें अत्यंत मनापासून अभिनंदन करतों. बाळ, आपल्या आयुष्यांतील पहिली अवस्था--ज्ञानार्जनाचा आणि शीलसंपादनाचा तो स्वार्थरहित काळ—तूं योग्य रीतीनें पार पाडिला आहेस. संस्कृत आणि इंग्रजी ह्या भाषांशीं झालेल्या परिचयामुळें आधुनिक आणि पुरातन अशा दोन्हीही ज्ञानभांडारांच्या द्वारांच्या सोनेरी किल्ल्या तुझ्या हातांत आल्या आहेत. वैद्यकाची तूं उत्तीर्ण केलेली अंतिम परीक्षा जगाच्या कोणत्याहि भागांत तूं असलास तरी आणि अनुदार व अपमार्गी कायदेमंडळानें कांहींही नियम केले तरी, तुला हात दिल्याशिवाय राहणार नाहीं; तुझ्या लेखणीनें काव्य आणि गद्य ह्या दोन्ही वाङ्मयक्षेत्रांत आपलें सामर्थ्य महाराष्ट्राला दाखविलें आहे. उलट पक्षीं त्या अवस्थेतील कर्तव्य आणि भार ह्या पेक्षां अधिक चांगल्या रीतीनें पार पडणें शक्य नव्हतें. आपल्या मातृभूमीवर वादळ उठलें, पण त्यांतही तूं आपल्या नेमलेल्या स्थलीं निश्चल आणि रोखून उभा राहिलास; त्यानें उत्पात मांडला पण भोंवतालच्या विश्वासघात्यांच्या घोळक्यांत एकटा, निष्ठावन्त आणि निर्भय असेंच तुला ठेवून त्याला निघून जावें लागलें ! जो उत्साह आपल्या तरुण मंडळींत उत्पन्न करण्याकरतां यूरोपीयन राष्ट्रांना त्यांच्या डोळ्यांसमोर आयर्न क्रॉस किंवा व्हिक्टोरिया क्रॉस ह्यांचें आमिष धरावें लागतें किंवा सन्मानपटाच्या तालिका उघडाव्या लागतात तो उत्साह आणि ती एकनिष्ठा, लोकांनीं आपल्या विषयीं प्रशंसोद्गार काढावें ह्याची देखील क्षिति न करतां, तूं दाखविलीस.

तेव्हां बाळ, तू आपली जीवनाची प्रथमावस्था उदात्तपणें घालवली आहेस. आणि आतां तुह्मी—प्रियबाळ आणि लाडक्या शांते--आयुष्याच्या उच्चतम आणि सुखमय द्वितीयावस्थेंत--वैवाहिक प्रेमाच्या जीवनांत--पदक्षेप करीत आहां. प्रिय बाळा, तुझ्या मार्गावर गुलाबांचे थर रचले जावेत आणि लाडक्या शांते, तुझ्या तारुण्याला सुवर्णाचा आणि स्वर्गसुमनांचा बहर येवो ! मनुष्याच्या अधःपतनानंतर त्याच्यापाशीं उरलेल्या एकमेव स्वर्गीय सौख्याची--कौटुंबिक स्वास्थ्याची -तुमच्या गृहप्रवेशावर मंगल दृष्टी असो ! मधुनक्तमुतोषसि मधुमत् पार्थिवं रजः ! (प्रभात, सायंकाळ आणि धरणीमाता तुह्माला मधुमय असोत ! )

मागल्या माझ्या एका पत्रांत, एकाद्या चतुर बंगाली पोरीनें तुझें मन चोरून नेलें आहे ह्मणून माझ्या कानावर आलें तर त्याचें मला आश्चर्य वाटणार नाहीं असें ध्वनित केलेलें तुला कदाचित् आठवत असेल. एकंदरींत माझी अट-कळ बहुतेक खरी झाली ! कारण, जरी प्रांताप्रांतांतील हिंदु कुटुंबामध्यें झालेल्या विवाहसंबंधानें जातीची आणि पंथाची कृत्रिम आणि अपायकारक बंधनें तोडलीं जाऊन आपल्या हिंदूंच्या जीवनाची महानदी डबक्यांतून आणि वाळवंटांतून बाहेर निघून नित्य नवीन आणि प्रबल अशा प्रवाहानें न अडतां आणि अडवण्याला न जुमानतां वाहूं लागली आहे असा दिवस पाहण्याची मला अत्यंत उत्कंठा आहे, तरी ह्या दिशेनें पहिला आणि आवश्यक उपक्रम ह्मणजे वैवाहिक संबंधावर नियंत्रण करावयाचा प्रीतीचा पूर्ण प्रांत आणि अधिकार तिचा तिला देणें हा आहे. खरोखरच मनुष्याच्या सुप्रजनन शास्त्रापेक्षां जनावरें आणि पांखरें ह्यांच्या उत्तम निपजीकडे आपण अधिक लक्ष्य पुरवितों आहों ह्या स्थितीकडे कानाडोळा करून अतःपर चालणार नाहीं ! देह, मन आणि आत्मा ह्यांच्या संगोपनाला आवश्यक असलेल्या गोष्टी एकत्र आणून वाढीला लावण्याच्या प्रीतीच्या जन्मसिद्ध कार्यक्षेत्रांतून तिला हांकलून देऊन शतकांचीं शतकें घालवलेली !--तेव्हां खुरटलेली, अशक्त, सर्व वीर्य-पौरुष निपटून निघालेली प्रजा हा त्याचा अवश्यंभावी परिणाम आहे ! शेकडों कारणामुळें ही परिस्थिति उत्पन्न झालेली आहे आणि आपल्यामध्यें प्रचलित असलेल्या लग्नाच्या चालीरीति ह्या ती परिस्थिति उत्पन्न करण्याच्या कारणांपैकीं एक महत्वाचें कारण आहेत.

प्रेमाला पवित्र करण्यासाठीं--त्याचा गळा दाबण्यासाठीं नव्हे--धर्मशास्त्रांनीं पुढें यावें. तेव्हां, वय, शिक्षण परस्परांचीं हृदयें एकत्र करण्यांत परस्परांविषयींचें आकर्षण आणि आदर ह्यांनीं केलेलें कार्य, आणि सर्वांत विशेष ह्मणजे आपल्याकडे ज्यांचा ओढा आहे अशांनीं त्याला दिलेली अनुमति, ह्या सर्वांमुळें आपल्या कुटुंबानें ज्या गोष्टींत पाठीमागें असतां कामा नये असें मला वाटत होतें ती गोष्ट तुला प्रत्यक्ष साधतां आली ह्या विषयीं मला फार आनंद वाटला. किंवा थोडक्यांत सांगावयाचें ह्मणजे प्रिय भाऊनें आपल्या मंगल आशीर्वादांनीं ज्याला संमति दिली तें माझ्या हृदयाला आवडतें असेंच असणार हें सांगावयालाच नको.

तेव्हां आतां डॉक्टरसाहेब तुह्मीं कोठें रहावयाचें ठरवलें आहे ?--पहिलें पत्र पोष्टांत चुकीनें गहाळ झाल्यामुळें कालच मला हें दुसरें पत्र लिहायला सांगितलें. ह्या चुकीमुळें तुला निष्कारण काळजी करावी लागली असली तरी त्यामुळें मला तुझें सांप्रतचें निवासस्थल कळलें. त्यावरून सध्यां तूं मुंबईला असावास असें दिसतें. त्या रोगट आणि बकाली शहरांत का तूं आपलें रुग्णालय काढणार ? त्यापेक्षां वाढतें आणि स्वतंत्र बडोदें--जेथें विद्यासंपन्न सयाजी महाराज राज्य करतात तें- अधिक सोयिस्कर नाहीं का होणार ? पण हें सारें तुला पसंत पडेल त्याप्रमाणें ठरव; माझ्या ह्मणण्यावरून नको. कारण तूं प्रत्यक्ष तेथें आहेस आणि काय काय गोष्टी पहावयास पाहिजेत हें तुला समजतें. मी फक्त एकच गोष्टीचा आग्रह धरीन. कांहींही असलें तरी स्वतःची प्रकृती आणि स्वातंत्र्य-वैयक्तिक स्वातंत्र्य--ह्यांना यत्किंचित् धक्का लागतां कामा नये. इतकें करणें--ह्याविषयीं तूं माझ्यावर पूर्ण विश्वास ठेव--नुसतें चालेल असेंच नाहीं तर तुझ्या आणि तुझ्यासारखीच ज्यांची स्थिति आहे त्यांच्या संबंधांत अवश्य आचरणीय आहे. साधारणपणें स्वतःच्या हितसंबंधाकडे अधिक लक्ष्य देणें हें अधःपाताला नेणारें आहे हें खरें. पण तुझ्याविषयीं ह्मणशील तर तूं तिकडे जितकें लक्ष देशील तितकें अपुरें आहे. जगांत तूं कोठेंही असलास--आफ्रिकेच्या अरण्यांत असलास किंवा अमेरिकेच्या जनसंघांत असलास--तरी तूं मिळविलेलें वैद्यकीय ज्ञान हें संचाराचें अनुज्ञापत्र आणि रक्षणाचें साधन ह्मणून तुला उपयोगी पडेल. कारण जेथें मृत्यु आहे तेथें वैद्य आहे !

अरे ! फार रागावलेला दिसतोस ! मी हें वैद्यशास्त्राच्या राजैश्वर्यापुढें पूर्ण विनीत होऊन--किंबहुना त्यांत भर टाकण्यासाठीं--ह्मणतों आहें ! तेव्हां ज्यानें तुझी आणि तशीच, किंबहुना त्याहूनही विशेष **शांताची** प्रकृती बिघडेल असें कांहीं करूं नकोस वाचन वाढविण्याविषयीं तिला प्रोत्साहन दिलेंच पाहिजे 'आणि तिची सिद्धता असेल तर लेखनाकडेही लक्ष्य द्यावयाला सांगितलें पाहिजे. पण तरुण स्त्रीचें पहिलें आणि महत्वाचें कर्तव्य आपलें आरोग्य राखणें हें आहे. दुसऱ्याकरितां तिच्याजवळ ठेवलेली ती ठेव आहे--अजून जन्माला न आलेल्या पिल्यांचें तें तिच्याकडे असलेलें ऋण आहे ! तरुणीनें व्यर्थ घालवलेला आरोग्याचा प्रत्येक अणु ह्मणजे अजून ज्यांना जन्म घ्यावयाचा आहे अशा आत्म्यांच्या शक्तीची तेवढी नागवणूक आहे. 'अतीताला भविष्याशीं जोडणारी तरुण स्त्री ही सुवर्ण शृंखला आहे; आपल्या वंशाच्या कर्तृत्वाचें तें अभिवचन आहे.' तेव्हां विवाहित स्त्रीची पहिली काळजी म्हणजे स्वतःच्या आरोग्याविषयीं असली पाहिजे. ज्याच्या योगानें तिचें शरीर, मन आणि आत्मा ह्यांचें सौंदर्य समरस होईल असें आरोग्य तिनें राखलें पाहिजे. तेव्हां अभ्यास किंवा विलास ह्यापैकीं कशानेंही तिच्या उत्साह शक्तीवर ताण पडतां कामा नये. त्या आरोग्याला परिपूर्णता येईल. तें सौंदर्य कांचेसारखें शुद्ध होईल इतकेंच ह्या दोन्हीं गोष्टींकडे लक्ष पुरवलें पाहिजे.

आतां थोडेसें स्वत संबंधीं लिहितों; पण तें थोडेसें काय लिहावयाचें याचें माझें मलाच कोडें पडलें आहे. कारण मी पाठविलेलें मागचें पत्र तूं वांचलेंस त्यावेळीं ज्या स्थितींत मी होतों त्याच स्थितींत मी आहें. पालट ह्या शब्दाला बंर्यांच्या कोशांत--विशेषतः त्याच्या पोर्टब्लेअर आवृत्तींत--स्थान नाहीं ! ज्यानें तुमचा भूगोल आमूलाग्र हालवून सोडला असें तूं म्हणतोस त्या महायुद्धानें मला आणि माझ्या पोर्टब्लेअरला अगदीं स्पर्शसुद्धां केला नाहीं ! आपल्या सिंहासनावरून केलेल्या वार्षिक भाषणांत ह्या जगद्व्यापी भूकंपाच्या धक्क्यामध्येंसुद्धां आह्मीं आपले हितसंबंध अगदीं तसेंच्या तसे राखले आहेत असें साभिमान आणि सकारण ज्या एकाच राष्ट्राला ह्मणावयाला हक्क आहे तें राष्ट्र ह्मणजे आमचें हें येथलें चिमुकलें राज्य आहे ! आमची आयात आणि निर्गत तशीच चालू आहे ! आह्मीं आमचे दिवे सर्व रात्रभर उजळत ठेवतों.

आणि आमचे अंतर्राष्ट्रीय संबंध हें आमचें चिमुकलें राज्य आपल्या महासागरी रात्रिगर्भांतून वर आलें त्या वेळेपासून अगदीं जसे चालले आहेत तसेच आजहि शांततेनें चालले आहेत! आस्क्विथ साहेबांना आमची असूया वाटावी ह्याला कितीतरी कारणें आहेत! येथील नागरिकांना सध्या जर्मनींत आरंभ झाला आहे ह्मणून सांगतात त्याप्रमाणें मांस आणि बटाटे ह्याच्या कमी केलेल्या प्रमाणावर दिवस काढावे लागत नाहींत; आणि त्याचें कारणही अगदीं साधें आहे. आह्मी ते पदार्थ कधीं उपयोगांत आणीतच नाहीं! गवत किंवा तसलेंच जें इतर खाद्य आह्मीं खातों त्यावर आह्मी वाढतों! आणि ह्या माझ्या कारागृहाच्या भक्कम आणि महत्वाकांक्षी भिंतींनीं तर चीनच्या प्रसिद्ध कोटाला नुसते मातीचे ढिगार बनविलें आहे! ह्या जगप्रसिद्ध भिंतीला परकीयांना फार तर आंत घुसावयाला आणि तोहि पूर्ण परिणामकारक नाहीं असा, प्रतिबंध करता आला! पण ह्या भिंती तें तर करतातच—परकीयांना आंत येऊं देत नाहींतच आणि त्या व्यतिरिक्त आंतल्याही प्रत्येकाला अगदीं न चुकतां बाहेर पडावयाला प्रतिबंध करूं शकतात?—तें शक्य नाहीं! अगदीं मरणाच्या शिक्षेनें ही सुटका नाही. तेव्हां आह्मी, विश्वकुटुंब्यांच्या मनोराज्यांची प्रतिमा किंवा आदर्श ह्मणून निर्माण केलेलें चिमुकलें जगच कीं काय असे, मानवी जगांतून युद्धाला जणूं पूर्ण बहिष्कृत केलें आहे अशा रीतीनें मृत्यूला सुद्धा खालीं मान घालावी लागेल इतक्या शांततेनें आणि स्वस्थतेनें जगतों—छे चूक झाली—श्वासोच्छ्वास करतों आहों!

भेटीविषयीं लिहावयाचें ह्मणजे हें युद्ध संपेपर्यंत वाट पाहणें चांगलें असें मला वाटतें. सध्या भेटीची मोकळीक द्यावयाला सरकार जें मागें पुढें करतें आहे याला थोडेसें कारण आहे असें ह्मणतां येईल. आणि युद्ध संपल्यावर भेटीच्या संमतीसाठीं तूं जो पत्रव्यवहार करशील त्यांतही प्रत्येक बंद्याला ज्या प्रमाणें भेटीची मोकळीक मिळतेच त्या प्रमाणें पांच वर्षे झालीं ह्मणून मला भेटीची मोकळीक मिळाली पाहिजे एवढेंच कारण लिहावयाचें! आपलीं हृदयें भेटीसाठीं उत्कंठित झालीं आहेत ही गोष्ट त्यांत येतां कामा नये. कारण मग जरी त्यांनीं संमति नाकारली तरी त्यांत निदान आपण परक्या आणि हृदयहीन दृष्टीपुढें अत्यंत पवित्र आणि अत्यंत जिव्हाळ्याचीं अशीं क्षतें—विरहाचीं क्षतें—दीनवाणी उघडीं करून दाखविलीं नाहींत एवढें तरी आपल्याला स्वाभिमान समाधान राहील.

तसेंच आमच्या येथील वागवणुकीत जी कांहीं सुधारणा होण्यासाठीं तुला पत्रव्यवहार करावयाचा असेल तो परभारें दिल्लीला करीत जा. कारण माझ्या संबंधांत कोणताही, आणि विशेषतः चांगला, पालट करणें हें येथल्या अधिकाऱ्यांच्या हातांत मुळींच नाहीं. त्यांना जेवढें करतां येण्यासारखें आहे तेवढें ते करतातच आहेत. आणि कांहीं करीत नसतील तर तें शक्य तर करावयास मीं येथें सांगेनच. ह्या कारावासानें मला नमवणें शक्य नाहीं हा विश्वास असला तरी तुमच्या पैकीं कांहीं मंडळींना मला हें कष्ट भोगावे लागतात आणि सामाजिक, राजकीय निदान वाङ्मयिक सुद्धा कसलेंही कार्य करावयास बंदी होत आहे ह्या विषयीं फार वाईट वाटतें हें मला माहिती आहे. पण बाळ, हें बध कष्ट सोसणें हें देखील कार्य नाहीं का ? खिस्ती धर्मासाठीं अधिक कार्य कोणी केलें ? ज्यांनीं सूं न करतां आणि कोणास कळूं न देतां कष्ट सोसले त्यांनीं का ज्यांनीं प्रचारकार्य केलें त्यांनीं ? दोघांनींही तें केलें; पण मी तरी समजतों कीं सत्कार्यांसाठीं जे बाहेर प्रयत्न करतात ते पुष्कळ कार्य करतात; पण त्यासाठीं कारागृहामध्यें खितपत असतात ते त्यांच्याहूनही अधिक कार्य करतात ! मूळांत काय खरें असलें तर तोच आत्मयज्ञ आहे, आणि खरा आत्मयज्ञ ह्मणजेच कार्य आहे ! हुतात्म्यांनीं सोसलेल्या विपत्ति हीच प्रेरकशक्ति आहे ! ती जनतेला हालविते, टोंचते आणि पुढें ढकलते. जनतेपैकीं उत्तमोत्तम पुरुष जेव्हां क्लेश सहन करतात तेव्हांच इतरांना काम करतां येतें ! दोघेहि, क्लेश सोसणारे आणि काम करणारे, थोर आहेत, दोघेहि अवश्य आहेत; आणि दोघेहि जर अवश्य आहेत तर मग ह्या जागीं नेमणुक न होतां आपली त्या जागीं नेमणुक झाली तर त्यांत खेद कसला ! माझ्या वाटेला हें काम आलें ह्याबद्दल मला धन्यता वाटते ! तेव्हां बाळ, इतर प्रत्येकजण आपली दिवली लावून घेऊन मनुष्याच्या प्रगतीच्या मार्गावर प्रकाश पाडीत असतां मी मात्र अंधेरांत बसलों आहें आणि नुसती प्रतीक्षा करतों आहे ह्याबद्दल वाईट वाटून घेऊं नकोस.

तुला त्या ओळी आठवत नाहीं कां ? "ती महिषीच्या वैभवानें बसली आहे — तिच्या आज्ञा पाळण्यांत हजारों गढून गेले आहेत — जे उभे आहेत आणि प्रतीक्षा करीत आहेत तेही तिची सेवाच करीत आहेत !"

आणि जे नुसते प्रतीक्षाच करीत नाहींत तर क्लेश सोसूनहि ताठ उभे आहेत त्यांचें कार्य किती मोठें आहे ! मूर्तिकारांची योग्यता मोठीच आहे. कारण तो दगडावर दगड रचतो, ते कोरतो, त्यांना स्वरूप देतो. पण तो देवमंदिराला लागलेला चुना !--तो कष्ट सोशीत असतो ! ज्याच्यांतून रक्त वाहत असतें असें आत्मबलिदान त्याचें असतें !

आणि खरोखरच बाळ, क्षणाक्षणाला मला किती सौख्य वाटते ह्याच्यावर तुझा विश्वास देखील बसावयाचा नाहीं ! प्रसन्नतेच्या नवलाच्या वायुलहरी भोंवतीं इतस्ततः संचार करतात आणि येथें अवश्य प्राप्त होणाऱ्या शारीरिक क्लेशांना आणि दुर्बलतेला आपल्या मृदु स्पर्शानें, समाधिस्थ आत्म्याच्या निरंतर नवीन आणि सतत फुलणाऱ्या आनंदाचा अनुभव देतात. विद्यालयामधल्या त्या दिवसांत वार्षिक परीक्षेच्या प्रश्नपत्रिका समाधानकारक रीतीनें सोडवून अनुकूल निर्णयाच्या आनंदाच्या वार्तेची शांतपणें वाट पहात बसण्यासाठीं मी घरीं येत असें त्या वेळीं मी ज्या सुखांत असें, अगदीं त्याच सुखांत, मी आतांही आहे. ही सर्वांत मोठी परीक्षा, ही कसोटी,—आपल्या मातृभूमीचें दास्य विमोचन करावयाचें—आणि त्यांतहि माझ्यापुरतें मी इतक्या समाधानकारक रीतीनें काम केलेलें ! तेव्हां आतां मी येथें माझ्या घरीं आलों आहें आणि विश्वस्ततेनें त्या महद्वार्तेची वाट पहातों आहें !-मला किती निघोंर झोंप लागते-वृत्ति कशा मधुमय होतात ! कारण जेव्हां दिवस होता आणि तिच्या रणक्षेत्रावर माझी आवश्यकता होती त्या वेळेला मी इतकें सक्ततेनें काम केलें कीं ही रात्र आल्याबरोबर निद्रा दंवबिंदूप्रमाणें माझ्या पापण्यांवर हळूच उतरली ! मधून मधून कांही क्षण असेही येतात: विकट स्वप्नें, प्रकाश पाहण्याची आणि स्वतः चमकण्याची हौस-हीं सतावतात ! पण त्यांना कठोर तर्कधारेचा स्पर्श झाल्याबरोबर स्वप्नें विरून जातात--पार उडून जातात-आणि आत्मस्वरूप प्रकट होऊन पुनः एकदां शांतीचें साम्राज्य पसरतें. असल्या एकाद्या झोंपेंतून जेव्हां मी माझ्या कोठडींत जागा होतों आणि माझ्या अरुंद, गज लावलेल्या आणि उंचावर असलेल्या खिडकीच्या बाहेरच पुलिनावर सागरलहरी आदळतांना कानावर येतात, तेव्हां मला कालिदासाच्या त्या ओळी आठवतात—" प्रासादवातायनदृश्यवीचिः । प्रबोधयत्यर्णव एव सुप्तम् " आणि रघूच्याच ठिकाणीं स्वतःला

कल्पून मी हंसतों, खेळतों, विनोद करतों-आणि हेंहि सारें स्वतःशींच! विश्रांतीच्या-जी कार्यैात्कटतेचें स्वरूप आहे अशा विश्रांतीच्या-जाणिवेनें हे विचार उत्पन्न होतात. आणि मग ते आपल्या परी कारागृहांतील मूर्तिमंत निर्दयतेपासून मनाला दूर भुलवून नेतात आणि ती विश्रांतीची जाणीव दृढतर करतात. तेव्हां हें अगदीं सत्य आहे कीं एकंदरींत मी आणि ती बाबासाहेब, आह्मीं, सुखांत आहोंत; समाहित आहोंत; आणि ह्या शिव्याशापांच्या, जळफळाटांच्या आणि निष्ठुरतेच्या, नेहमीं उडणाऱ्या झकमकींच्या आणि नेहमीं बांधणाऱ्या शिस्तींच्या वातावरणांत—जेथें टाकावें लागणारें प्रत्येक पाऊल तूं दासांच्या जातीपैकीं आहेस अशी मनाला जाणीव करून देत असतें त्या वातावरणांत—अवश्यक आहे तोंपर्यंत जगावयालाही सिद्ध आहों !

तुझ्या लग्नाचा वृत्तांत डोळ्यांपुढें चित्र उभें करावें अशा कौशल्यानें लिहिला होता. ह्या लेखकांविषयीं सांगावयाचें ह्मणजे त्यांची नैसर्गिक शक्ति फार प्रचंड आहे. पण स्वतःच्या सामर्थ्यावरील अविश्वास हा त्यांच्यांत मोठा दोष आहे. मला वाटतें त्यांनीं पहिल्यानें लोकांना आवडणाऱ्या स्फुट गोष्टी किंवा लहान कादंबऱ्या लिहावयाचा प्रयत्न करावा आणि एखाद्या मासिकांतून त्या प्रसिद्ध कराव्या. ह्मणजे मग त्यांच्यांत आत्मविश्वास उत्पन्न होईल. उदाहरण म्हणून जातिभेदाचाच प्रश्न घ्या. ह्या दोषामुळें आपलें कसें नुकसान होतें आहे, सर्व मनुष्यजात ज्या ध्येयाकडे चालली आहे त्या ध्येयापासून तो आपल्याला कसा दूर नेतो आहे, ह्याचें चित्र सूचक गोष्टींनीं त्यांनीं रेखाटावें. मग मोठमोठालीं पुस्तकें लिहावयाचा प्रयत्न करावा. अशा रीतीनें गेलें पाहिजे. त्यांना आणि यमराजसहोदरांना आणि इतर सर्वांना मी अत्यंत प्रेमानें त्यांचें स्मरण केलें आहे ह्मणून सांग. माझे बालपणचे संवगडी, विद्यालयांतले सहाध्यायी आणि कार्यक्षेत्रांतले सहकारी, ज्यांना मी माझे ह्मटलें आणि ज्यांच्याशीं मी वचनबद्ध झालों—ते सर्व माझ्या स्मृतिपटावर नित्य नव्या प्रेमानें आणि आदरानें रेखाटलेले आहेत. प्रिय ऋषीचें निवासस्थान समजलें; वाचून आनंद झाला. तो अद्याप चाकरींतच आहे का ? त्याच कामावर ! आणि आमचा नवीन मित्र ? त्याची मला किती आठवण येते ! कारण ह्या असल्या परिस्थितींत सुद्धा, आणि तो स्वतः त्याच दिव्यांतून जात असतां, त्याचें माझ्यावर इतकें लक्ष्य आणि प्रेम असे !

आणि तो बुद्धिवान् आणि उद्योगी तरी किती आहे ! तुझ्या लग्नाच्या वृत्तांतात प्रोफेसर साहेबांचें नांव कोठें आढळलें नाहीं ? त्याला माझे मंगल आशिर्वाद दे. आणि महनीय कामाबाईंना माझे प्रणाम सांग. ह्या युद्धामुळें त्यांनां फार त्रास झाला असेल ! त्यांना माझें शुद्ध आणि उत्कट प्रेम अर्पण कर आणि त्यांना सांग कीं पारिसमध्यें त्यांच्याकडे असतांना ज्यांची माझी भेट झाली त्या सर्वांविषयीं, विशेषतः संन्यासीबुवांविषयीं, माझी स्मृति अढळ आहे. तूं पाठविलेल्या छायाचित्रांनीं आह्मांला सतत भेटीचें सुख अनुभवावयाला मिळतें. त्यांत माझी येसूवहिनी एकाद्या देवतेप्रमाणें, अगदीं शांत आणि सतत कष्ट सोशीत असलेली पण सत्वापासून न ढळलेली, अशी दिसते ती जेव्हां मला मुंबईला कारागृहांत भेटावयाला आली होती तेव्हां तेथल्या एका अधिकाऱ्यानें अगदीं असें तिचें वर्णन केलें होतें. तिला आणि माझ्या ताईला आणि शांतेला माझें गाढ प्रेम निवेदित कर. मला त्या सर्वांचा अभिमान वाटतो. पुढच्या पाळीला माझ्या प्रिय यमुनेच्या पत्राचें भाषांतर करून पाठवावयाला विसरूं नकोस. थोर पोर— गरीब पोर ! तिची मूक पण उत्कट ध्येयनिष्ठा पाहिली ह्मणजे तिची कींव येते आणि धन्यताही वाटते. तिच्या वडिलांची संमति नसेल तर तिला मुंबईला येण्याबद्दल आग्रह करूं नकोस. त्यांच्याच इच्छेला आणि प्रेमाला मान दिला पाहिजे. तिचे सर्व भाऊ कसे काय आहेत ? माझ्या आईला-मावशींना-माझे अत्यंत नम्र प्रणाम.

पूर्ण प्रेमांकित

तुझाच-तात्या.

—— ——

## पत्र ९ वें.

श्रीराम

कारकोठडी,

पोर्ट ब्लेअर, ता० ५।८।१७

**प्रियतम बाळ,**

माझ्या गेल्या स. १९१६ च्या जुलईमध्यें पाठविलेल्या पत्राचें तुझें उत्तर वाचून अतिशय आनंद झाला. तुझें आणि आपल्या सर्व इतर मंडळींचें ठीक चाललें आहे, तुह्मी कुशल आणि आनंदांत आहां हें पाहून आह्माला अत्यंत कृतज्ञता वाटली. आणखी एक आनंदाचें--आणि तेंही एकनिष्ठ आणि प्रेमळ कौटुंबिक जीवनांतच केवळ प्राप्त होणाऱ्या कोमल आणि शुद्ध आनंदाचें-वर्ष देवानें तुला दिलें ही त्याची केवढी कृपा ! हें पहा बाळ, आपल्या बरोबरच्या पिढीला अशा काळांत आणि देशांत जन्म घालवावयाचें दैवी आलें आहे कीं ज्यावेळीं प्रत्येक उदात्त आणि प्रामाणिक अंतःकरणाला दुःख, उसासे, आणि विरह ह्यांनीं भरलेला मार्गच पत्करणें अवश्य झालें आहे ! कारण तोच कर्तव्याचा मार्ग आहे. त्यामुळें दैवाचे कणखर आणि निष्ठुर तडाखे ज्याला नेहमींचे झाले आहेत आणि म्हणून जें कठोर बनलें आहे अशा मनाला आपत्ति आणि निराशा म्हणजे निसर्ग नियमा प्रमाणें--निदान आपल्या संबंधातील तरी निसर्गाच्या नियमाप्रमाणें--वाटतात. तेव्हां, ज्यावेळीं एकादी आनंदाची गोष्ट घडते त्यावेळीं मनाचें लक्ष्य ह्या वेळेल_ दैव किती चांगलें आहे हें पहाण्यापेक्षां हें सुदैव किती थोडा वेळ टिकणार आहे इकडेच जातें. माझ्या दृष्टीनें आनंद म्हणजे अश्रूंचे स्वरुपांतर ! असो एकंदरींत दिवस पालटले आहेत आणि पालटल्या भविष्यकाळाबरोबर मित्रही परत जमूं लागले आहेत ! मुंबई हायकोर्टांतील बंद्यांच्या कठड्यांतून जेव्हां मी तुझ्यापासून निघालों आणि तुझ्यावर शेवटची दृष्टी टाकली--कारण त्यावेळीं आपल्याला नुसते हस्तांदोलनही करूं दिले नाहीं--शिरस्त्राण हालवलें आणि दूर झालों, त्यावेळीं बाळ, त्या सर्व करुण देखाव्याची बोंच एका भावनेंत होती ! मी किंवा प्रिय बाबा, आम्हाला दोघांनाही, आमच्या स्वाधीन केलेल्या अत्यंत जवळच्या आणि अत्यंत जिवलग अशा भाराच्या--तुझ्या--संबंधांत कांहीं करतां

येत नाहीं ! वय लहान, असहायता पूर्ण, आणि मोठ्या मनुष्याला सबंध आयुष्यांत भोगावें लागणार नाहीं इतकें दुःख आधींच सहन केलेलें, असा तूं-माझा भाऊ--तुला कोणी सहाय्य करावयाला नाहीं, किती तरी जण शत्रुत्व उगवावयाला टपलेलें आणि एक समर्थ सरकार संशयाच्या दृष्टीनें पहात असलेलें, अशा स्थितींत भर समुद्रावर सोडला गेलास ! गृहाग्नि कायमचा विझवला गेला, गृहदेवता छिन्न विछिन्न केल्या गेल्या असें स्पष्ट दिसूं लागलें ! आणि ह्या सर्व गोष्टींना जरी आपल्याला सत्यापासून विचलित करतां आलें नाहीं किंवा असत्याचा पक्ष आपण स्वीकारला नाहीं तरी, ज्यावेळीं मी ती. वहिनींना 'जो वंशबाग उध्वस्त झाला। संतत पुष्प तोचि एक'! असें लिहिलें त्यावेळीं, हृदयाच्या घावांतून रक्त वहात होतें! आशेची सदाफुली देखील वाळून कोळपली होती ! चि. वसंताची एकाकी कलिका, अतीताच्या उदास स्मृतीप्रमाणें, राहिलेली दिसत होती ! पण आतां वसंताच्या कोठें कोठें होणाऱ्या स्नेहार्द्र स्पर्शामुळें पुनः जीवनरस वाहूं लागला आहे आणि वेलींना नवीन कळ्या फुटूं लागल्या आहेत. चि. वसंताच्या जागीं आतां आणखी आपल्याला रंजन मिळाला आहे आणि परमेश्वराच्या कृपेनें ह्या नवजीवनाचा आणखी एक नवा दूत आपल्याला लाभावयाचा आहे. घरांत प्रीतीचा दीप सहास्य जळूं लागला आहे आणि त्याच्या परावर्तित झालेल्या सुखस्पर्श आणि कोमल किरणांनीं माझ्या ह्या कोठडींतील निबिड अंधार उजळूं लागला आहे. रंजनाचें नवीन नांव ऐकून त्या, सर्व कष्ट सहन केलेल्या आणि प्रेमानें ओथंबलेल्या मातेचें--त्याच्या आजीचें--ती० मावशीचें स्मरण होतें. तिला किती आनंद झाला असेल ! त्या प्रिय बालकाला माझें प्रेम अर्पण कर. कदाचित् त्याला पहावयाचा मला कधींच योग यावयाचा नाहीं ! त्याला माझें प्रेम अर्पण कर आणि तें त्याला कळतें का हें मला कळव. तूं चि० शांताविषयीं कांहींच कसें लिहिलें नाहींस ! हें तुझें काम तूं ती. वहिनींवर सोपवलेंस ! ही अगदी हिंदु पद्धति झाली ! तुझ्या पुढच्या पत्रांत तुझ्या मुलींसंबंधानें आणि इतरही साऱ्या गोष्टी तूं स्वतः लिही ह्या विनयातिशयामुळेंच हिंदु बालकांना साधारणपणें आपल्या मातापितरांच्या दृष्टीच्या पूर्ण प्रकाशाच्या अभावीं छायेंत वाढावें लागतें. तसें अगदीं उपयोगी नाहीं. ही आपल्यापाशीं ठेवलेली विशेष आणि पवित्र निधि आहे अशा दृष्टीनें तूं इकडे बघितलें पाहिजेस. प्रिय वहिनींना रोग झाल्याचें ऐकून वाईट वाटलें. मला

वाटत होतें ही साडेसाती आपल्या प्रिय देशाला आतां नित्याची सोडून गेली; पण त्याचा कहर तसाच चाललेला दिसतो आहे. त्याला फार जपत जा. पूर्वीच्यापेक्षां त्याची तीव्रता कांहीं कमी झाली आहे कीं अजून वैद्यशास्त्रास त्याच्यावर विश्वसनीय असें कांहीं औषध सांपडलें नाहीं ! घरीं मुंबईला प्लेग आल्याबरोबर तूं आपलें गांव सोडीत जा. त्याचीं विक्राळ नखें आपल्याला बोथटून टाकतां येत नाहींत हें निश्चित असलें तर त्यांच्या तडाख्यांतून सुटण्याकरतां कितीही व्यय पडला तरी तो अधिक नाहीं ! मला मागची पुस्तकांची बंगी १९१६ च्या जानेवारींत मिळाली व ती. बाबांना ती १९१६ च्या मार्चमध्यें मिळाली; त्यानंतर ह्या गेल्या १८ महिन्यांत आम्हाला आणखी दोन बंग्या मिळावयाला पाहिजे होत्या. पण एकसुद्धां मिळाली नाहीं. तेव्हां आम्हाला तुझ्या सुरक्षितेविषयीं अत्यंत काळजी वाटूं लागली. मला तुला तार करण्याविषयीं पर्यवेक्षकांची अनुज्ञा मागावी लागली आणि मोठ्या कृपेनें त्यांनीं ती दिलीही, पण तसा प्रसंगच येऊं न देण्याची आपण अत्यंत काळजी बाळगली पाहिजे असें मला वाटतें. अगदीं मित्या ठरवतां नाहीं आल्या तरी नियमित महिन्यांत, न चुकतां, बंग्या व पत्रें पाठवणें हा उत्तम मार्ग !

हें झालें आपल्या संबंधाचें. पण ह्या गोष्टीला सरकार किंवा डाकघर हा दुसरा पक्ष आहे. आणि त्यांच्या लहरीप्रमाणें होऊं देण्यावाचून आपल्याला गत्यंतर नाहीं. तुझ्या मागच्या पत्रांत एक बंगी पोष्टांत गहाळ झाल्याचें तूं लिहिलें होतेंस आणि गेल्या वर्षी माझें पत्रही असेंच गडप झालें ! ह्याचा अर्थ काय ! हजारों पार्सलें आणि पत्रें येथें नित्य सुरक्षित येऊन पोंहचतात. केवळ आपल्याच बंग्या आणि पत्रें अशी चमत्कारीक रीतीनें अदृश्य होतात ! हें काय डाकविभागाचें काम आहे ! तसें असेल तर त्याच्या मागें लागून बंगी कशी गहाळ झाली ह्याचें त्यांच्याकडून स्पष्ट उत्तर मिळेपर्यंत अगदीं स्वस्थ बसूं नकोस. तूं ते नोंदलें असशीलच. असें झालें म्हणजे माझ्या बंग्याचा आणि पत्रांचा हा जो घोटाळा होतो आहे त्याच्या मुळाशीं कांहीं द्वेषबुद्धि किंवा दुर्लक्ष आहे काय आणि असल्यास तें कोणाचें आहे ह्याचें स्पष्टीकरण होईल. हें झालें डाकविभागासंबंधीं--पण त्याच्याशीं डाकविभागाचा संबंध नसला तर मग सरकारचा असला पाहिजे. तसें असलें तर मग आली गिळी-मुग गिळून बसणें एवढेंच

काम. ज्यांच्या योगानें जीवित वांछनीय होतें अशा किती तरी गोष्टींवांचून दिवस काढावयाला मी शिकलों आहे; तेव्हां ह्या वार्षिक बंग्यावांचून मला रहातां येईल आणि मी तसा राहीनही. पण मुद्रणालयापासून विक्रीच्या दुकानांत पोंचेपर्यंत पंचवीस निरीक्षकांच्या दृष्टीखालून ज्यांना जावें लागतें आणि अत्यंत समर्थ अशा सूक्ष्मदर्शक यंत्रांतून ज्यांच्या पानांच्या सांगाड्याचें शरीर सुद्धां अगदीं शोधून झालें आहे तीं निर्जीव पुस्तकें---जीं अगदीं निरुपद्रवी ठरलीं आहेत अशीं पुस्तकें तरी, ज्याचीं त्याला परत करणें न्याय्य आहे असें कोणाच्याही मनांत आल्यावाचून राहत नाहीं!

नाशिकची प्रांतिक परिषद् खरोखरच यशस्वी रीतीनें पार पडली. परित्यक्त आणि विस्मृत अशा आम्हाला सुद्धां राजकीय बंद्यांच्या मुक्ततेचा ठराव वाचून आनंद झाला. जे अद्यापि आमची स्मृति राखावयाचें धैर्य दाखवितात त्यांचे आम्ही कृतज्ञतापूर्वक आभारी आहोंत. आतां पुनः एकी झाल्यानंतरही राष्ट्रीय सभेला असें कांहीं करावयाची लाज वाटावी याचें आश्चर्य वाटतें. त्या महासभेचे पुढारी फार मोठे! आपल्या भाराखालींच चूर होऊन गेले असावेत! किंवा कदाचित् त्यांना आपण फार सोवळे आहोत--बोअरांच्या बंडांतील लहान मोठ्या सर्व पुढाऱ्यांना सरसकट मुक्त करणाऱ्या सेनाध्यक्ष बोथांच्या प्रधानमंडळापेक्षां किंवा यशस्वी होईपर्यंत ऐरिश राजकीय कैद्यांच्या मुक्ततेची चळवळ ज्यांनीं क्षणभर थांबू दिली नाहीं त्या रेडमंड साहेबांच्या राष्ट्रीय पक्षापेक्षां आपण अधिक शिष्ट राजकारणपटु आणि देशभक्त आहोंत असें त्यांना वाटत असावें! मि. बोनर लॉ यांनीं मल्लीनाथी केल्याप्रमाणें उभ्या झालेल्या बंडांत सामुदायिक भाग घेण्याचें तें उदाहरण आहे म्हणून तिकडे दुर्लक्ष्य करतां येत नाहीं. कारण एक तर हिंदी राजकीय बंद्यांमध्येंसुद्धा जवळजवळ बहुतेकांना ह्या सामुदायिक भाग घेण्यासाठींच शिक्षा झाली आहे; आणि दुसरें मि. आस्क्विथ साहेबांनीं स्त्रियांच्या मतदानाच्या अधिकाराची चळवळ करणाऱ्या बायांना प्रत्येक खटल्यांत व्यक्तिशः अपराधासाठीं शिक्षा झाल्याचें मान्य असतांनाही ह्याच्या पुष्कळ पूर्वीच मुक्त करून सोडून दिलें आहे. पण राष्ट्रीय सभा कांहींही करो. युद्ध थांबल्या-बरोबर राजकीय बंद्याच्या मुक्ततेसाठीं सार्वजनिक अर्ज पाठवण्याचा प्रयत्न करतां आला तर पहा. ह्या नुसत्या अर्जामुळें आणि ठरावामुळें अशी मुक्तता केली

ज्ञात नाहीं हें खरें आहे. पण त्याप्रमाणें मुक्तता व्हावयाचा जर कधीं योग आला तर त्याच्यामुळें ती हवीशी वाटते. कारण निदान मला तरी, ज्यांचें आपल्या मातृभूमीवर प्रेम होतें, आहे, आणि नाहींसें होणें कधींही शक्य नाहीं, तसेंच जे, त्यांचा मार्ग बरोबर असो किंवा चुकीचा असो, मातृभूमीसाठीं लढतांना पडले त्यांचें स्मरण करावयाचें ज्यांना धैर्य होत नाहीं, किंवा इच्छा होत नाहीं असेंही असेल, अशा लोकामध्यें परत जावयाची लाज वाटेल. पहा, तसा अर्ज करतां आला तर अवश्य पहा. ठरावांपेक्षां किंवा सभांपेक्षां त्याचें महत्व फार आहे.

एकदां पळ दोन पळें भेटीचा योग आला असतां मी आपल्या प्रिय बाबांना म्हटलें शास्त्रांत पितृऋण, देवऋण आणि ऋषिऋण अशीं तीन ऋणें सांगितलीं आहेत. त्यांच्या सारखेंच मनुष्यावर चौथें पुत्रऋणही असतें. तुझें पत्र आल्यावर ह्या ऋणांतून मी पूर्णपणें मुक्त झालों असें मला वाटलें. कारण अखेरीस आतां तू पूर्णपणें धृतविद्य आणि कार्यक्षम झाला आहेस. पुढें कांहींही होवो. आनंदाचीं दोन वर्षे दयाळू परमेश्वरानें तुझ्या आणि तुझ्या द्वारें आमच्या पदरांत टाकलीं आहेत. चिरंतन प्रकाशित राहील असा दिवस कधींच येणें शक्य नाहीं. ह्या लोकांतलें जीवन म्हणजे त्रिदल पुष्पाप्रमाणें आहे. एका पाकळीवर सुखाचा रंग चढवलेला आहे, दुसरीवर दुःखाचा चढवला आहे आणि तिसरीवर कोणचाच रंग नाहीं किंवा ह्या दोन्ही रंगाचें मिश्रण आहे. आज सुखाच्या तर उद्या दुःखाच्या पाकळीला कीड लागलेली असते. आणि हें असें गाडें एकसारखें चाललेलें असतें. कोणतेंही पत्र, कोणतेंही जीवनचरित्र किंबहुना कोणचाही इतिहास म्हणजे, कमी अधिक प्रमाणांत इतके जन्म आणि इतके मृत्यु, इतकीं लग्नें आणि इतकीं अशौचें, इतका रंग आणि इतकी छाया ह्याचें गणित केलेलें एक कोष्टक आहे. तेव्हां मध्यंतरीं क्षणभर विसावा मिळाला, आनंदाचा किरण चुकून प्राप्त झाला, वसंत वायूची ओझरती झुळुक लागली तर लागलींच आपण शिशिर कालांतले कष्ट विसरून जातां कामा नये. वसंताची मदिरा आपल्या पेल्यांत नाचते आहे तोंच तिचें व्यसन आपल्याला लागतां कामा नये किंवा तिच्यावर आपण अवलंबून राहतां कामा नये आपल्या ह्या काळांत ज्यांचा भारतांत जन्म झाला आहे त्यांचा नेहमींचा साथीदार खरोखर शीतकाल आहे, वसंत नाहीं. आपण-कोणाही भारतांतील तरुणानें- हें विसरतां कामा नये कीं आपलें जीवन

म्हणजे एक तापलेलें, वालुकामय, जें सहन करणें शक्य नाहीं पण जें सहन मात्र करीत गेलेंच पाहिजे असें, प्रचंड सहाराचें अरण्य आहे. ह्या कोळ झालेल्या अरण्यांतून जाणाऱ्या कर्तव्याच्या मार्गानें आपण जात असतां परमेश्वराच्या करुणेनें आपल्या मार्गांत सध्यां आपल्या दैवीं आलेल्या स्थला प्रमाणें रम्य हिरवीचार स्थलें आढळलीं तर आपण हे विसरून उपयोगी नाहीं कीं हा क्वचित् संभवणारा योगायोग आहे, चुकून लाभलेला ईश्वरी प्रसाद आहे. आणि म्हणून आपण न थांबतां आणि घाईही न करतां ह्या जीवनाच्या पुण्यमय यात्रेच्या मार्गानें पुढें चाललें पाहिजे. पूर्वीच्या ऋषीप्रमाणें आपणही तोंडानें प्रार्थना करूं या "तुला वाटेल तें, तुला वाटेल तेव्हां आणि तुला वाटेल तितकें आम्हाला दे. तसेंच तुला वाटेल तें आणि तुला वाटेल तितकें आमच्यापासून काढून घे." एकंदरींत तरुणांच्या दृष्टीसमोर असावयाला योग्य असे उदात्त ध्येय संपत्ति मिळवणें हें नाही तर आत्मयज्ञ करणें हें आहे; पुष्प लतिकांनीं उद्यान शृंगारणें हें नाहीं! कारण "देवांच्या माळेसाठीं ज्याचीं सर्व फुलें शीर्ण झालेलीं असतात तेंच उद्यान चिरंतन पुष्पांनीं बहरलेलें असतें!"

चि. सौ. प्रि. माईचें कसें काय चाललें आहे? माझ्या एकुलत्या एक बहिणीला मी विसरेन ही कल्पना किती वेडेपणाची! मग मी माझ्याशीं सुद्धा रागावेन आणि अबोला धरीन. जोंपर्यंत दिवसाचा प्रकाश लाभलेला आहे तोंपर्यंतच कांहीं तरी मागें टाकून तें शांतेच्या किंवा रंजनाच्या नांवानें सुरक्षित गुंतवून ठेव. कारण हिवाळ्याला पुनः केव्हां आरंभ होईल ह्याचा नेम नाहीं! आपल्या प्रिय कामाबाईच्या अढळ लोभाला दुसरी तोड सांपडणार नाहीं. ह्या भयंकर युद्धाच्यानेंही तिला तुझा विसर पाडतां आला नाहीं! पुष्कळदां रक्त हें आवडीपेक्षा अधिक दृढ नसतें तें असें. कांहीं प्रेमें अशीं असतात कीं त्यांची कल्पना उदात्त अंतःकरणांनाच करतां येतें. रक्ताचा किंवा दुसऱ्या कोणच्याही हितसंबंधाच्या अभावानें तीं गारठून जात नाहींत; आपल्या उत्तम भूमींत वाढून तीं फोंफावतात आणि इतक्या सूक्ष्म जीवनरसांवर तीं वाढतात कीं स्थूल आणि सामान्य जगाला तीं दिसत नाहींत किंवा त्यांची कल्पना करतां येत नाहीं!

प्रियतम यमुनेचे आणि तीं. वहिनीचेंहि कुशलवृत्त कळव. त्या सर्वांना माझें प्रेम पोंचतें कर. प्रि. बाळू कसा काय आहे! मी जेव्हां त्याला मुंबईच्या

तुरुगांत पाहिलें तेव्हां तो मोठा गोड आणि सरळ पोरगा दिसला. आतां तो चांगला प्रतिष्ठित पुरुष झाला असेल. अण्णाही तसाच झाला असेल. तो मोठा कवि आणि बुद्धिवान् निघेल असा माझा त्याच्याविषयीं तर्क होता. माझी कल्पना किति बरोबर होती हें समजल्यानें मला आनंद होईल. चि. दत्तु, नाना आणि इतर माझ्या सर्व शालकांचा पूर्ण वृत्तांत कळावा आणि ते काय करतात हें समजावें असें फार वाटतें. माझ्या मागल्या पत्रांत मी त्यांचा उल्लेख केला नाहीं ह्याचें कारण प्रि. यमुना समजते त्याप्रमाणें त्यांचा मला विसर पडला हें नसून दुसरीं कारणें आहेत. आणि मागच्या अनुभवावरून तिला त्यांची योग्य कल्पना करतां येईल. ती. प्रियतम बाबा सोडले तर ज्यांच्यामुळें माझ्यांत जें जें कांही सर्वोत्कृष्ट आहे तें मला लाभलें आणि ज्यांच्या उदार आश्रयामुळें आणि आपलेसें करून घेणाऱ्या आस्थेमुळें मला ह्या जगांतील महनीय विचार आत्मसात् करावयास आणि आपल्या सर्वांच्या मातृभूमीची थोडी फार सेवा करावयास क्वचित् प्राप्त होणाऱ्या सोयी आणि संध्या मिळाल्या अशी व्यक्ति किंवा कुटुंब ह्मणजे चिपळूणकरांचें आहे. पण ज्यांच्याशीं रक्ताच्या, प्रेमाच्या आणि एकमेकाविषयींच्या आदराच्या बंधनानीं मी बद्ध झालों आहे त्यांनाच इतका त्रास, हानि आणि क्लेश द्यावयास आपण कारणीभूत झालों ही कल्पना आधींच इतकी खेदजनक आणि मनाला क्लेशदायक झाली आहे कीं आतां त्यांत रतीची भर घालावयास धैर्य होत नाहीं ! आणि ह्मणूनच अत्यंत कष्टानें त्यांविषयींचीं आपली कृतज्ञता किंवा प्रेम व्यक्त करण्यांतील समाधानाच्या सुखाचा मी त्याग केलेला आहे. नाहीं तर माझ्या शालकांसारख्या उदात्त युवकांविषयीं-निदान त्यावेळीं तरी ते असे निघावेत असें वाटे-साभिमान उल्लेख कोण करणार नाहीं ! आणि ज्यांनीं मला त्यांच्या प्रमाणेंच प्रेमानें वाढविलें त्यांचा आणि त्या तिच्या साध्वी आणि कर्तव्यशील मातेचा अभिमान कोणाला वाटणार नाहीं ? माझ्या मित्रांच्यासंबंधानें सुद्धां अशीच गोष्ट आहे. ते सर्व माझ्या स्मृतिपटलावर अढळ कोरले गेले आहेत; पण त्यांच्यासाठीं--माझ्यासाठीं नाहीं--मला त्यांचा उल्लेख करावयाचें धैर्य होत नाहीं. माझ्याबरोबरचे ह्मणून तुझ्याकडे कोण वकील आले होते ह्याची कल्पना करता येत नाहीं. पण तसें खरेंच असेल तर त्यांनीं अजूनही माझी आठवण ठेवली आहे यासाठीं त्यांचे आभार मानं. ओघानेंच गोष्ट आली ह्मणून सांगतों कीं माझ्याशीं ओळख आहे किंवा मला

येथें प्रत्यक्ष भेटले किंवा येथें त्यांचें माझें संभाषण झालें असें सांगून तुझ्याकडे येणाऱ्या मंडळींच्या संबंधांत एकंदरींत अत्यंत जपून वाग. ह्या विषयीं तुला इतका अनुभव आहे कीं तुला सूचना द्यावयाची आवश्यकता नाहीं! पण तरीही मी तुला निश्चित सांगून ठेवतों कीं मी येथून कोणाबरोबरही तुझ्याकडे पत्र किंवा निरोप धाडीत नाहीं. सगळे ऐकून घेत जा पण माझ्या ह्मणून सांगितलेल्या प्रशस्ती पत्राकडे लक्ष्य न देतां तुला जें पडताळून पहातांना पटेल त्यावांचून कशावर विश्वास ठेवूं नको. आतां वेळ संपत आली आहे आणि मला आटोपलें पाहिजे. मी कुशल आहे. तूं विचारलेली माहिती प्रि. बाबांच्या पत्रांत पाठविली जाईल. सर्वांना आमचे दोघांचे सप्रेम वंदेमातरम्. आमच्या प्रकृतिविषयीं अगदीं काळजी करूं नकोस. सर्व मानवी प्रयत्न करूनही तसाच निदानीचा प्रसंग आला तर त्यालाही तोंड द्यावयाला आम्हीं तयार आहों. मनाला त्रास करून घेऊं नको.

तुझा प्रियकर
तात्या



दा. क्र. ६४२५
शाखा

# पत्र १० वें

श्रीराम

पोर्ट ब्लेअर, ता० ४।८।१८

प्रियतम बाळ—

तुझें पत्र वाचून फार आनंद झाला. ह्या वर्षी तूं बंगया आणि पत्रें वेळच्या वेळीं पाठवल्यामुळें आम्हालाही तीं सारीं नियमित वेळीं मिळालीं आणि त्यामुळें किती तरी काळजी, त्रास आणि अजव्यवहार ह्यांच्या पासून मुक्तता झाली. पहिल्यानें माझ्या पत्राचें उत्तर, मग मला पाठवावयाची बंगी, मग प्रिय बाबांच्या पत्राचें उत्तर—ह्या व्यवस्थित क्रमानुळें ह्या वर्षी जवळ जवळ तिमाहीला तुमचें कुशल आम्हाला कळत असें. ह्यापुढेंही शक्य तितक्या नियमितपणें हा क्रम चालू ठेव.

महाराष्ट्र प्रांतिक परिषदेनें ह्या वेळीं भेदभाव न करतां सर्व राजकीय बंदी सोडण्याविषयीं एक सणसणीत ठराव केला आणि तोही बऱ्याच एकमतानें केला हें वाचून फार आनंद झाला. एकंदरींत मुंबई प्रांतिक परिषद् आपलें कर्तव्य हिंदुस्थानांतील इतर कोणत्याही प्रांतिक सभेपेक्षां अधिक नेटानें, सातत्यानें आणि निश्चयानें पाळते आहे. माझ्या माहितीप्रमाणें गेल्या वर्षी संयुक्त प्रांतीय परिषद् आणि विशेषतः आंध्र परिषद् ह्या दोन्ही सभांनीही ह्या मुक्ततेसाठीं ठराव केले होते. आंध्रपरिषदेंतील भाषा फार स्पष्ट आणि व्यापक होती; व त्यामुळें ज्यांनी, त्यांचे मार्ग बरोबर असतील किंवा चुकीचे असतील, अत्यंत कळकळीनें आणि निर्विवाद निःस्वार्थ बुद्धीनें त्यांना योग्यतम वाटलेल्या साधनांचा उपयोग करून ती महामुक्ति ( मातृभूस्वातंत्र्य ) मिळविण्याकरतां कारागृहांत कुजत पडण्यासाठीं आत्मसमर्पण केलें त्यांच्या विषयीं त्यांचें हृदय खऱ्या आणि पूर्ण सहानुभूतीनें थरथरत आहे हें दिसून आलें. पुष्कळ वर्तमानपत्रेंही ह्या मुक्ततेविषयीं नेहमीं लिहीत असतात आणि कांहीं मासिकें हिंदुस्थानांतील असंतोष दूर करावयाचा असेल तर सर्व राजकीय बंद्यांना मुक्त करणें अवश्य आहे ह्या गोष्टीवर भर देतात असें

तूं लिहितोस. हें सर्व जर खरें असेल तर अजूनही राष्ट्रीय सभेला ज्या जनसमाजाच्या नांवानें बोलण्याचा ती आपला हक्क सांगते त्या समाजातील राजकीय बंद्यांसंबंधीं सहानुभूतीचा, निदान माणुसकीला योग्य अशा साध्या सामोपचाराचा, एक शब्दही उच्चारावयाला इतकी लाज कां वाटते आणि इतकें कांपरें कां सुटतें हें माझ्या ध्यानांत येत नाहीं. गेल्या वर्षी नुसत्या प्रतिबंध केलेल्या लोकांना सोडून देण्याविषयीं त्यांनीं ठराव केला. चांगल्या वायुशीर आणि शोभिवंत सभामंडपांत आरामानें बसलेल्या ह्या देशभक्तांच्या नेत्रांना प्रतिबद्ध देशभक्तांच्या ज्या यातनांच्या स्मरणानें अश्रू आले त्यांच्या कितीतरी पटीनें अधिक आणि सतत चाललेल्या यातना इतरही--एक नाहीं दोन नाहीं तर शेंकडो लोक-सहन करीत आहेत ही गोष्ट हे पूर्णपणें आणि सोयिस्कर रीतीनें पार विसरून गेले! ह्या मंडळींची राष्ट्रसेवा आणि आत्मबलिदान आपल्या केवळ प्रतिबद्ध देशबांधवांपेक्षां निदान कमी असणें शक्य नाहीं; आणि तशांत त्यांचे हे क्लेश प्रतिबद्धांच्याप्रमाणें युद्ध संपण्याबरोबर आपोआपच संपावयाचे नाहींत. तेव्हां जनतेच्या संभावित म्हणून वावरणाऱ्या पुढाऱ्यांनीं वास्तविक त्यांच्याकरतां अधिक नेटाची आणि प्रचंड चळवळ करणें भाग आहे. 'संभावित' ह्याच शब्दांत सगळें रहस्य भरलें आहे! ते प्रतिबद्धांच्या संबंधानेंच केवळ बोलतात; कारण त्यांना माहित आहे कीं त्यांत अधिक सुरक्षितता आहे. इतरांच्या विषयीं बोलावयाची त्यांची छाती होत नाहीं! कारण तसें झालें तर लागलींच त्यांच्या यजमानांच्या दृष्टीतून ह्यांची प्रतिष्ठा पार उतरावयाची! नाहीं तर निरनिराळ्या प्रांतिक परिषदांनीं इतक्या वेळेला आणि इतक्या स्पष्टतेनें बहुतेक प्रांतांची राजकीय कैदी मुक्त झालेच पाहिजेत अशी उत्कट इच्छा आहे असें दाखवून दिलें असतांना राष्ट्रीय सभेनें ह्या प्रकरणांत अजून कां मूग गिळावेत हें समजणें कठिण आहे. राष्ट्रीय सभेचें कारस्थान ज्यांच्या तंत्रानें चालतें अशा थोड्या शिष्टांच्या भावना प्रदर्शित करणें हें राष्ट्रीय सभेचें काम नसून ज्या बहुतम समाजामुळें तिला प्रतिष्ठा आणि पाठिंबा मिळतो व ज्यांच्या नांवामुळेंच आपल्याला मुळांत राष्ट्रीय सभा म्हणवून घ्यावयाचा तिला अधिकार पोंचतो त्यांच्या भावना प्रदर्शित करणें हें आहे. जेव्हां इतक्या प्रांतिक परिषदांनीं इतक्या वेळा हा ठराव केला आहे; जेव्हां प्रमुख वृत्तपत्रांनीं आणि मासिकांनीं ह्या प्रश्नावर सतत भर दिला आहे; जेव्हां प्रत्यक्ष राष्ट्रीय सभेच्या पुढाऱ्यां पैकींही पुष्कळांनीं कारागृहाच्या भिंतींच्या

आड खितपत पडावयाची त्यांची पाळी आली असतांना ज्या लोकांकरतां आपण झगडलों त्यांनीं आपल्याविषयीं सहानुभूतीनें उल्लेख करावा अशी इच्छा केली इतकेंच नाहीं तर अशी इच्छा करणें हा आपला अधिकार आहे असें तें समजले; आणि सर्वांत अधिक म्हणजे आयरीश किंवा बोअर लोकांची गोष्ट दूरच राहिली, प्रत्यक्ष आस्ट्रियांतील लोकांनींसुद्धां आपल्या सर्व राजकीय कैद्यांची मुक्तता झाली पाहिजे अशी चळवळ करण्याचें धैर्य, प्रामाणिकपणा आणि कृतज्ञता दाखविली आणि तींत यश मिळवलें; जेव्हां ह्या सर्व गोष्टी ज्ञात आहेत, मान्य आहेत, तेव्हां मला वाटतें ह्या वर्षी महाराष्ट्र किंवा आंध्रप्रांतिक परिषदांनीं केलेल्या ठरावासारखा, व्यापक आणि सणसणीत ठराव राष्ट्रीय सभेला मान्य करावयाला भाग पाडता येईल. आणि भाग पाडलें पाहिजेही. कांहीं वृद्ध कपींना त्याची भीति वाटत असेल तर त्यांनीं ज्या बैठकींत हा ठराव होईल त्या बैठकींत उपस्थित होऊं नये! मूठभर शिष्टांना कांपरें भरतें म्हणून तुम्ही सर्वांनीं ह्या मुग्धवृत्तीच्या अपराधांत भागीदार कां व्हावें?

दुसरी गोष्ट म्हणजे असला एकादा ठराव किंवा चळवळ परिणामकारक होण्यासाठीं एक दोन काळज्या घेणें अवश्य आहे. पुष्कळ वृत्तपत्रें राजकीय बंद्यासंबंधी लिहितात. पण त्यांची भाषा इतकी संशयास्पद असते कीं सरकारच्या किंवा लोकांच्यासुद्धां "राजकीय बंदी" ह्या कंठाळी शब्दप्रयोगाचा अर्थ काय हें साहजिकच लक्ष्यांत येत नाहीं. कधीं त्याचा अर्थ केवळ प्रतिबंध केलेले असा होतो तर केव्हां नुसते दृष्टिबद्ध असा होतो. कधीं त्यानें देशांतरित झालेल्यांचा तर कधी 'राजबंद्यां'चा बोध होतो. पण ज्यांना राजकीय स्वरूपाच्या अपराधासाठीं शिक्षा झाली तें बंदीवान् असा त्याचा अर्थ झाला तरी क्वचितच होतो. गेल्या वर्षीच्या पत्रांत स्वतः बोनार लॉनीं आयरीश बंद्यांच्या संबंधांत बंडांत भाग घेतलले लोक वैयक्तिक कृत्यासाठीं दोषी नाहींत असा भेद केल्याचें दाखवलें होतें. आतां त्या सद्गृहस्थांना पुरें माहिती आहे कीं, मतदानाच्या अधिकारासाठीं झगडणाऱ्या सर्व बायकांना आग लावण्यासकट सर्व वैयक्तिक कृत्यासाठीं शिक्षा झाल्या होत्या. पण युद्ध चालू झाल्याबरोबर स्वतः बोनार लॉ ज्यांत अधिकारापन्न आहेत अशा प्रधानमंडळानेंच त्या सर्वांना सोडून दिलें! असें जर आहे तर मग 'शिक्षा पावलेले' ह्या शब्दाचा हिंदुस्थानांतील प्रतिष्ठितांना इतका बागुलबोवा

कां वाटावा आणि 'वैयक्तिक कृत्याचा' पडद्यानें बोनार लॉ साहेबांच्या परस्पर विरुद्ध कृति झांकून कां टाकाव्या हें माझ्या लक्ष्यांत येत नाहीं! बोथा मुख्य प्रधान आहेत, आणि रेडमंड हे पार्लमेंटरी पक्षाचे घटनान्वित पुढारी आहेत! आणि तरीही आपल्याशीं विरोध करणाऱ्या आणि सरकार विरुद्ध प्रत्यक्ष बंडांत भाग घेणाऱ्या आपल्या लोकांना त्यांनीं सोडवलें. पण राष्ट्रीय सभावाल्यांना आपण 'प्रतिष्ठित' लोक आहोत असें वाटतें! नगराच्या वेशीशीं भिक्षापात्र घेऊन भीक मागणारा महारसुद्धा प्रत्यक्ष नगराध्यक्षापेक्षां अधिक उत्तरदायित्व ओळखणारा नागरिक आणि अधिक उच्च जातीचा असतो म्हणावयाचा! तेव्हां ह्यापुढें येणाऱ्या ठरावांत आणि लेखांत राजकीय बंदी म्हणजे ज्यांना केवळ राजकीय हेतूनें केलेल्या कृत्यासाठीं प्रतिबंध केला आहे असे सध्या अटकेंत आहेत ते सर्व लोक; मग त्यांना शिक्षा झालेली असो किंवा नसो आणि ती शिक्षा वैयक्तिक कृत्यासाठीं असो किंवा सामुदायिक कृत्यासाठीं असो; हा मुद्दा स्पष्टपणें व निश्चितपणें पुढें मांडला पाहिजे. ( मला ह्या प्रकरणांतील हातचलाखी लक्षांतच येत नाहीं! ) कोणचेही कृत्य राजकीय आहे कीं वैयक्तिक आहे ह्या भेदाचा निर्णय कृत्याच्या निरनिराळ्या जातीवरून करतां येत नाहीं. तर तो केवळ कृत्यांच्या मुळाशीं असलेल्या हेतूवरूनच करतां येतो. प्रत्यक्ष कृत्यामध्यें वैयक्तिक किंवा राजकीय असें कांहीं नसतें. आणि म्हणून केवळ स्वतःच्या पोळीवर तूप ओढण्याठीं जरी अगदीं बंड केलें तरी तें कधींही राजकीय होऊं शकत नाहीं आणि त्याविषयीं कोणासही सहानुभूति वाटावयाचें कारण नाहीं. आतां स्वतःचें कार्य हें एक निमित्त कारण असलें आणि केलेला झगडा वास्तविक सार्वजनिक हेतु प्रस्थापिण्यासाठीं किंवा सर्वसाधारण आचारस्वातंत्र्याचें समर्थन करण्यासाठीं असेल तर लागलींच त्यांत भेद होतो. ठगानींही युद्धें केलीं. पण सार्वत्रिक हितासाठीं केलेला आत्मयज्ञ ह्या दृष्टीनें त्यांना राजकीय असें कधींही म्हणतां यावयाचें नाहीं. उलट स्त्रीमतदानाच्या अधिकारासाठीं झगडणाऱ्या बायांनीं आगी लावल्या किंवा प्रत्यक्ष प्रधानाला अतोनात झोडपून काढलें; हीं कृत्यें ब्रिटिश सरकारानेंही राजकीय ह्मणून मान्य केलीं आहेत; कारण त्यांच्या बुडाशीं वैयक्तिक प्रतिशोध किंवा बलात्कार हा हेतू नसून कांहीं तरी सामाजिक हिताचें संवर्धन हा होता. साधनें चुकीचीं असतील राजनिर्बंधविरुद्ध देखील असतील; पण नैतिक दृष्टीनें विचार करतांना केवळ हेतूकडे लक्ष दिलें पाहिजे.

आणि येथें त्या कृत्यांच्या राष्ट्रीय स्वरूपाचा प्रश्न उपस्थित होतो. राजबंद्यांना क्षमा करावयाचा विचार ठरला--तसें ठरेल असें मला वाटत नाहीं--तर ह्या अर्थाची आमच्या मार्गांत मोठी धोंड टाकण्यांत येईल ह्मणून ह्यावर विशेष भर देऊन मी लिहितों आहें. कारण मग सरकार असा कांहीं विसंगत भेद काढील आणि राजकीय ह्या शब्दाचा वास्तविक अर्थ न करतां आपल्याला सोयिस्कर असा अर्थ करून घेईल. तेव्हां आपल्या वर्तमानपत्रकारांनीं आणि पुढाऱ्यानीं ही गोष्ट नेहमीं आपल्या दृष्टी समोर ठेविली पाहिजे. आणि तूंही ज्यांच्याशीं तुला भेटावयाचा प्रसंग येईल त्यांना ही गोष्ट स्पष्ट करून सांगत जा.

कोणच्याही प्रांतिक परिषदेनें अशा अर्थाचा ठराव केला काय, तसेंच गेल्या वर्षाच्या राष्ट्रीय सभेनें विषय नियामक मंडळांत तरी ह्याविषयीं चर्चा केली काय, ह्या राजकीय बंद्यांच्या संबंधांत कोणकोणचीं वृत्तपत्रें मनापासून चळवळ करतात आणि ह्या वर्षीं राष्ट्रीय सभेंत ह्या संबंधांत कांहीं करतां येणें शक्य आहे काय हें तुझ्या पत्रांत लिही. कांहीं विशिष्ट व्यक्तींच्या करतां ठराव झाले असले तर तें लिहावयाचें कांहीं कारण नाहीं; जेथें सार्वत्रिक क्षमेचा ठराव झाला असेल तेवढीच उदाहरणें लिही ह्मणजे झालें.

वरील प्रमाणेंच जनतेकडून पाठवावयाच्या सार्वजनिक अर्जाच्या कल्पनेचें काय झालें हेंही लिही. तुझ्या मागच्या पत्रांत तूं त्याबद्दल कांहीं लिहिलें नाहींस. ती कल्पना अगदीं सोडून देतां कामा नये. युद्ध संपल्यावर आपल्याला ती कल्पना जास्त परिणामकारक रीतीनें मांडतां येईल. म्हणूनच तूं ती पुढें ढकललीस असें मी समजतों. तसें असेल तर ठीक आहे. येथें आलेल्या एका पत्रांत मांटेग्यू हिंदुस्थानांत असतांना राजकीय बंद्यांच्या मुक्ततेचा एक अर्ज त्यांच्याकडे पाठविण्यांत आला असें मी वाचलें हें बरोबर आहे का ? तसेंच ह्या प्रकरणांत सभांची एकदां झोड उठवून द्यावयाची आहे असें तूं बोलला होतास. तेंही मागें पडूं देता कामा नये. उलट एकदाच नाहीं तर प्रतिवर्षीं कांहीं विशिष्ट दिवसांत तसें करीत गेलें पाहिजे. राष्ट्रीय सभा, राजकीय परिषदा, राजकीय बंद्यांनीं व त्यांच्या कुटुंबांतील मंडळींनी अर्ज करणें, केवळ ह्याच हेतूनें भरवलेल्या सभांची मालिका, वृत्त पत्रांची नेहमींची चर्चा, प्रांतिक आणि

वरिष्ठ विधिमंडळांत व प्रत्यक्ष पार्लमेंटांत प्रश्न विचारणें; हें सर्व आणि त्यांतील प्रत्येक गोष्ट संघटित पद्धतीनें आणि सातत्यानें वर्षोवर्षी राजकीय बंद्यांचा प्रश्न तेथील राजकारणांत आवश्यक होऊन बसेपर्यंत एकसारखी चालविली पाहिजे. प्रत्येक दिशेनें काय काय करण्यांत येईल त्याचा सारांश तुझ्या प्रत्येक पत्रांत देत जा. आणि जेव्हां ठरावांत आणि लेखांत सरकारला किंवा लोकांना उद्देशून राजकीय बंदी हे शब्द उल्लेखिले जातील तेव्हां त्यांचा अर्थ स्पष्ट करावयाला विसरूं नको.

ह्या सर्व चर्चेमध्यें ह्या चळवळीचा प्रत्यक्ष उपयोग किती होईल ह्याच्या पेक्षां तिचा नैतिक परिणाम काय होईल इकडे माझी दृष्टि आहे हें मला मान्य आहे. गेल्यावर्षी पाठविलेल्या एका पत्रांत मी सरकारला स्पष्ट लिहिलें आहे कीं हिंदुस्थानांत खरोखर घटनाबद्ध आणि प्रगमनशील अशी राज्यव्यवस्था प्रस्थापित करणें आणि सर्व राजकीय बंद्यांची मुक्तता करणें ह्या दोन्ही प्रश्नांची एकमेकांशीं पक्की आणि न सुटणारी गांठ पडलेली आहे. तेव्हां अशा रीतीची सुटका प्रामुख्यानें आणि त्वरित प्रत्यक्ष कृतींत येण्याचा संभव नाहीं, आणि तशी आशाही आपण करूं नये. पण जरी अशा रीतीनें ह्या चळवळीचा प्रत्यक्ष परिणाम घडून आलेला दिसणें अशक्य आहे ह्याची आपल्याला जाणीव असली पाहिजे तरी तिचा नैतिक उपयोग फार आहे हें आपल्याला विसरतां येत नाहीं. तिच्यामुळें आपलें राष्ट्रीय शील आणि प्रभाव लागलींच वाढेल आणि सर्वांना प्रिय असें कार्य यशस्वी करण्यासाठीं ज्यांनीं युद्धक्षेत्रांत पदक्षेप केला अशा आपल्या हुतात्म्यानीं, सैनिकांनीं आणि आत्मत्यागयांनीं सहन केलेल्या क्लेशांची राष्ट्रीय आठवण प्रफुल्ल राहून त्यांना हें युद्ध अंतिम यशाची माला हस्तगत करीपर्यंत चालविण्याला आणि भांडण्याला प्रोत्साहन येईल. युद्धांत ज्यांनीं प्राण समर्पण केला आहे अशा वीरांची कृतज्ञ स्मृति जागी ठेवणें हाच तें युद्ध पुढें चालविण्यासाठीं अधिक सैनिक मिळवण्याचा अत्यंत परिणामकारक मार्ग आहे.

वर ज्याचा उल्लेख आलेला आहे त्या अर्जांत मी मांटेग्यू आणि व्हाइसराय ह्यांच्यापुढें ह्या राजकीय बंद्यांच्या मुक्ततेच्या प्रश्नाविषयीं माझें मत मोकळेपणानें मांडलें आहे. त्यांतले मुख्य विचार असे आहेत. हिंदुस्थानच्या

राजकीय सुधारणांचा विचार करीत असतांना जर खरोखरच लोकनियंत्रित राज्यपद्धति स्थापावयाचा त्यांचा हेतु असेल तर आम्हाला ह्यापुढें तुरुंगांत कोंडून ठेवणें अगदीं व्यर्थ आहे ही गोष्ट अमान्य करून त्यांना चालावयाचें नाहीं. कारण जर खरोखर लोकनियंत्रित अशी राज्यपद्धति दिली आणि तरीही राजकीय बंदी मुक्त केले नाहींत तर ते ह्या पद्धतींच्या मानेभोंवती लोढण्यासारखें अडकून राहतील. कारण तोंपर्यंत दगडी भिंतींच्या आणि कोठड्यांच्या आड आम्हांला दडवलें आहे ह्या गोष्टीची जाणीव सरकार आणि लोक ह्यांच्या मधील जुन्या अविश्वासाची आणि तेढीची स्मृति जिवंत ठेवल्यावांचून राहणार नाहीं. आणि त्यामुळें सरकारनें दृष्टि कोन पालटिवल्याविषयीं आणि परस्पर विश्वास आणि सहकारिता स्थापण्याच्या प्रयत्नाच्या प्रामाणिपणाविषयीं कितीही गोष्टी सांगितल्या आणि पश्चाताप दाखवला तरी त्याला फार कमीपणा येणार. कारण जरी लोकांना बाहेरून स्वराज्याचा अधिकार दिला आणि इकडे सर्व राजकीय बंद्यांची मुक्तता केली नाहीं तर राष्ट्रातील खऱ्या असंतोषाची मुळें तशींच कायम राहणार. जेथें भावाला भावापासून ओढून नेलेला आहे, जेथें शेकडों आणि हजारों मातृभूमिचे पुत्र पिंजऱ्यांत कोंडलें गेले आहेत, सीमापार झाले आहेत, किंवा कारागृहांत डांबलें आहेत आणि जेथें प्रत्येक दोन कुटुंबांत भाऊ किंवा मुलगा किंवा बाप किंवा स्नेही किंवा प्रियकर ह्यांच्यापैकीं कोणाला तरी आपल्या प्रेमाच्या स्थानापासून बलात्कारानें काढून नेऊन विरहाच्या तृषार्त करणाऱ्या आणि होरपळविणाऱ्या सहारारण्यामध्यें बांधून ठेवण्यांत आले आहे तेथें शांतता आणि समाधान आणि विश्वास कसा नांदणार ! उलट पक्षीं हें प्रतिपादन जरी माझ्या वैयक्तिक हिताच्या विरुद्ध होते तरी केवळ सत्य आणि प्रामाणिकपणा राखण्यासाठीं मी हेंही सांगितलें कीं—हिंदुस्थानांत लोकनियंत्रित राज्यपद्धति स्थापण्याचा प्रामाणिक आणि भरभक्कम उपक्रम केल्यावाचून केवळ राजकीय बंदी सोडणें हेंही तितकेंच निरर्थक आहे. कारण जेथील प्रत्येक मार्गावर अनुज्ञेवाचून आंत येणाऱ्यावर खटला करण्यांत येईल अशा प्रतिषेधाच्या पाट्या लागल्या आहेत, संशयाची मर्यादा ओलांडल्यावाचून जेथें सरकणें देखील शक्य नाहीं, जेथें प्रत्येक पुढें टाकलेल्या पाउला बरोबर बाहेरच्या राज्याधिकाऱ्यांचा मानभंग होतो आणि जेथें प्रत्येक मागे घेतलेल्या पावलाबरोबर आत्मगौरव आणि सदसद्विवेकबुद्धी ह्यांची

मानखंडना होते—कारण नियंत्रण चालविण्यांत हींही तितकीच अरेराव असतात-अशा भूमींत आयुष्य काढणें आम्हाला अशक्य होईल. तेव्हां स्वराज्य आणि बंदीमुक्तता ह्यांची जोड आहे; आणि एकाचा परिणाम होण्यासाठीं त्याबरोबर दुसरेंही करणें अवश्य आहे. त्या अर्जात मी असेंही लिहिलें आहे कीं, अर्ज पाठविण्यांत सर्व राजकीय बंदींची निरपवाद बंधमुक्तता हा माझा उद्देश आणि साध्य असल्यामुळें तें साधणाच्या मार्गांत माझे वैयक्तिक उदाहरण कांट्यासारखें आड येत असेल तर एकटें माझें नांव ह्या बंधमुक्ततेंतून वगळावयाला माझी अत्यंत संतोषानें संमति आहे. सरकारनें ही विचारसरणी जर मान्य केली—आणि मांटेग्यूच्या योजनेच्या इतक्यांतच प्रसिद्ध झालेल्या खरड्यामध्यें जणूं काय असल्या प्रश्नाना उत्तर ह्मणून एका महत्वाच्या छेदकांत अशी आशा प्रदर्शित केली आहे-तर आतां आपल्या आशा आणि आकांक्षा साध्य करण्यासाठीं घटनाशीर पद्धतीनेंच कांहीं करतां येण्यासारखें आहे असें क्रांतिकारकांना वाटेल आणि ते आपलीं मनें पालटून चळवळीचे उपयुक्त मार्ग स्वीकारतील.-आणि खरोखरच वरिष्ठ विधिमंडळांत लोकप्रतिनिधींचे घरघसीत बहुमत मिळाले-मात्र बड्या सभेचें ( कौन्सिल ऑफ स्टेटचें ) लोढणें त्या विधिमंडळाच्या डोक्यावर निरंतर टांगलेलें ठेवून त्याच्याद्वारें देशहिताची कोणचीही गोष्ट करावयाला गेलें तर तिच्यांत विघ्न करावयाची सोय करून ठेवलेली असतां कामा नये-आणि त्याबरोबरच देश त्याग करणें भाग पडून अमेरिका, यूरोप इत्यादि इतर देशांत ज्यांना काळ कंठावा लागतो आहे किंवा जे स्वदेशीं बंदिवासांत पडलेले आहेत अशा सर्व राजकीय बंदींची मोकळ्या मनानें बंधमुक्तता करण्यांत आली तर मी एक आणि मला माहिती असलेले कित्येक बंदी असल्या राज्यघटनेचा वचनपूर्वक स्वीकार करतील; आणि आमच्या देशबांधवांची तशी इच्छा असली व सरकारनें तसें करावयास संधि मिळूं दिली तर त्या घटनेखालींही आह्मी कार्य करूं व ज्यांनीं आजपर्यंत आमच्याशीं द्वेषबुद्धीचीच भावना ठेविली आणि जणूं काय त्यांच्या विषयीं आणि त्यांच्या धोरणाविषयीं आमचीं मनें दूषित व्हावीं ह्मणून कांहींही करावयाचें वगळलें नाहीं, त्या कायदे मंडळांच्या सभांगृहांतही आमचें जीवनकार्य पार पाडण्यासाठीं झटूं. केवळ करमणुकींसाठीं अग्नीच्या रक्तबंबाळ पावलांनीं कुपित देवतांच्या मार्गावरून चालावयाची किंवा अग्निदिव्य करावयाची इच्छा

करील असा कोण मनुष्य आहे? असा मनुष्य सांपडणें विरळ आहे; आणि अधिक सुरक्षित, अधिक श्रेष्ठ आणि पाशवी शक्तीची सर्वांत कमी अवश्यकता असल्यामुळें व पूर्णपणें परिणामकारक असल्यामुळें अधिक नैतिक असा मार्ग-घटनाशीर प्रगतीचा मार्ग-मोकळा असला तरीही आणि तेव्हांही अनिरुद्ध, रक्तमय आणि अवश्यमेव मनाला थरथरावून सोडणाऱ्या राज्यक्रांतींत आवडीनें उल्हासानें पडेल असा विश्वकुटुंबी देशभक्त सांपडणें त्याहून ही विरळ आहे. जेथें कसली घटनाच नाहीं तेथें घटनाशीर चळवळींची गोष्ट काढणें ह्मणजे निव्वळ थट्टा आहे; पण जेथें इंग्लंड किंवा अमेरिकेंतल्या प्रमाणें प्रगतिपर आणि जिच्या द्वारें वाटेल तें ध्येय गाठतां येईल अशी लवचिक राज्यघटना आहे तेथें जगू काय सुमनहार गुंफण्याचेंच कार्य अशा रीतीनें राज्यक्रांती विषयीं बोलणें ह्मणजे थट्टेपेक्षांही अधम आहे--अधर्म्य आहे.

गेल्या आक्टोबरमध्यें अक्षरशः असें पत्र मी सरकारला लिहिलें आणि अलीकडे दिसून येणाऱ्या बदललेल्या दृष्टि कोनावरून मला वाटते कीं पार्लमेंट-पुढें हें बिल आलें असतांना योग्य रीतीनें आणि संघटितपणानें त्याचा पुरस्कार केला गेला तर स्वीकार करण्यासारखी अशी राज्यघटना आपल्यास मिळावी. मी पुनः एकदा व्हाईसरायांच्या हें दृष्टीला आणून माझ्या अर्जाविषयीं हिंदुस्थान-सरकारनें कांहीं निश्चित निर्णय केला आहे काय हे मी विचारणार आहे. ता. १।२।१८ ला हिंदुस्थान सरकारकडून 'राजकीय कैद्यांच्या बंधमुक्ततेच्या प्रश्नाचा सरकार विचार करतें आहे' असें मला उत्तर आलें होतें. त्यानंतर युद्ध संपल्याबरोबर लवकरच ह्या बंधमुक्ततेचा ठराव सरकारपुढें मांडणार असें वाटावयाला मला जागा मिळाली आहे. ह्याविषयीं तुला परभारें विचारणा करतां आली तर तूच विचार कारण; मला एकादी गोष्ट विचारावयाची ह्मणजे नोकरशाहीची किती तरी मनधरणी करावी लागते.

दुसऱ्या वर्गात आह्मी चढवले गेलों ह्मणजे आम्हाला कोण कोणचे अधिक अधिकार मिळतात ह्मणून तूं तुझ्या गेल्या पत्रांत विचारलें आहेस? सांगू का कोणच्या सवलती मिळाल्या त्या! तुरुंगाच्या बाहेर जातां येणें?-नाहीं. लेखनाची सामग्री जवळ ठेवतां येणें?-नाहीं. तीं. बाबांच्या समवेत रहतां निदान

बोलतां तरी येणें ?-नाहीं. बार्डरच्या पदवीवर बढती निदान कोठडीच्या किल्ली कुलपांतून सुटका ?-नाहीं. अधिक चांगली व माणुसकीची वागणूक ?-नाहीं. अधिक पत्रें पाठवण्याची मोकळीक ?-नाहीं. घरच्या मंडळीच्या भेटीची सवलत ? इतर कैद्यानां ५ वर्षांनंतर ती मिळते मला ८ वर्षे होऊन गेलीं आहत ! नाहीं. 'तर मग दुसऱ्या वर्गांत बढती होण्यापासून लाभ तरी कोणता' असें तूं अजूनही विचारीत असशील तर तसा मोठा लाभ आहे. दुसऱ्या वर्गांत बढती होणें हा स्वतःच नाहीं का केवढा मोठा अधिकार !! आलें लक्ष्यांत डॉक्टर साहेब !

हें झालें कारागृहांतल्या सोयींविषयीं ! पण जेव्हां माझी प्रकृति आजच्या मानानें सुदृढ होती तेव्हां हें सर्व सह्य होतें. पण मला लिहिणें प्राप्त आहे कीं ह्या वर्षीं एक मोठी आणि महत्वाची आपत्ति माझ्या वाटेला आलेली आहे. माझी प्रकृति पूर्णपणें ढांसळली आहे ! मी तुला शक्य तोंपर्यंत हे शब्द लिहिलें नसतें हे तुला माहिती आहेच पण आतां तसें लिहिणें माझें कर्तव्य आहे असें मला वाटतें. आंधळ्या प्राक्तन देवीनें आपल्या नेहमीच्या फेरीमध्यें आणलेल्या कोणच्याही आपत्तीनें गीतेचा अभ्यास करणारा माझा सख्खा भाऊ कधींही चलित होणार नाहीं आणि चहूंकडून उठलेल्या वादळांना तोंड देत तस्सा खंबीर उभा राहील असा माझा विश्वास आहे ! प्रतिवर्षी विशुद्ध आनंदाचा जर एक दिवस असेल तर तो घरीं पत्र पाठविण्याचा दिवस असे. ह्या वर्षी त्या दिवसाचा आनंदही अर्धवट आहे. हें तुझें पत्र लिहितांना स्मृति जरी आनंद सागरांत पोहते आहे; सर्व आनंददायक प्रसंग, आवडीची मुखकमलें, उपकारांच्या कृतज्ञ आठवणीं नेत्रांसमोर मूर्तिमंत उभी झालीं आहेत; तरी हे एवढेसें पत्र लिहितांना शरीराला त्रासाची जाणीव होते आहे ! सूक्ष्माला कितीही भरारी मारतां आली तरी स्थूल जड अवयव कुरकुर करूं लागले आहेत आणि मध्यें विसावा घेतल्यावाचून मला पुढें लिहवत नाहीं ! गेल्या वर्षी मार्चांत माझें वजन ६० शेर (१२० रतल) होतें यंदा ४९ शेर (९८ रतल) आहे ! आम्ही ह्या कारागृहांत जेव्हां येऊन पोंचलों तेव्हांचे वजन म्हणजे आमचें नेहमींचें वजन ते समजतात. पण ही चूक आहे तेथल्या कारागृहांत आणि कोठडींत वर्षानुवर्षे खितपत पडल्यावर आम्ही येथें येतों. तरीही मी येथें आलों तेव्हां माझें वजन १११ पौंड होतें. प्रारंभी वैद्यकीय उपचारांच्या झालेल्या हेळसांडीनें जडलेल्या नेहमींच्या अमांशानें मल

अस्थिपंजर करून सोडलें आहे. ८ वर्षें हा भार मी चांगल्या रीतीनें सहन केला. असंख्य आणि अज्ञेय यंत्रणांनीं माझ्या सत्वाची कसोटी पाहिली; तसेंच अधिक्षेपानीं, धमक्यांनीं, उसाशांनीं भरलेल्या व धैर्य आणि शील नाहींसें करणाऱ्या दुर्गंधी, दूषित झालेल्या भोंवतालच्या वातावरणानें जीवनाची उज्वल ज्योत विझवण्याचा प्रयत्न केला; पण ईश्वरानें हीं आठ वर्षे तशाही परिस्थितींत उभे राहावयाची-ताठ उभे राहावयाची-ह्या सर्वाला तोंड द्यावयाची-शक्ति मला दिली. पण आतां जड देहाला बुजून यावयाला कठिण असे घाव बसले आहेत आणि तो दिवसानुदिवस झुरत चालला आहे असें वाटूं लागलें आहे! सांप्रत तुरुंगांतील हालरांनीं [ मेडिकल सुपरिन्टेन्डेन्ट ] माझ्या अशक्त प्रकृतीकडे थोडें विशेष लक्ष्य द्यावयाला प्रारंभ केला आहे. तरी अजूनही मी कामावर आहे. रुग्णालयांत नाहीं! माझ्यासाठीं रुग्णालयांतल्या अन्नाची योजना झाली आहे! ते अधिक चांगलें शिजवलेलें असतें. मी नेहमी नुसता भातच खातों आतां दुध आणि रोटी देण्याची व्यवस्था झाली आहे. त्यामुळें थोडें बरें आहे आणि सुधारणा होईल अशी आशा आहे. ह्या नेहमीच्या क्षीणतेचें रुपांतर एखाद्या असाध्य रोगांत आणि त्यातही बंदीशाळेंत आणि विशेषतः अंदामानांत कैद्यांच्या साथी बनलेल्या क्षयरोगांत होणें हेंच अधिक संभवनीय. एकच आणि तेवढ्याच योजनेनें प्रकृति पूर्वी सारखी होणें शक्य आहे आणि ती म्हणजे थारेपालट हा थारेपालट तुरुंगाच्या भाषेतला उपयोगाचा नाहीं; कारण तुरुंगांत पालट म्हणजे वाइटाकरतां हें ठरलेलें. चांगला पालट, हिंदुस्थानांतल्या कारागृहांतल्या निरोगी जलवायूंतला थारेपालट पाहिजे. येथला तोच तो दिनक्रम भयंकर भासूं लागला आहे. तरी पण विशेष काळजी करूं नकोस; त्याचा प्रयत्न चालला आहे पण निकाल लावणें त्याला शक्य नाहीं. कारण कारागृहांत स्वाभाविकच सहन करण्याची मोठी शक्ति असते ते कुजवतात पण समूळ मारीत नाहींत! ते सडवतात पण जिवंत राखतात! बंद्यानीं किंवा त्याहूनी अधिक वर्षें जीवनाच्या संशयास्पद स्थितींत काढल्याची उदाहरणें कांहीं कमी नाहींत! शरीर कितीही दुर्बल झालें असलें तरी भीतीचें कारण नाहीं-निदान आणखी दोष वाढून असाध्यतेचीं चिन्हें दिसूं लागे पर्यंत तरी नाहीं!

आणि हेही सारें केवळ जडदेहाचा संबंध आहे तेवढ्यापुरतेंच आहे. कारण प्रचंड ज्वाला निघणाऱ्या चितेवर खिळून टाकलें असतें कोणाही शरीराला न जळतां प्रतिकार करीत राहणें शक्य नाहीं. तरी पण अजूनही मनाला, थरथरणाऱ्या अस्थिमांसावर अधिकार चालविण्याची शक्ति व इच्छा आहे. ह्याहून अधिक, जितके असतील तितके सारें, क्लेश सहन करावयाला आणि तेंही केवळ कुरकुर न करतां इतकेंच नाहीं तर यत्किंचितही विचलित न होतां सहन करावयाला, तें सिद्ध आहे. ह्या मानानें ती. बाबांच्या नेहमींच्या डोकें दुखण्यानें त्यांचें वजन १०६ रत्तलांवर आणलें असलें तरी त्यांची प्रकृती चांगली आहे.

माझ्या प्रिय कामाबाईंना माझें प्रेम आणि प्रणाम पोंचवावयाला विसरूं नकोस. त्या आपल्या प्रकृतीची काळजी घेतात ना! भोंवतालीं मधुर हास्य करणाऱ्या मुलांच्या संगीतांत एकतान होऊन जे दिवस काढावे असें कोणालाही वाटावयाचें ते दिवस देशत्यागी होऊन त्यांना परदेशांत कंठावें लागावें म्हणजे किती भयंकर आहे! तसेंच चि. सौ. माईचें कसें आहे? आपली बहीण! तिला कितीही कष्ट सहन करावे लागोत–तिचे भाऊ केवळ कर्तव्यासाठीं त्याहून अधिक क्लेश सहन करीत आहेत हें तिनें लक्ष्यांत ठेवावें–तसेंच कांहीं झालें तरी तिचा वसंत तिच्याजवळ आहे; त्याचें मुखकमल पाहिल्याबरोबर आयुष्यांतील सर्व कष्टांची विस्मृति, सर्व अन्यायांविषयीं क्षमावृत्ति, वाटली पाहिजे. तरी पण बंधूप्रीति तिच्याकडे धांव घेते आहे; भावाच्या ह्या सहानुभूतीनें आणि आशीर्वादानें तिच्या मनाला कांहीं तरी उत्साह वाटेल. माझ्या प्रिय यमुनेला आणि तिच्या बहिणींना माझे प्रेमाशीर्वाद. चि. सौ. शांतेची प्रकृति सुधारते आहे हें वाचून आनंद झाला. आणि ते स्नेही, तूं आपल्या पत्रांत ज्यांचा उल्लेख केलास ते परमप्रिय दयार्द्र हृदयाचे डॉक्टर साहेब, त्यांना मला क्षमा करावयाला सांग. माझी त्यांची पुनः कधीं भेट व्हावयाचा प्रसंग आला तर त्यांचें आणि त्यांच्याच सारख्या एकनिष्ठ मित्रांचें मला किती महत्व वाटतें हें त्यांना कळेल. त्यांच्या करतां किंवा बाळू अण्णा इत्यादि माझ्या शालकांकरतां, तसेंच माझ्या विद्यालय-कालीन आवडीच्या जिवलगांकरितां अथवा माझ्या प्रिय आणि एकनिष्ठ सहतप्यां-करतां, त्या सर्वांना येथून माझी कृतज्ञ हृदयानें केलेली स्मृति पाठविण्यावांचून कांहींही करतां येत नाहीं ह्याविषयीं खेद वाटतो. बाल रंजन कसा काय आहे?

आहे बेट्याला माझी कांहीं आठवण ! पुनः प्लेगला प्रारंभ होणार असें कानावर येतें आहे. तेव्हां जपून अस आणि आपल्या प्रकृतीची काळजी घे ! तीच आमचें जीवन आहे.

तुझा प्रियतम
**तात्या**

---

# पत्र ११ वें.

॥ ॐ ॥

श्रीराम

कारागृहाची कोठडी–पोर्ट ब्लेअर
ता. २१-९-१९१९

**प्रियतम बाळ,**

तूं मुंबईला पोंचल्याबरोबर पत्र लिहिशील अशी माझी अटकळ होती. म्हणून त्याची वाट पाहण्यांत पत्र पाठवावयाला नेहमींपेक्षां उशीर झाला तुझ्याकडून अद्याप पत्र आलें नाहीं; तेव्हां आतां अधिक वाट पहावयाची नाहीं असें ठरवून हें पत्र लिहीत आहें तुझी भेट झाली तेव्हां माझी प्रकृति जशी तुझ्या दृष्टीला पडली अगदीं तशीच ती गेल्या वर्षभर आहे. तूं गेल्यापासून एखादा आठवडा ती बरी राहिली तर लागलीच पुनः बिघडते ! हींवताप यावयाला लागतो किंवा अंमाशाला प्रारंभ होतो; निदान एक अर्ध्या शेराचा तरी कर प्रत्येक वेळेला वसूल केला जातो आणि वजन आणखी घटत जातें. पुनः आठ पंधरा दिवस बरें वाटतें. वर्षभर हें असें चाललें आहे आणि त्यामुळें मागच्या वर्षी पत्र लिहिलें त्यावेळीं जे माझें वजन साधारणपणें ९९ रत्तल होतें तें गेल्या

दोन महिन्यांत अनुक्रमें ९६ रत्तल व ९५ रत्तल झालें आहे! वास्तविक माझी प्रकृति ह्यापेक्षासुद्धां खालवावयाची; पण इतकी स्थिती झाल्यानंतर अलीकडे माझी राहण्याची व खाण्याची जी थोडीशी चांगली व्यवस्था करण्यांत आली आहे त्यानें इतपत आहे. माझें वजन जरी भराभर कमी होतें आहे तरी आतां भूक लागूं लागली आहे; आणि गेल्या १० महिन्यांत जे रुग्णालयांतलें अन्न मिळतें त्यानें पचनाची कुरकुर बरीच कमी झाली आहे. त्यांत आतां नेहमींच्या हिंवा तापाच्या माऱ्यामुळें आणि आलेल्या अशक्ततेमुळें मला रुग्णालयांत असलेला बंदी समजण्यांत येत आहे; आणि त्यामुळें सक्त श्रमाचें काम बंद झालें आहे. ह्या बंदीगृहांतल्या व्यवस्थेच्या पुरतेंच बोलावयाचें तर मी आनंदानें सांगतों कीं मी मागच्या पत्रांत माझी प्रकृति अत्यंत त्वरेनें बिघडत चालली आहे असें तुला लिहिलें तेव्हांपासून पर्यवेक्षक जितकी लावतां येईल तितकी सोय लावावयाची खटपट करीत आहेत. पण त्यामुळेंच मला ह्या रोगट आणि हिंवतापाच्या साथीच्या वातावरणांतून शक्य तितक्या लवकर दुसऱ्या जागीं पाठवणें हें अधिक आवश्यक झालें आहे; आणि आवश्यक आहे हें अगदीं स्पष्टपणें सिद्ध झालें आहे. कारण येथें पर्यवेक्षकांनीं कितीही काळजी घेतली तरी माझें वजन अधिकाधिक कमी होत चाललें आहे आणि प्रकृति खालावत चालली आहे. आणि तापाची एकादी पाळी आल्याविना किंवा पोटांत कोणचा ना कोणचा बिघाड झाल्याविंना एक पंधरवडाही सुना जात नाहीं. ह्या बेटांतला वायुमान आरोग्याला अत्यंत हानिकारक समजलें गेलें आहे आणि त्यांतही कारागृहाच्या कोठडींत रहावें लागणें म्हणजे जन्मभर काबाड कष्ट करण्याची संवय असलेल्या धट्या कट्या माणसाच्याही प्रकृतीला दुप्पट अपायकारक होतें हें येथल्या वैद्यकीय अधिकाऱ्यानांही मान्य आहे.

इंग्लंडमध्यें युद्ध समाप्तीप्रीत्यर्थ झालेल्या उत्सवाच्या दिवशीं येथें बंद्यांच्या क्षमादानासंबंधांतलें सरकारी आज्ञापत्र वाचून दाखविण्यांत आलें त्याची तिकडे हिंदुस्थानांत तुम्हाला कांहीं वार्ता कळली किंवा नाहीं कोणाला ठाऊक. त्या दिवशीं दिलेल्या सूटीमुळें किंवा त्या दिवसाप्रीत्यर्थ, आतांपर्यंत ह्या बंद्यांच्या वसाहतींतून कांहीं साध्या बंद्यांची मुक्तता करण्यांत आली आहे. पण राजकीय बंद्यांच्या संबंधांत अजून पर्यंत अगदीं संदिग्ध अशीं वचनें देण्याव्यतिरिक्त कांहीं केलेलें

नाहीं. दोन बंगाली राजकीय बंदी वगळले तर त्यांच्यापैकीं इतर कोणालाही अजून एका दिवसाची देखील निश्चित अशी सूट देण्यांत आलेली नाहीं. सेक्रेटरी ऑफ स्टेट आणि हिंदुस्थान सरकार ह्यांच्या नांवानें जें आज्ञापत्र वाचून दाखविण्यांत आलें त्यांत राजकीय बंदींच्या संबंधांत सांगण्यांत आलें कीं त्यांना किती सूट द्यावी ह्या प्रश्नाविषयीं सरकारचा विचार चालू आहे. हा विचार त्या त्या प्रांतिक सरकारांनीं दिलेलें मत मुख्यतः आणि नंतर बंदीगृहांवरील अधिकाऱ्यांनीं बंद्यांच्या कारागृहांतील वर्तनावरून दिलेले प्रशंसालेख ह्यांच्या अनुरोधानें होणार. ह्या व्यतिरिक्त कोणचाही अंतिम निर्णय करण्यापूर्वी त्या त्या बंदीचीं स्वतःचीं मतें काळजीपूर्वक विचारांत घेतलीं जाणार आहेत! ह्या भाषेत पुष्कळ गर्भितार्थ असण्याचा संभव आहे; पण ज्यास्त शक्य म्हणजे तिला मुळींच अर्थ नसेल. हा निर्णय केव्हां व्हावयाचा ह्याविषयीं कालनिर्देश मुळींच नाहीं. ह्याच्या बरोबर ४ वर्षांच्या पूर्वींच हिंदुस्थान सरकारनें ह्या क्षमादानाच्या प्रश्नाविषयीं त्यांचा विचार चालला असल्याविषयीं मला जें आश्वासन दिलें होतें त्याची आठवण झालीं कीं त्याच वाक्यांचें हें पुनरुच्चारण म्हणजे ह्या प्रश्नासाठीं आणखी ४ वर्षांचें कालहरण होण्याची सूचना आहे अशी कोणालाही शंका आल्यावाचून राहणार नाहीं. तसेंच बंदीच्या स्वतःच्या मताचा विचार करण्यांसंबंधीं कल्पनाही ज्यांना राजकीय बंदी म्हणतात त्यांच्यापैकीं बहुतेक प्रत्येकाला जाचक होईल असें वाटतें. कारण बंद्याचें स्वतःचें मत ह्याचा अर्थ हिंदुस्थानांतील राजकीय परिस्थितीविषयीं त्या त्या विशिष्ट व्यक्तीचें मत एवढाच असेल तर तसें करणें स्वाभाविक आहे आणि योग्य आहे. पण सरकारला हें मत कसें कळणार? त्या त्या बंद्याच्या सांगण्यावरून हें ठरवावयाचें असेल तर त्याला कोणाचाही विरोध असणें शक्य नाहीं. पण जर तें इतरांकडून मिळवलेल्या गुप्त किंवा ऐकीव माहितीवरून ठरवावयाचें असेल–आणि असेंच होण्याचा फार संभव–तर सरकारनें लोकांना आम्हाला ह्या प्रश्नाचा विचार करावयाची इच्छाही नाहीं आणि अवश्यकताही नाहीं असें स्पष्ट सांगितलेलें चांगलें. कारण चोर, दस्यु आणि असेच इतर बंदीगृहांतले नेहमींचे वारस असलेल्या सन्मान्य लोकांच्या संगतींत आम्हाला राहावयाला, आणि तेंही एकटें रहावयाला, भाग पाडल्यावर आमच्या राजकीय मतांविषयीं हे आमचे सहचारी केवळ सत्यच सांगतील असा कितीसा संभव? एक तर राजकीय मतें म्हणजे काय असतें हें देखील ह्यांना

समजत नाहीं. आणि अधिकाऱ्यांनीं एकाद्या बंद्याचीं मतें, काय आहेत ह्याची माहिती मिळवून कळवण्याच्या कामावर त्यांची योजना केली म्हणजे एकदम त्याचा द्वेष करावयाची त्यांची प्रवृत्ति असते. ह्या बंदीगृहांतील 'सद्गृहस्थांना' एकदा अधिकाऱ्यानें 'अ'ची किंवा 'क'ची माहिती मिळवून कळवावयाला सांगितली कीं त्याच्या विरुद्ध माहिती कळवली म्हणजेच अधिकाऱ्यांच्या जवळ आपलें महत्व वाढेल असे त्यांना वाटतें. आणि बंदीगृहासारख्या संस्थेंत अगदीं वरच्या अधिकाऱ्यांनासुद्धा स्वतःच वाईट अपराधासाठीं शिक्षा पावलेल्या आणि केवळ चुगलखोरीनें आणि दुटप्पी वर्तनानें कारागृहांत बढती मिळवलेल्या ह्या लोकांवर अवलंबून राहण्यावांचून गत्यंतर नसतें. तेव्हां मला वाटतें लोकांनी हिंदुस्थान सरकारला योग्य वेळीं, आणि आतां सुद्धां, ह्या सर्व गोष्टी स्पष्टपणें सांगितल्या नाहींत तर भारत मंत्र्याच्या मनांत खरोखर सदिच्छा असली तरी सरकारनें दिलेल्या राजकीय बंद्यांच्या मुक्ततेच्या वचनापासून कांहीही निष्पन्न व्हावयाचें नाहीं.

सरकारनें दिलेल्या ह्या वचनासंबंधीं तुला कांहीं माहिती आहे काय ? तें प्रसिद्ध झालें आहे काय ? तसें असेल तर प्रांतिक सरकाराकडे हा प्रश्न जाऊन त्यावर त्यांचीं मतें गेलीं आहेत का ? हें सारें केव्हां व्हावयाचें ह्याची सरकार कडून नक्की वेळ, निदान स्पष्ट असा अजमास काढावयाचा कोणी प्रयत्न केला आहे काय ? माझें पुनः सांगणें आहे कीं, शांततोत्सवाची ही संधि निघून जाण्यापूर्वी आपल्या राजकीय बंद्यांची मुक्तता घडवून आणावयाचीच अशी देशांतल्या सर्व लोकांच्या हृदयांत निरपवाद उत्कट आणि निश्चित इच्छा आहे असे लोकांनीं स्पष्टपणें, आणि तेंही, मधून मधून, कोठें कोठें नाहीं तर संघटितपणानें, निदर्शनास आणून दिल्यावांचून ह्या दिशेनें विशेष कांहीं करावयाची हिंदुस्थान सरकारला इच्छा होणें शक्य नाहीं आणि इच्छा झाली तरी तसें घडवून आणणें शक्य नाहीं ! अत्यंत संदिग्ध असलें हें वचन देखील लोकांची नाडीची स्थिति अजमावण्यासाठीं आहे; आणि लोकांनीं जर आधींच ह्या बंदीमुक्ततेविषयीं आपलें आगत्य आणि आग्रह दाखविला नाहीं तर मला तरी सरकारनें हें वचन पाळलें नाहीं तर त्यासाठीं त्याला दोष द्यावयाला विशेष कारण वाटणार नाहीं !

१०९ व ३०२ निबंधा खालचा हत्येला प्रोत्साहन दिल्याचा माझ्यावरचा आरोप जर खरा धरावयाचा तर तो इतरांच्या संबंधांत अधिक खरा आहे. आणि तेवढ्यासाठीं राजकीय बंदी म्हणून माझी मुक्तता व्हावयाची नसेल तर मग हिंदुस्थानांत कोणीच राजकीय बंदी नाहीं असें म्हणावें लागेल मी केवळ पुढें मांडावयाच्या विचारसरणीचें दिग्दर्शन करतों आहे. मला येथून सांगतां येईल त्यापेक्षां तूं तेथून ही सर्व योजना पुष्कळ चांगली करशील हें मला माहिती आहे. दुसरी गोष्ट कारागृहांतील वर्तुणुकीविषयींची. गेल्या पांच वर्षांत एकदांही माझ्यावर कोणचाही ठपका आणतां आला नाहीं. ह्या गोष्टींत येथले अधिकारी माझ्या विरुद्ध विशेष कांहीं सांगूं शकत नाहींत असें मला तरी वाटतें. तिसरी गोष्ट–माझ्या वैयक्तिक मतासंबंधाची. तीं मी स्पष्ट आणि निश्चित अशी सर्वांच्या समोर–सरकारच्यासुद्धा नेहमीं मांडलीं आहेत. सन १९१५ मध्येंच आणि त्यानंतर पुनः १९१६ मध्यें ह्या प्रश्नावरील माझ्या विचारांचे असंदिग्ध आवेदन-पत्र, त्याविषयीं चुकीचा समज झाल्यास माझ्या मुक्ततेचा संभवही नाहींसा होईल हें मला पुरें माहिती असतांही, मी होऊन पाठविलें होतें. माझ्या गेल्या वर्षांच्या पत्रांत जे विचार मी लिहिले होते आणि आतां जे लोकांसमोर येऊन गेले आहेत, अगदीं तसे विचार सरकारकडे पाठविलेल्या त्या आवेदनपत्रांत होते. तेव्हां आतां सरकारला किंवा लोकांना दोघांनाहीं माझे विचार अपरिचित नाहींत. सुधारणा लवकर चालूं केल्या गेल्या आणि निदान वरिष्ठ विधिमंडळ तरी लोकांच्या मताप्रमाणें चालण्याची व्यवस्था झाली तर सुधारणा मिळाल्याबरोबर घटनाशीर प्रगतीच्या प्रयोगाचा हा प्रारंभ यशस्वी करण्यांत आणि कोणच्याही समाज-व्यवस्थेचा व विशेषतः हिंदु धर्मशास्त्राचा पाया आणि आधार असलेले विधिनिर्बंध आणि सुव्यवस्था ह्यांचें समर्थन करण्यांत मला माझ्या अत्यल्प शक्तीप्रमाणें यत्किंचितही अनमान वाटणार नाहीं. स्कॉटलंडच्या लोकांनीं किंवा बहुतेक बोर लोकांनीं सुद्धा, त्यांच्या त्यांच्या विशिष्ट प्रगतीला प्रतिबंधक होण्याच्या स्थलीं जेव्हां साम्राज्य सरकारनें पोषक अशी संघटना दिली तेव्हां, साम्राज्यांतील भागीदारीच पत्करण्याचें मान्य नाहीं का केलें ? हिंदुस्थाननेंसुद्धां, आणि तसें म्हटलें तर कोणच्याही देशानें, ज्यांतील प्रत्येक घटकाला सारखे अधिकार आहेत अशा सामायिक स्वामित्वाच्या संयुक्त राज्याला किंवा साम्राज्याला येऊन मिळालें पाहिजे; आणि ते स्वाभाविकपणें मिळतीलही. ते त्याच्या विरुद्ध कशाला जातील !

जव्हां विभक्त आणि एकलकोंडे असें एकटेंच राहण्यापेक्षां अशा एकत्र राहण्यांत अधिक लाभ असेल तेव्हां त्याच्या विरुद्ध कोणी कशाकरतां असेल ? मनुष्याप्रमाणेंच राष्ट्रही समाजपर आहे. आणि ज्याप्रमाणें राष्ट्रें आणि कुटुंबें हीं मनुष्याच्या ह्या समाज करून रहावयाच्या उपजत प्रवृत्तीचा स्वाभाविक विकास आहेत त्याप्रमाणेंच साम्राज्यें ही पूर्वी होतीं आणि पुढेंही होतील.

प्रिय बाळ, गेल्या दोन दिवसांपासून थंडी पडशाचा मला ताप येतों आहे; त्यामुळें माझ्या मनांतून तुला लिहावयाचें होतें त्यापैकीं बरेंच सोडून द्यावें लागतें आहे. मुख्य गोष्ट म्हणजे **तुझ्या प्रकृतीची काळजी घेणें.** आमच्यासाठीं किंवा दुसऱ्या कशासाठीं मनाला त्रास करून घेऊं नकोस. कांहीं झालें तरी मनावर परिणाम होणार नाहीं अशी संवय कर. आपल्या भेटींत घरच्या व्यवस्थेविषयीं ज्या गोष्टी मी सांगितल्या त्या विसरूं नकोस. व्यय कमी करावा याचा आणि कांहीं तरी मागें टाकावयाचा प्रयत्न करीत जा. प्रि. यमुनेनें मला बदाम, पिस्ते, खडीसाखर, फराळाचें, इत्यादि वस्तूंची फार मोठी बंगी गेल्याबरोबर पाठवून देत्यें म्हणून सांगितलें होतें. पण ती फार फार मोठी झाल्यामुळें तिची नीट बांधून बंगी करावयालाच महिनेच्या महिने लागत आहेत ! ती येथें आली आणि तिचें धैर्य आणि गोडपणा पूर्वीसारखाच आढळ आहे हें पाहून फार आनंद वाटला. पण आपली वहिनी !–सुटल्यावर जेथें माझी वहिनी प्रेमानें माझें स्वागत करावयाला येणें शक्य नाहीं अशा घरांत जावें लागेल ही कल्पना आली कीं सुटकेंतील अर्धा आनंद निघून जातो आणि उदासीनता वाटते. माझी मैत्रीण, माझी बहीण, माझी माता, माझी सखी-प्रेमाचीं सर्व नातीं एकट्या तिच्यांत एकदम सांठवलेली होती तिनें खरोखरच एकाद्या सतीप्रमाणें मरण स्वीकारलें. तिनें आपला आत्मा हूं कीं चूं न करतां आणि तोही मातृभूमीच्या स्थंडिलावर हवन नाहीं का केला ? हाय ! ज्याप्रमाणें हुतात्मे आपल्या देशाकरतां किंवा धर्माकरतां मरतात त्याचप्रमाणें ह्या आजकालच्या हिंदु युवति मरतात. उसासे टाकीत, झिजत झिजत, ज्यांची पुनः भेट होणें दैवीं लिहिलें नाहीं अशा आपल्या प्रियकरांची परत येण्याची प्रतीक्षा करीत, कोणाला कळलें नाहीं तरी अखंड सेवा आचरित, कोणी त्यांकडे लक्ष्य दिलें नाहीं तरी एकसारखे दान करित–ह्या हिंदु तरुणी आपल्या देश करतां आणि धर्माकरतां झुरतात आणि मरतात ! स्त्री

मग ती कोठली असो ती स्वभावतःच नितांत मधुर आहे. पण हिंदु रमणी–कल्याणी साध्वी, सती आहे. ती चेतवीत नाहीं तर शांत करते; स्वतः विस्मृत असली तरी इतरांची काळजी वाहते. प्रत्येक हिंदु स्त्री म्हणजे भगवती सीतेच्या अमर चरित्राची नवीन निघालेली आवृत्ति असते. ती. मथुताईंच त्यांच्या वतीनें तुला सांत्वन करावयाला सांगावयाला ती. बाबांनीं मला सांगितलें आहे. आपल्या ती. वहिनींच्यापेक्षां देखील त्यांना त्यांच्याविषयीं फार वाटतें. येथें तुझी भेट झाली त्यावेळेला तुझी निरोगी आणि नवजीवनानें उचंबळलेली मुर्ति पाहून मला जितका आनंद झाला तितका कश्यानेंही झाला नाहीं. ज्या परिस्थितींत हें पत्र लिहावें लागतें आहे त्या परिस्थितीमुळें आणि वृत्तींच्या उत्कटतेमुळेंही ज्यांनीं आत्मीय किंवा राष्ट्रीय नात्यानें माझ्याविषयीं आणि आमच्याविषयीं इतकी गाढ सहानुभूति दाखविली आणि आमचे कष्ट कांहींना कांहीं कमी करण्यासाठीं श्रम घेतलें त्यांना माझ्या आणि आमच्या मनांतील कृतज्ञता आणि आभार मनाप्रमाणें व्यक्त करणें अगदीं अशक्य आहे. तुला खरें सांगावयाचें म्हणजे माझ्या भरत वर्षांत असे पुष्कळ लोक आहेत कीं जे माझ्या दुःखांत भागीदार व्हावयाला आणि माझे कष्ट हलके करावयाला सिद्ध आहेत,–माझी विचारपूस करणारे स्नेही आहेत, मजविषयीं चर्चा करणारीं वर्तमानपत्रें आहेत–ज्यांना वैयक्तिक स्नेहामुळें किंवा परिचयामुळें आपल्याविषयीं सहानुभूती वाटते आणि ह्यापेक्षांही विशेष म्हणजे ज्यांना खऱ्या आणि शुद्ध विश्वकुटुंबाच्या भावनेमुळें आपल्याविषयीं समवेदना होतात असे पुष्कळ लोक आहेत ही जाणीव हेच एक औषध मिळाल्यामुळें कारागृहवास, हिंवताप, आमांश इत्यादि गोष्टींना न जुमानतां गेल्या वर्षभर मला जगणें शक्य झालें, आणि माझी प्रकृति पूर्वीपेक्षां खालावली नाहीं असा माझा पूर्ण विश्वास आहे. चि सौ. प्रिय शांताबाईची प्रकृति कशी काय आहे ? लिहिण्या वाचण्यासाठीं तिला विशेष त्रास देऊं नकोस. पण माझ्या प्रिय यमुनेला त्या बाबतींत जितका त्रास देतां येईल तितका दे. -मी परत आलों तर आणि तेव्हां, माझ्या साध्या लेखकाचें आणि मुद्रालेखकाचें काम करावयाचें तिनें मान्य केलें आहे-अर्थातच अगदीं कांहीं वेतन न घेतां केवळ देशाभिमानाच्य भावनेनें मान्य केलें आहे ! चि. बाबू, अण्णा आणि माझ्या इतर शालकांना माझे आशीर्वाद सांग.

तुझा प्रिय भाऊ

तात्या.

# पत्र १२ वें

॥ ॐ ॥

श्रीराम

तुरुंगांची कोठडी पोर्टब्लेअर

ता. ६-७-१९२०

**प्रियतम बाळ,**

तुझें ता. २।६।१९२० चें ती. बाबांना लिहिलेलें पत्र पोंचलें. तुझ्या येथें येण्याची एकसारखी पुढें चालढकल चालली होती, त्यामुळें आम्हाला मोठी काळजी लागली होती. तुझ्या पत्रानें ती दूर होऊन मन शांत झालें. माझी प्रकृति तूं येथून गेलास त्यावेळीं जशी होती तशीच आहे. त्याहून वाईटही झालेली नाहीं. मात्र तूं गेल्यापासून ती. बाबांची प्रकृति एकसारखी खालावत चालली आहे. आतां त्यांची पाळी आलेली दिसते. दुखणें तेंच आहे. पहिल्यानें अपचनाचा विकार आणि मग त्यापासून होणारा यकृताचा बिघाड. त्यांचे वजन १०६ रतल आहे! मी होऊन इतकें लिहितों आहे तेव्हां आमची प्रकृति प्रत्यक्ष ह्यापेक्षां विशेषच वाईट असेल असें समजूं नकोस. तसें मुळींच नाहीं. अगदीं जशी स्थिती आहे तसें मी वर्णन केलें आहे. कांहीं उणें अधिक झालेंच तर मी तुला लागलींच कळवीन.

बंदीमुक्ततेचें एकदांचें उदक सुटलें. शेंकडो बंदी कारागृहांतून मुक्त होत आहेत. मुख्यत: ज्यांनीं राजकीय बंद्यांच्या मुक्ततेसाठीं असंख्य स्वाक्षरींच्या अर्जाची योजना केली, त्याला पाठिंबा दिला त्याच्यावर स्वाक्षर केलें त्या आपल्या पुढाऱ्यांच्या आणि देशबांधवांच्या, त्यांतही मुख्यत: बॉम्बे नॅशनल यूनिअनच्या अनवरत परिश्रमाचें हें फळ आहे. इतक्या थोड्या अवकाशांत चांगल्या पाउण लाख लोकांच्या नांवानें पाठवलेल्या प्रचंड अर्जाचा सरकारच्या मनावर विलक्षण परिणाम झाला असलाच पाहिजे. मग ते तो कितीही नाकारीनात. निदान त्या अर्जानें राजकीय बंद्यांची आणि त्यामुळें ज्या

कार्यासाठीं ते लढले व हारलें त्या कार्याची नैतिक प्रतिष्ठा वाढवली यांत शंका नाहीं. आतां खरोखर आमची सुटका व्हावयाचीच असेल तर तिच्यांत कांहीं तरी अर्थ वाटेल. कारण आम्ही त्यांच्यांत परत यावें अशी इच्छा आमच्या देशबांधवांनीं प्रदर्शित केली आहे. त्यांनीं आमच्यासाठीं जी काळजी आणि सहानुभूति दाखविली त्यांसाठीं त्यांचे कितीही आभार मानले तरी थोडे आहेत. त्यांच्या जितक्या आत्मीयतेला आम्ही पात्र आहों असें आम्हाला प्रामाणिकपणानें वाटतें त्यापेक्षां त्यांनीं आमच्याविषयीं अधिक आत्मीयता आणि आदर दाखविला आहे. आणि त्यांचें प्रयत्न अगदींच व्यर्थ गेले नाहींत. कारण जरी आम्ही दोघे ह्या क्षमादानाच्या कक्षेच्या बाहेर पडतो असें सांगण्यांत आलें आहे आणि त्यामुळें आम्हाला ह्या कोठडींत खितपत पडावें लागतें आहे, तरी आपल्या बरोबर कष्ट सोशीत असलेल्या आणि राजकरणांत आपल्याशीं साथ केलेल्या शेकडो देशभक्तांच्या मुक्तताच्या दिसणाऱ्या देखाव्यानें आमचे कष्ट हलके झालेले आम्हाला वाटतात; आणि त्यामुळें गेली आठ वर्षें इथें आणि इतरत्र संप, पत्रें, अर्ज, ह्यांच्या द्वारें वर्तमान पत्रांतून किंवा व्यासपीठावरुन जी चळवळ आम्ही केलीं तिचें आम्हाला फळ मिळाल्याचें समाधान वाटतें.

ता. २-४-१९२० ला मी राज्यकर्त्यांनीं नुकत्याच दिलेल्या ह्या क्षमादानाच्या प्रश्नासंबंधीं नवीन अर्ज सरकारकडे पाठविला आहे. त्या अर्जांत सरकारनें हे जे शेकडो राजकीय बंदी सोडले आणि अशा रीतीनें माझा १९१८ चा अर्ज अंशतः मान्य केला त्यासाठीं पहिल्यानें आभार मानले आहेत आणि मग अजूनही तुरुंगांत असलेल्या व त्यांच्या व्यातिरिक्त राजकीय कारणासाठीं परदेशांत अडकून पडलेल्या अशा सर्वांना लाभ मिळेल अशा रीतीनें ह्या क्षमादानाची मर्यादा वाढवली पाहिजे अशी विनंति केली आहे. तसेंच हिंदुस्थानांतील एकंदर राजकीय परिस्थितीसंबंधीं आणि त्यांतही विशेषतः अधिकारी वर्गांत ज्या प्रश्नांविषयी वेळोवेळीं आणि अजूनही चर्चा आणि वाद होतों आणि जे अगदीं अलीकडे त्यांच्यापैकीं कांहींनीं स्वतः माझ्यापुढें मांडले आहेत अशा प्रश्नांच्या संबंधांत व्यक्तिशः माझें धोरण काय आहे हेंही मी पुनः एकदा विशद केलें आहे.

ज्यांत सर्व मनुष्यजातीचा समावेश होईल आणि जेथील एकूण एक स्त्रियांनां आणि पुरुषांना, ही पृथ्वी, हा सूर्य, ही भूमी आणि हा प्रकाश–हींच मनुष्याची खरी पितृभूमी आणि मातृभूमी आहेत–ह्यांच्यापासून मिळणाऱ्या फलासाठीं प्रयत्न करण्याचा आणि उपभोग घेण्याचा नागरिकत्वाचा अधिकार राहील असें संपूर्ण जगाचें एकराष्ट्र हें आमचें ध्येय आहे आणि त्यावर आमचा विश्वास आहे. इतर सारे विभाग आणि भेद अवश्य असले तरी कृत्रिम आहेत. ज्याप्रमाणें पेशींचे रूपांतर व्यक्तिपिंडांत होतें, व्यक्ति कुटुंबांत आणि संघांत विलीन होतात, संघाचीं राष्ट्रें बनतात, त्याचप्रमाणें सर्व राष्ट्रें ज्याच्यांत एकरूप होऊन जातील असें विश्वराष्ट्र प्रस्थापित करणें हेंच सर्व राजकीय शास्त्र आणि कला ह्यांचें ध्येय आहे किंवा असावयाला पाहिजे हें तत्व आम्हाला मान्य आहे. तेव्हां साहजिकच विश्वकुटुंबत्व ही देशाभिमानाची वरची पायरी ठरते. आणि म्हणून एकाद्या साम्राज्याला किंवा समान भागीदारांच्या संयुक्त राष्ट्रसंघाला परस्पर विरुद्ध वंशसमूहांना आणि राष्ट्रसमूहांना एकत्र आणून एकजीव नाहीं तरी ज्यामुळें त्यापैकीं प्रत्येकाला आपआपल्या जीवनाची त्याच्या सर्व उदात्त स्वरूपांत ओळख पटून तें संपन्न बनवून उपभोग घेण्याची अधिक पात्रता येईल अशा रीतीनें समरूप बनवतां आलें तर हें एक ध्येय गाठण्याच्या मार्गावरील एक स्पष्ट पदक्रमण आहे. ह्या विचारसरणीवर माझा विश्वास असल्यामुळें जो ब्रिटिशही होणार नाहीं व जो हिंदी ही असणार नाहीं, तर अधिक चांगलें नांव सांपडेपर्यंत ज्याला आर्य म्हणता येईल असा एकादा संयुक्त राष्ट्रसंघ स्थापावयाचा प्रामाणिक प्रयत्न करण्यांत आला तर त्यांत मला सदसद्विवेक बुद्धीला स्मरून सहकार्य करतां येईल. हेंच ध्येय डोळ्यापुढें ठेवून मी गत कालांत झगडलों आहें. हेंच ध्येय दृष्टी समोर ठेऊन मी आतां ही कार्य करावयाला सिद्ध आहे. आणि म्हणून सरकारनें आपला दृष्टिकोन पालटला आहे आणि भरतवर्षाला स्वातंत्र्य, सामर्थ्य आणि पूर्ण चैतन्य ह्यांच्या मार्गानें सशस्त्र प्रतिकार न करतां पुढें जाणें शक्य करण्याची त्याची इच्छा आहे असे ऐकून मला आनंद वाटला. माझा विश्वास आहे कीं खरोखर अशी परिस्थिति असल्यास माझ्या प्रमाणेंच इतरही पुष्कळ क्रांतिकारक आपलें पाऊल जेथल्या तेथें थांबवतील आणि ह्या मिळालेल्या सुधारणानंतरच्या विधि-मंडळाच्या मोडक्या तोडक्या वाटेवरच्या धर्मशाळेंत मानप्रद अशा संधीसाठीं

इंग्लंडशीं हात मिळवावयास सिद्ध होतील व पुनः प्रगतीच्या रस्त्यावर पुढें पाऊल टाकावयाची आज्ञा उच्चारली जाईपर्यंत तेथें कामही करतील.

मानव्य (विश्वकुटुंबिता) ही देशाभिमानाची वरची कोटी आहे हें तत्व आम्हाला संमत असल्यामुळेंच एकच अवयव इतरांच्या जिवावर इतका पुष्ट होऊं लागला आणि एखाद्या असाध्य काळपुळी प्रमाणें फुगून सर्व मनुष्य जातीचें जीवन धोक्यांत आल्यासारखें वाटूं लागलें त्यावेळीं आम्हाला स्वस्थ वाटेनासें झालें. दुसरा परिणामकर असा कोणचाही उपाय दिसत नसल्यामुळें शल्यचिकित्सकाची सुरी आपल्या हातांत धरावी लागली आणि निरंतरचें दयामयत्व साधण्यासाठीं क्षण भराचा निष्ठुरपणा पतकरणें अवश्य आहे असें वाटूं लागलें. पण ह्या प्रमाणें दंडाची प्रतिक्रिया दंडानेंच करावयाला आम्ही सिद्ध झालों तरी तेव्हांही आम्हाला मनापासून कोणच्याही स्वरूपांतल्या अत्याचारांचा तिटकारा असे. आतांही आहे. कारण परस्वापहरणासाठीं योजलेलें सामर्थ्य—म्हणजेच अत्याचार. व्यक्तिशः किंवा राष्ट्र ह्या नात्यानें दुसऱ्याचा अपहार करण्याची महत्वाकांक्षा स्वप्नांत देखील मला शिवली नाहीं आणि अत्याचाराच्या कल्पनेपासून देखील मी इतका दूर असें कीं जेव्हां समर्थ संघांनीं आपल्या दुबळ्या पण सत्पक्षाच्या शेजाऱ्या विरुद्ध त्याचा उपयोग केलेला मला जेथें जेथें आणि जेव्हां जेव्हां दिसला तेथें जेथें आणि तेव्हां तेव्हां प्राणपणानें विरोध केला. होय. गत कालांत महत्वाकांक्षी व्यक्तींनीं—हिंदुस्थानच्या बाहेरच नाहीं तर भारतवर्षांत सुद्धां अवलंबिलेल्या सर्वच अत्याचाराचा मी मनापासून तिटकारा करतों. ह्या भरत भूमीवर परक्यानीं अधिकार गाजवावा ह्या गोष्टीच्या विरुद्ध माझें मन जितकें बंड करून उठे तितकेंच तें येथल्या जातिभेद आणि अस्पृश्यता ह्या गोष्टीविरुद्ध उठे.

तेव्हां आम्ही जे क्रांतिकारक झालों ते निरुपाय म्हणुन झालों, उल्हासानें नाहीं. हिंदुस्थानच्या आत्यंतिक हिताच्या दृष्टीनें आणि इंग्लंडच्याही हिताच्या दृष्टीनें त्यांनीं परस्परांच्या सहाय्यानें आणि सहकार्यानें आपलीं ध्येयें शांततेनें आणि क्रमशः प्रगति होऊन गांठणें अवश्य आहे असें आम्हाला तेव्हांही वाटे. आणि अजूनही जर तें अवश्य असेल तर शांततेच्या उपायाचा अवलंब करण्यासाठीं आलेली पहिली संधि मी साधीन आणि प्रत्यक्ष क्रांतीनें किंवा अन्य

मार्गानें पडलेल्या घटनाशीर प्रगतीच्या भगदाडांत-मग तें कितीही विरुंद असो-घुसेन, आणि उत्क्रांतीच्या सेनेला त्यांतून एकसारखें, अडथळा न होतां, जातां येईल अशा रीतीनें ते भगदाड रुंद करण्याचा प्रयत्न करीन.

सरकारनें जर राज्यघटनेंत मनःपूर्वक सुधारणा केल्या आणि त्याच उपयोगांत आणल्या आणि त्या सुधारणामुळें ही असली घटनेची खिंड निर्माण झाली तर मग राज्यक्रांती तेथेंच संपेल आणि तिच्या जागी उत्क्रांती हा आम्हाला सर्वांना एकत्र आणणारा गर्जनेचा आणि खुणेचा शब्द होऊन बसेल. आणि मातृभूमीच्या सेनेंतील एक क्षुद्र सैनिक म्हणून मी त्या सुधारणा यशस्वी करण्यासाठीं मनःपूर्वक झटेन म्हणजे भारत वर्षाला पुनः वैभवशाली आणि थोर बनवावयाचें व इतर राष्ट्रांच्या हातांत हात घालून किंवा त्यांना मार्ग दाखवून मनुष्य जातीच्या भवितव्याकडे त्यांना घेऊन जावयाचें आपल्या पिढीचें महत्कार्य साधण्याच्या मार्गांतील एक पाऊल टाकावयाची जागा व्हाव्या अशा तऱ्हेनें त्यांचा उपयोग करून घेईन.

राज्यक्रांतीकारकांच्या गोटांत ज्यावेळीं मी काम करीत होतों त्या वेळीं माझे विचार असे होते. आणि आज एकांत कोठडीच्या चार भिंतीच्या आंत कोंडले गेल्यावर काढलेल्या ह्या दीर्घ १२ वर्षा नंतरही माझे विचार तसेच आहेत. तरवारीनें जे निर्बंध घोषिले गेले आणि प्रजापीडनाचें विकट स्वरूप झांकून टाकण्याचें अवगुंठन म्हणून ज्या राज्यघटना उपयोजिल्या गेल्या त्यांना निष्ठावंत राहणें आणि त्यांच्याविषयीं भक्ति बाळगणें आम्हाला अशक्य झालें हें खरें आहे. पण तितकेंच हेंही खरें आहे कीं तेव्हांही धर्म नियमांचे पालन करणें, राज्य घटनेचा पुरस्कार करणें, हें आमचें कर्तव्य आहे असेंच आम्हाला मनापासून वाटे आणि अजूनही वाटतें. पण ते नियम म्हणजे स्वतंत्र जनतेच्या न्यायान्यायाच्या कल्पनेच्या सत्यस्वरूपाचें निदर्शक पाहिजेत आणि ती घटना म्हणजे जींत मनुष्य जातीच्या कल्याणासाठीं आणि दैवी वैभवाच्या प्राप्तीसाठीं स्वतंत्र स्त्री पुरुषांनीं केलेले प्रयत्न जींत एकत्र आलें आहेत, एकतान बनले आहेत आणि एकजीव झाले आहेत अशी पाहिजे.

हिंदुस्थानांतील वरिष्ठ कार्यकारी मंत्रिमंडळाच्या सभासदासारख्या प्रतिष्ठित अधिकाऱ्यांनीं मला आणि इतरांना पुढील प्रश्न पुष्कळदा टाकला होता. "तुम्ही पूर्वीच्या हिंदी राज्यांच्या विरुद्ध बंड उभारलें असतें तर तुमची स्थिती काय असती? ते बंडखोरांना हत्तीच्या पायाखालीं तुडवीत!" त्याला माझ्याकडून उत्तरही मिळालें होतें. हिंदुस्थानांतच काय, जगाच्या कोणच्याही देशांत-प्रत्यक्ष इंग्लंडमध्यें सुद्धा-बंडखोरांना कधीं कधीं असली भयंकर शिक्षा भोगण्याचें दैवी येई. पण मग इंग्रज लोकांनीं युद्धाच्या वेळीं जर्मन लोक आमच्या बंद्यांना वाईट रीतीनें वागवतात आणि त्यांना लोणी व रोटी देत नाहींत अशा कोल्हे कुईनें जगाच्या कानठळ्या कां बसवाव्या? जर्मनांनींही त्यावेळीं त्यांना "ताजी रोटी आणि लोणी! एक काळ असा होता कीं ज्यावेळीं कारागृहांतील बंद्यांची जिवंतपणीं कातडी सोलीत आणि त्यांना मोलॉक, ठॉर किंवा असल्याच यूरोपांतील युद्ध देवतांना बळी देत असत" अशी आठवण दिली असती म्हणजे! खरी गोष्ट अशी आहे कीं ही जी जगाच्या संस्कृतींत मनुष्यप्राण्यानें सुधारणा घडवली आहे ती सर्व राष्ट्रांतील मनुष्यांच्या प्रयत्नांचें संकलित फळ आहे आणि म्हणून तिच्यावर सर्व मनुष्य जातीचा वारसा आहे व तिचा लाभ सर्वांना मिळाला पाहिजे. त्या रानटी युगाच्या तुलनेनेंच म्हणावयाचे तर माझी चौकशीही पुष्कळ चांगली झाली व शिक्षाही अधिक न्याय्य झाली हें खरें आहे; आणि मनुष्यभक्षक जाती आपल्या बंद्यांना जी शिक्षा देत किंवा चौकशीचा जो खेळ करीत त्यापेक्षां अधिक चांगली पद्धति ह्या सरकारची आहे ह्या प्रशस्तिपत्रानें सरकारचें समाधान होत असेल तर त्याला माझी ना नाहीं. पण त्याबरोबर हेंही विसरतां कामा नये कीं पूर्वीच्या काळांत राजे बंडखोरांना जसे जिवंत सोलीत त्याचप्रमाणें बंडखोरही त्यांची भाग्यतारा जोरांत आल्यावर या राज्यकर्त्यांना जिवंत जाळीत! आणि इंग्रजी जनतेनें मला किंवा इतर बंडखोरांना अधिक न्यायानें म्हणजे कमी रानटीपणानें वागवले असेल तर त्यांनींही आश्वस्त असले कीं स्थितीची उलटापालट होऊन हिंदी क्रांतिकारकांना तशी पाळी आली तर त्यांनाही असेंच अत्यंत दयेच्या रीतीनें वागवण्यांत येईल!

ह्या अर्जापासून आमच्या सुटकेच्या संबंधांत विशेष कांहीं होईल अशी आशा करूं नकोस. आम्ही आमची आशा कधींच बळावूं दिली नाहीं आणि

त्यामुळें सुटका न झाल्यास आम्हाला त्याविषयीं विशेष निराशाही वाटणार नाहीं. कांहींही निश्चय झाला तरी तो स्वीकारावयाला आम्ही सिद्ध आहों. तूं आपल्या कडून शक्य तितका प्रयत्न केला आहेस आणि मुख्यतः तुझ्या संतत उद्योगाचेंच हें फळ आहे कीं राजकीय बंदींच्या मुक्ततेच्या प्रश्नाला इतके तीव्रस्वरूप आलें आणि आम्ही दोघे सोडून दिले तरी उर्वरित शेंकडो राजकीय बंद्यांना आपलें स्वातंत्र्य परत मिळालें.

तुझी प्रकृती उत्तम असेल अशी आशा करून आणि आपल्या स्नेह्यांना आणि नातलगांना नमस्कार सांगून हें पत्र पुरें करतों.

प्रियबाळ, तुझाच

**प्रिय तात्या.**

———— ————

( १९१९-२१ पर्यंत अंदमानामध्यें तुरुंगांत एकसारखी प्रकृति बिघडत जात अंतीं क्षयावर जाते कीं काय अशी डाक्टरांनां देखील भीति पडली असतांनां व केवळ थोड्याश्या दुधावर राहून अंथरुणास वर्षावर खिळून पडले असतांनां मरण बरें असें वाटूं लागलें-त्यावेळेस ही कविता लिहिली गेली. )

# मरणोन्मुख शय्येवर *

ये मृत्यो ये ! तूं ये ! यावयाप्रती<br>
निघालाचि असशिल जरि ये तरी सुखें !<br>
कोमेजुनि जावया भिवोंत हीं फुलें;<br>
हीं द्राक्षें रसरशीत सुकुनि जावया;<br>
भ्यावें तें कां म्हणुनी तुजासि परी मी ?<br>
माझ्या पेल्यांत किती पीत राहिलों<br>
तरि न संपतीच अशा असति आजि या<br>
अश्रुंच्या मदिराची मात्र राहिल्या !<br>
ये ! नैवेद्या त्या जरि असासि भुकेला !<br>
आणि जरी दिवस असे अजुनि तरुण हा<br>
तरि लहान थोर अशीं असतिं संपलीं<br>
दिवसांचीं कार्यैंही बहुत करुनिया.<br>
तोडजोड करुनि परी फेडलीं ऋणें

---

* हें वृत्त महाराष्ट्र वाचकांस अद्याप अपरिचित असल्यामुळें इतकें सुचविणें आवश्यक आहे कीं, यास दिंडी, श्लोक वा आर्या अशी कोणतीच चाल न लावतां केवळ ऱ्हस्व, दीर्घ व विरामचिन्हें यांच्या अनुरोधानें साहजिकपणें वाचित जावें. जर मुळांत काहीं श्रुतिमंजुलता असेल तर ती आपोआपच प्रकट होईल. विराम चिन्हांशींच विराम घ्यावा व अर्थानुरोधानें वाचावें इतकें सांगणें पुरें आहे.

जन्मार्जित जीं जीं तीं: ऋषिऋणाप्रती-
श्रुतिजननीचरणतीर्थं सेवुनी कधीं,
धरुनि कधीं ध्रुवपदांसि संततींच्या
आणी हीं आचरुनी एक तप अशी
आशेच्या या स्मशानभूत तपस्या :
देवऋणा फुंकुनि रणशृंग, दुंदुभी
धडड धडड पिट्टुनि, आणि तो अघाडिचा
चढवुनि तैं हल्ला सहसाचि ज्या पळीं
सुटली रघुवीराची प्रथम रणाज्ञा :
आणि त्याचि रणयज्ञाग्नींत पेटल्या
अस्थि अस्थि, मांस मांस, इंधनें तशीं
जळत जळत आज असे शेष राहिली
राख यौवनाची मम ! आणि म्हणुनिची
पितृ-ऋणा फेडाया आजि अहो मी
शास्त्रातें अनुसरोनि, दत्तविधानें,
निपुत्रिकत्व वारियलें : पुत्र अखिल हें
अभिनवभारतची मम ! जेथ जेथ कीं
पाळण्यांत विलसतसे नयन कमल तें
तेथ तेथ मीच बघें सृष्टिकुतुहला.
ज्या ज्या स्मितमधुरमुखीं मधुर विलसतें
कैशोरी कोमलता, प्रेमपूर्ण कीं
तें तें मुख बघतांची हृदयिं माझिया
वत्सलता ये उचंबळोनि, आणखी
नवउन्नति शील भालपटलिं दिसत जें
उदयोन्मुख तेज तरुण, तैं पुनः पुन्हां
माझ्याही उदयोन्मुख होति हृदीं या
आशा नव, आकांक्षा उच्च, भावि त्या
आमुचिया वंशाच्या गौरवाचिया :-

भारतीय केवल ना, मानवीय कीं
वंशाच्या गौरवार्थ ! तरुण कोंवळीं
सर्व मुलें माझीचीं ! अखिल मानवी
यौवनात अनुभवीन यौवनास मी.
आणि पितर माझे ते प्रेमतर्पणा :
येइं सुखें मृत्यो तरि-असतिं हीं अशीं,
तोड जोड करुनि पा। फेडलीं ऋणें.

आणि बहुत करूनिया असतिं संपलीं
दिवसाचीं कार्यें हीं : यद्यपी कधीं
उगवे हा दिवस, कधीं मावळेहि वा;
कर्में वा कवण, कशीं कार्य, या दिनीं,
याविषयीं पंचांगें भिन्न, भिन्नची
भट्ट आणि पंडित हे कथिति मज कथा;
तरिहि लोकसंग्रहार्थ, धारणाप्रति
मानवीय आत्यंतिक आत्महिताच्या,
सज्जनासि गमलीं अनुकूल तींच कीं,
कार्यें त्यां धर्म अशीं मानिलीं; अणी
तदनुरूप एकाचा म्हणुनि जो ठरे
त्यां माझा भार असे उचलिला मुदें,
यथाशक्ति, यथापरिस्थिति, न भंगितां
धरिलें तें व्रत कदापि किमपि ना भयें.

सत्कुल; अव्यंगदेह; परम दयालू
जनक आणि जननी तीं; त्याहुनीहि कीं
वात्सल्यें, पुण्यें, प्रतिपाळिता तसा
अग्रज, जो अग्रगण्य तापसांमधें;
मूर्त विनय अनुज असा; अद्वितीयसें
प्रियांचें प्रेमपुण्य; धन्य आणि तें
ध्येय महत्, देई जें जीवनाप्रती

सार्थकत्व मनुजांच्या, काव्यमय करी
जें आयुःकालातें, पूत चरित्रा;
तप कांहीं; जप कांहीं; यश कांहीं तें;
कांहींशी मान्यताहि शारदेचिया
राजसभेमाजी कविरत्नभूषिता :
चाखियले रस नाना; हुंगियले ते
शतभूजलवायुललित शतसुगंध कीं;
पंचाग्नीमधिल तया प्रखर भाजल्या
उत्तापापासुनि तों प्रीतिच्या मऊ
स्निग्ध परिष्वंगापर्यंत सर्वही
शीतल, शीतोष्ण, उष्ण, अनुभवीयले
कटिबंध, स्पर्श तसे, परिसिलें किती
स्वरशत, शतभाषा, शतगीति नवनवा
शतमंजुल कंठातील--आणि मृत्युच्या
शतकठोर कंठांतील घोर लागल्या;
नानाजन, जानपदें, जाति विभिन्ना
देश किती. दृश्यें तीं भूमिच्या महा-
संग्रहालयांत परिभ्रमत पाहिलीं.
सुरूप तें, सुरेख तें, सुललित तें असें
पाहियलें डोळ्यांनीं किमपि तरि जया
मृत्यो !, ते डोळे हे झांक तूं सुखें;
झांकणेंचि आवश्यक जरि गमे तरीः
कीं सुरेख पाहियलें-किमपि परी तें !
प्रीति विपल : विरह चिरंतन ! नवीं वयीं,
प्रौढ धुरंधरहि न जी शकति तोलण्या,
तीच धुरा भर उन्हांत तोलणें घडे !
म्हणुनि असे अजुनी अपुरीच राहिली
खेळाची हौस हंसत चांदण्यामध्यें

या आयुष्याच्या मम ! तरिहि जाणुनी
कीं न ययातीची ही हौस पुरेशी
झाली जरि आयुष्याचाचि सर्व तो
नृपति करी खेळ एक; आणि पाहुनी
इच्छेच्या बीजा फल भोग लागतां
इच्छेचीं बीजेंची त्यांत फिरोनी;
आणी अनुभवुनी कीं एक भुकेची
एक जेवणानें जी तृप्ति जाहली
तृप्ति सहस्राव्याही भोजनामुळें
असते कीं तितुकीची आणि तशीची;
-मी दे तुज अनुमोदन संपवूं असा
हा जीवन लेख इथें; पृष्टिं या; जरी
पृष्टें जीं पुढलीं तीं मागल्या तया
पृष्टांची असली पुनरुक्तिची तरी !
म्यां असतां दिवस नसे व्यर्थ गमाविला
दिवसास्ताचेंहि म्हणुनि दुःख ना मला :
भीति उद्यांचीही वा ! ! मृत्युच्या मृता
जरि अलेल त्या अंधःकार लतेला
फुलत दुज्या दिवसांचें फूल-तरीही
भीति न मज; कीं यथें पेरिलें अह्मी
फुलत आणि फलत तेंच, कथिति ते, तिथें
आणी मी पेराया कष्टलों असें
बीजें कीं तीं तीं जीं निवडुनी दिलीं
त्यांनींची अत्युत्तम म्हणुनिया मला
पेरुं फलाशाविरहित. 'तूं तसें जरी
वर्ततील समपरिस्थितींत अन्यही;
तरि लोकोन्नति-विनाश होय ना असें
वर्त :' तसेंची वर्तु यत्न म्यां सदा

केला आवाल्य. ‘ जसें अन्य तुझ्याशीं
वागावें म्हणुनि तुला वाटतें तसें
तूंहि वाग अन्याशीं ’ संतवचन हें
मी अनुपलि पाळाया कष्टलों. अणी
जरि आपद्धर्म सेव्य मानिले तरी
ते इतुक्यास्तवची कीं धर्मची स्वयें
ओपुनि दे आपत्तीच्याचि मज करीं !!
जैं हिरव्या गवताच्या गार गालिच्या
वरुनि दहापावलींच अंगणांमधें
कारागारांत कधीं मी फिरें, तधीं
आत्मौपम्यांत मुरत चित्त थिजोनी
कितिदा तरि चरण अकस्मात् चालती
स्तंभित होऊनि रहावेत घटि घटी.
कांही केल्याहि तया तरुण कोवळ्या
गवताचे अंकुर दुखतील या भयें
पाय त्यावरी नये पडूंचि कीं पुढें.
हातीचा घास कधीं हटुनि रहावा
हातींचीं, कीं जितुकीं त्यांत शितें तीं
बीजेंची नव्हत काय ? खातसें अह्मी
फल तें तें भ्रूणघात ? आणि कधिं कधीं
मज पडलें भय कीं मज वेड लागलें !—
आत्मौपम्यास जईं वर्तण्यांत हें
मन माझें अनुसरतां मज पदोपदीं
मरणासम दुःख होय पाहुनी जगीं
पूर्ण असंभवचि तया आचरूं पुरें.
तरिहि यत्न म्यां केला : अज्ञतेमुळें
वा अशक्यतेमुळेंच पद कधीं जरी
स्खलित जाहलें असेल तरि असेल तें.

ह्मणुनि भय उद्यांहि ना; स्मशानभूमिचा
परतट प्रदेश जो अनोळखी तिथें
सुखकर प्रवास करवि जें असें असे
ओळखिचें पत्र अम्हांजवळ त्या स्वयें
भगवान् श्रीकृष्णाचें –'श्रीमताम् गृहे,
शुचीनांच ! वा गेहे योगिनामपि !!'
' कश्चित् कल्याणकृच्च तात दुर्गतिम्
नहि गच्छति '! नहि गच्छति सांगती अणी
ते निरीश्वर स्वभाववादिही मला;
ह्मणुनि जरी सत्यचि जें वदति ते, जरी
स्वर्ग, नरक, जन्मांतर, बंध, मुक्ति वा
निजकर्मांचाची परिपाक कीं तरी
मरणाची वेस जयामाजिं उघडते
त्या अदृष्ट नगरांतिल अति सुरम्य ते
राखवूनि ठेवियले असति बंगले
आधींची आम्हांस्तव भरुनिया अम्हीं
कर्मांच्या, धर्मांच्या, नियत विसारा !
परि जरि कीं स्वर्ग, जीव, बंध, कर्म वा
ऐहिक तें इंद्रजाल मात्र; कीं जरी
संघातोत्पन्न भाव मात्र जीव हा
मृत्युपृथक्करणीं अभावांत वोसरे :—
तरि सर्वोत्तमचि ! मरण एक सुषुप्ति
अथवा प्रत्यक्ष मुक्ति ! पंचही असे
निश्रित भूतांश पृथक् मुक्ति होउनी
विहरोत स्वेच्छ नव्या मिश्रणांतुनी,
वा स्वयेंचि, वा शून्यीं ! इंद्रधनु तसें
संध्येच्या आकाशीं विपल शोभुनी
विपलांतचि हा माझा ' मी ' हि कीं जरी

विश्वाच्या अंतर्हित 'मीं' त मावळे.
तरि मरणा ! मरण न तूं ! मरण मुक्तिची
—विपलांतचि परि ! विनंति इतुकिची असे
येणें तरि येउनि जा झटकनी. तुझा
दुर्लौकिक जो जगांत, लोक जो तुझा
द्वेष करिति, तो नचि कीं असासि तूं स्वतः
निर्दय वा निंद्य म्हणुनि—पाहुनी तुला
आलाची कोणीही परत कीं न तो
सांगू तूं कैंवी तें !—परि विशेषतः
मृत्यो ! तूं अप्रियसा जगतिं जें तुझें
सैन्य, पुरस्सर, पीडक, हें हिडिस्ससें,
रोगांचें क्रूर असें त्यामुळेंच कीं
मीच न कीं परि अजातशत्रु जो जगीं,
तुल्य ज्या प्रियाप्रियादि, हानिलाभ, त्या
भगवान् श्रीगौतमाप्रताहि भासला
रोग जरा अप्रियची : "लाभ ना दुजा
आरोग्यासम जगतीं" धर्मपद वदे.
तरिही जें कोणीं नुघडतीलची
स्वेच्छेनें दरवाजे, दुर्ग ते हठी
जिंकुं जीवनाचे तूं धाड धाड ही
रोगांच्या फौजांची गांजत्या तिथें.
मी तों जीं नुघडतील फोडिलीं तरी
जाणारचि, तीं दारें उघडुनि स्वयें
या माझ्या गेहाचीं, स्वागता असें
अनिवार्या सिद्ध तुझ्या ! म्हणुनि शक्य कीं
ये तरि, हे अखिल-वीर-वीर विजेत्या !
एकलाचि, अपुरस्सर, आणि अकस्मात्.
परि अशक्य जरि तें तुज एकटें तसें

येणेंची तारे त्याही क्रूर पीडका
रोगांच्या सैन्याच्या क्षोभ सोसण्या
मी असेंचि सिद्ध. आजि दोन वत्सरें
पाहतची असशी तूं मजसि हा असा
शरपंजरिं खिळला ! ज्या मधुर लागलें
जीवनांतलें मधु, प्रका चक्षुतें,
प्रीति हृदा, तो मी त्या सर्व सुखाचें
मूल्य म्हणुनि मृत्यूच्या यातनाहि कीं
समजुनि कर्तव्य सहूं सिद्ध असेची.

**समाप्त.**

दा. क. 3420

REFBK-0003427

REFBK-0003427